CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

लातूर | रविवार, २४ मे २०२६ | वर्ष ४ थे अंक ७६ | पाने १२+८ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



भारतीय संस्कृतीची जगामध्ये एक विशेष ओळख आहे. ती मानवात कृतज्ञतेचा भाव अंकुरित आणि पल्लवित करते. त्यामुळे भारतीय परंपरा सर्व उपकारक तत्त्वांना पूज्य मानते. ते हिमालयाला देवता, गंगा नदीला गंगा माता, गाईला गोमाता, भूमीला भूमाता अशा पूज्य नावांनी संबोधतात.

**भारतरत्न स्व. नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# भारत-अमेरिकेची भागीदारी जागतिक हितासाठी

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन

### मार्को रुबियोंसोबत सुरक्षा, व्यापार तंत्रज्ञान क्षेत्रावर चर्चा

◆ **नवी दिल्ली, २३ मे**

भारत आणि अमेरिका यांच्यातील भागीदारी जागतिक हितावर आधारित आहे. दोन्ही देश भविष्यात आपले सहकार्य अधिक दृढ करीत राहतील आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थिरता व विकासासाठी एकत्र काम करतील यावर सहमती झाली. सुरक्षा, व्यापार, तंत्रज्ञान आणि या क्षेत्रात भागीदारी अधिक बळकट करणे आणि प्रादेशिक, जागतिक शांतता व सुरक्षेशी संबंधित मुद्द्यांवर अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांच्यासोबत चर्चा झाल्याची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक्स'वरील पोस्टमधून दिली.

चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर असलेले मार्को रुबियो यांनी शनिवारी राजधानी दिल्लीत पंतप्रधान मोदी यांची भेट घेतली. यावेळी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, तर अमेरिकच्या वतीने भारतातील राजदूत सर्जिओ गोर उपस्थित होते. रुबियो यांच्यासोबत झालेल्या चर्चेचा तपशील देताना मोदी यांनी म्हटले की, भारत-अमेरिका यांच्यातील सर्वसमावेशक जागतिक धोरणात्मक भागीदारीमधील सातत्यपूर्ण प्रगतीवर तसेच प्रादेशिक व जागतिक शांतता आणि सुरक्षेशी संबंधित मुद्द्यांवर आम्ही चर्चा केली. जागतिक हितासाठी भारत आणि



अमेरिका यापुढेही परस्परांशी निकटचा समन्वय साधून कार्यरत राहतील.

मुळातच दोन्ही देशांचे संबंध केवळ द्विपक्षीय भागीदारीपुरते मर्यादित नसून, जागतिक हित हे त्याचा आधार आहे. ऊर्जा, व्यापार, गुंतवणूक, महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान आणि लोकांमधील संबंध अधिक दृढ करण्यावर आमची सहमती झाली आहे. याशिवाय मध्यपूर्वेतील तणाव आणि जागतिक ऊर्जा पुरवठा यासारख्या विषयावर सकारात्मक चर्चा झाली, असे मोदी म्हणाले. ◄(वृत्तसंस्था)

### द्विपक्षीय संबंधांना नवी दिशा : सर्जियो गोर

रुबियो यांचा हा पहिलाच भारत दौरा असून, चार दिवसांत ते जयपूर आणि आग्रा शहरांना भेट देणार असून, २६ मे रोजी आयोजित क्वाड शिखर परिषदेत सहभागी होणार आहे. सर्जियो गोर यांनी सांगितले की, रुबियो यांनी मोदींना व्हाईट हाऊस भेटीचे निमंत्रण दिले. द्विपक्षीय संबंधांना नवी दिशा देण्याला अमेरिकेचे प्राधान्य आहे. व्यापार, तंत्रज्ञान, एआय आणि पुरवठा साखळीपासून ते संरक्षण आणि ऊर्जा क्षेत्रातील भागीदारीचा दोन्ही देशाला फायदा होऊ शकतो. ■

### बैठकीत झालेले चर्चेचे मुद्दे

- सुमारे एक तास चाललेल्या बैठकीत भारत-अमेरिका संबंध अधिक दृढ करण्यावर आणि भारत-प्रशांत क्षेत्रातील सहकार्यावर चर्चा.
- दोन्ही देशांमधील सामरिक सहकार्य पुढे नेणे, सुरक्षा चौकट मजबूत करणे आणि व्यापारी भागीदारीला वेग देण्यावर सहमती.
- भारत-प्रशांत क्षेत्रातील सागरी मार्गांचे स्वातंत्र्य आणि सुरक्षेला प्रोत्साहन देण्यासाठी दोन्ही देशांच्या संयुक्त प्रयत्नांवर चर्चा
- दोन्ही देशांमध्ये रविवारी द्विपक्षीय चर्चेची आणखी एक फेरी होणार आहे. याशिवाय, क्वाड बैठक आणि त्यातील भारताची भूमिका महत्त्वाची असेल. ■

# माओवाद्यांचा शस्त्रनिर्मिती कारखाना उद्ध्वस्त

### गडचिरोली पोलिसांची मोठी कारवाई

◆ **गडचिरोली, २३ मे**

जिल्ह्यातील माओवाद जवळपास संपुष्टात येत असताना जंगल परिसरात जमिनीत पुरून ठेवलेले माओवादी साहित्य शोधून नष्ट करण्यात गडचिरोली पोलिसांना मोठे यश आले आहे. शरणागती पत्करलेल्या माओवाद्यांकडून मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे राबविण्यात आलेल्या विशेष शोधमोहिमेत माओवाद्यांचा शस्त्रनिर्मिती कारखाना उद्ध्वस्त करण्यात आला असून, घटनास्थळीच विविध साहित्य नष्ट करण्यात आले.



पोलिसांनी जमिनीतून शोधून काढलेले माओवाद्यांचे साहित्य

माओवादी संघटना शासनविरोधी घातपाताच्या कारवायांसाठी शस्त्रे व स्फोटक साहित्य जंगल परिसरात गुप्तपणे जमिनीत पुरून ठेवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. निवडणुका, नक्षल सप्ताह तसेच सुरक्षा दलांवर हल्ले घडवून आणण्यासाठी या साहित्यांचा वापर केला जात असल्याचे तपासात समोर आले. याच पृष्ठभूमीवर गडचिरोली पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेत जंगलातील लपविलेले साहित्य शोधून काढत माओवाद्यांच्या कारवायांना मोठा धक्का दिला आहे.

'ऑपरेशन अंतिम प्रहार' अंतर्गत १६ मे रोजी गडचिरोली पोलिस दलासमोर शरणागती पत्करलेल्या माओवाद्यांची सखोल चौकशी करण्यात आली. या चौकशीत पोमके-बिनागुंडा हद्दीतील जंगल परिसरात शस्त्रनिर्मिती व इतर साहित्य लपवून ठेवण्यात आल्याची माहिती पुढे आली. त्यानुसार २१ मे रोजी पोलिस अधीक्षक एम. रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष अभियान पथक, प्राणहिता दलाच्या सहा तुकड्या तसेच बीडीडीएसच्या दोन पथकांना शोधमोहिमेसाठी रवाना करण्यात आले.

ही कारवाई पोलिस अधीक्षक एम. रमेश, अपर पोलिस अधीक्षक (अभियान) कार्तिक मधिरा, अपर पोलिस अधीक्षक (प्रशासन) गोकुल राज जी. तसेच पोलिस उपअधीक्षक (अभियान) विशाल नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष अभियान पथक प्राणहिता आणि बीडीडीएसच्या जवानांनी यशस्वीरीत्या पार पाडली. या धाडसी कारवाईबद्दल पोलिस अधीक्षकांनी सहभागी जवानांचे विशेष कौतुक केले आहे. ◄(तभा वृत्तसेवा)

### लेथ मशीन ते सोलर पॅनल...



शुक्रवार, २२ मे रोजी पोमके-बिनागुंडाच्या उत्तरेकडील जंगल परिसरात घेरा घालून बीडीडीएसच्या जवानांनी कसून तपासणी केली असता एक लेथ मशीन, बीजीएल पाईप्स, १२ बोअर पाईप, इन्व्हर्टर, जनरेटर, बॅटरी, ग्राइंडिंग व ड्रिलिंग मशीन, जीग सॉ मशीन, प्रेशर पंप, सोलर पॅनेल, २० फुटी फुटबॉल पाईप इत्यादी साहित्य हस्तगत करण्यात आले. वरिष्ठांच्या आदेशानुसार हे सर्व साहित्य घटनास्थळीच नष्ट करण्यात आले आहे. ■

## महत्त्वाचे

### नऊ दिवसांत तिसऱ्यांदा इंधन दरवाढ

**नवी दिल्ली** : आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीतील चढ-उतार सुरू आहे. अशातच भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात पुन्हा एकदा वाढ करण्यात आली आहे. दिल्लीत पेट्रोल प्रतिलिटरमागे ८७ पैशांनी तर, डिझेल ९१ पैशांनी महाग झाले आहे. शनिवारी दिल्लीत पेट्रोलचा दर ९९.५१ प्रतिलिटर आणि डिझेलचे दर ९२.४९ रुपयांवर पोहोचले. गत नऊ दिवसांत इंधनाच्या दरातील ही तिसरी वाढ आहे. यापूर्वी याच आठवड्यात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सरासरी ९० पैसे प्रति लिटर वाढ करण्यात आली होती. त्यापूर्वी दरात ३ रुपये प्रति लिटर वाढ करण्यात आली होती. या इंधन दरवाढीमुळे जीवनावश्यक वस्तूंसह इतर वस्तूंचेही दर वाढण्याची शक्यता आहे. डिझेल दरवाढीमुळे मालवाहतूक महागणार असून, इतर राज्यांमधून येणाऱ्या भाजीपाला, फळे व धान्यांच्या किमती तसेच शेतीचाही खर्च वाढणार आहे. याशिवाय स्कूल बसेसह ऑटोरिक्षा व सार्वजनिक वाहतुकीची भाववाढ होण्याची शक्यता आहे. ■

### राजौरीमध्ये चकमक, तीन दहशतवाद्यांना घेरले

**श्रीनगर** : जम्मू-काश्मीरच्या राजौरी जिल्ह्यात दहशतवाद्यांबाबत माहिती मिळताच लष्कराने सुरक्षा दलांच्या साथीने संयुक्त मोहीम सुरू केली आहे. सुरक्षा दलांनी तीन दहशतवाद्यांना घेरले आहे. सुरक्षा दलांनी या मोहिमेला 'ऑपरेशन शेरवाली' असे नाव दिले आहे. ही मोहीम शनिवारी सकाळी ११:३० वाजता सुरू झाली. परिसरात दोन ते तीन परिसरात असल्याचा संशय होता. व्हाइट नाईट कॉर्प्सने 'एक्स'वर सांगितले की, शनिवारी सकाळी सुमारे ११:३० वाजता पोलिस आणि सीआरपीएफने गुप्त माहितीवर आधारित संयुक्त कारवाई केली. ■

# केरळमध्ये मान्सून वेळेपूर्वी पोहोचणार?

### अरबी समुद्र व बंगालच्या उपसागरावर जमले प्रचंड ढग

◆ **नवी दिल्ली, २३ मे**

नैऋत्य मान्सूनचा वेग वाढला असून, तो वेळेपूर्वीच केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी वर्तवली आहे. अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरावर प्रचंड वेगाने मान्सूनचे ढग तयार होत असल्याचे उपग्रह छायाचित्रांवरून स्पष्ट झाले.



भारतीय हवामान विभागाच्या उपग्रह छायाचित्रांनुसार अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरावर मान्सूनचे प्रचंड ढग वेगाने तयार होत असून, ते भारतीय किनारपट्टीच्या दिशेने सरकत आहेत. उत्तर आणि मध्य भारत सध्या तीव्र उष्णतेच्या लाटेखाली आहे. रात्रीचे तापमानही कमी होण्याचे नाव घेत नाही. परिणामी, दिवसा उन्हाचे चटके आणि रात्रभर प्रचंड उकाडा जाणवत आहे.

भारतीय हवामान विभागाने ३ थर्मल इन्फ्रारेड उपग्रहाचे एक छायाचित्र नुकतेच प्रसिद्ध केले. त्यात दक्षिण अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि पूर्व हिंद महासागराच्या काही भागांमध्ये पसरलेले दाट ढगांचे पट्टे दिसत आहेत. तज्ज्ञांच्या मते, यावरून नैऋत्य मान्सून केरळच्या दिशेने वेगाने सरकत असल्याचे दिसून येते. उपग्रहाच्या छायाचित्रात दोन्ही समुद्रांवर तीव्र संवहनी क्रिया दिसून येत आहे. शिवाय दाट ढग भारताकडे आर्द्रता वाहून नेत आहेत. दक्षिण श्रीलंका आणि आग्नेय अरबी समुद्रावर ढगांचे दाट थर दिसत आहेत. हे दोन्ही प्रदेश केरळमध्ये मान्सूनच्या आगमनासाठी महत्त्वाचे आहेत.

हवामान शास्त्रज्ञांच्या मते, भूभागावरील तीव्र उष्णतेमुळे हिंद महासागरातून आर्द्रतेने भरलेले वारे खंडाकडे खेचले जात आहेत. हा मान्सूनच्या अभिसरणाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. अरबी समुद्रावरील ढगांच्या जोरदार लाटा आणि बंगालच्या उपसागरावरील सक्रिय वादळी पावसाचे समूह येत्या काही दिवसांत आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. ढग वातावरणातून वेगाने वर जात आहेत. ◄(वृत्तसंस्था)

# जेईईचा निकाल जाहीर

◆ **पुणे, २३ मे**

एनसीएमएच जेईई २०२६ परीक्षेचा निकाल अखेर जाहीर करण्यात झाला आहे. यामुळे विद्यार्थ्यांची मागील काही दिवसांची प्रतीक्षा अखेर संपली आहे. परीक्षेला बसलेल्या हजारो विद्यार्थ्यांना अधिकृत वेबसाईट वर लॉगिन करून त्यांचे गुण आणि रँकिंग पाहता येणार आहे. निकाल जाहीर होताच पुढील प्रवेश प्रक्रियेलाही आता वेग येणार आहे.

एनटीएने निकालासोबतच विद्यार्थ्यांचे स्कोअरकार्ड, टक्केवारी आणि ऑल इंडिया रँकही प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार देशभरातील विविध संस्थांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी मदत होणार आहे. निकाल पाहण्यासाठी उमेदवारांना अर्ज क्रमांक, जन्मतारीख आणि पासवर्डच्या माध्यमातून अधिकृत वेबसाईटवर लॉगिन करावे लागणार आहे. ◄(तभा वृत्तसेवा)

# इंधन साठेबाजांवर कारवाई करा

### मुख्यमंत्री फडणवीस यांचा प्रशासनाला आदेश

◆ **शिर्डी, २३ मे**

पेरणीपूर्वी शेतीच्या मशागतीची कामे सुरू असताना ग्रामीण भागात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा पुरवठा होत नसल्यामुळे अनेक पंप कोरडे झाले आहे. राज्यात विविध भागांमध्ये डिझेलसाठी रात्रभर पेट्रोल पंपांवर शेतकऱ्यांची गर्दी दिसून येत आहे. या पृष्ठभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



यांनी प्रशानाला इंधनाची साठेबाजी करणाऱ्यांवर करडी नजर ठेवण्यासोबतच शेतकऱ्यांना आवश्यक तेवढे डिझेल वेळेत उपलब्ध करून द्या, असे निर्देश दिले आहे.

ग्रामीण भागात पेट्रोल आणि डिझेल मिळत नसल्याच्या तक्रारीबाबत माध्यमांनी प्रश्न उपस्थित केला असता फडणवीस म्हणाले, यासंदर्भात सरकार गंभीर आहे. जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना तातडीच्या सूचना दिल्या आहेत. शेतकऱ्यांना आवश्यक तेवढे डिझेल वेळेत उपलब्ध व्हावे आणि त्यांच्या कामात कोणताही अडथळा येऊ देऊ नये, असे स्पष्ट निर्देश प्रशासनाला दिले आहे. शेतकऱ्यांच्या नावाखाली कुणी इंधनाची साठेबाजी करीत असेल तर, साठेबाजांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. ◄(वृत्तसंस्था)




नीट पेपरफूट प्रकरण

# हवालदारच्या पतीचे 'गॉड'सोबत संशयास्पद चॅटिंग

### पेपर फोडणारा 'गॉडफादर' कोण?

◆ **पुणे, २३ मे**

नीट-यूजी २०२६ प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणात पुण्यातून अटक करण्यात आलेली मुख्याध्यापक मनीषा हवालदारच्या पतीच्या मोबाईलमध्ये 'गॉड' नावाने सेव्ह असलेल्या क्रमांकासोबतचे संशयास्पद चॅट सीबीआयला सापडले आहेत. प्रश्नपत्रिका फुटीचा खरा 'गॉडफादर' कोण, असा प्रश्न उपस्थित झाला असून, त्याचा शोध घेण्यात येत आहे.

सीबीआयने मनीषा हवालदारच्या घरावर केलेल्या छापेमारीत अनेक धक्कादायक पुरावे हाती लागले. तपासादरम्यान मनीषा हवालदारने मनीषा मांढरेसोबतचे व्हॉट्सअॅप चॅट डिलीट केल्याची कबुली दिली तसेच भौतिकशास्त्राच्या प्रश्नांच्या हस्तलिखित नोट्स जाळल्याचे त्यांनी मान्य केल्याचे सीबीआयच्या सूत्रांनी म्हटले आहे. अन्य काही पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्याचा संशय सीबीआयने व्यक्त केला.

संजय हवालदार यांच्या मोबाईलचे सेलेब्राईट प्रीमियम या न्यायवैद्यक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने डिजिटल एक्स्ट्रॅक्शन करण्यात आले. डिलीट करण्यात आलेल्या चॅटमधून आणखी काही महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता सीबीआयने व्यक्त केली आहे.

चौकशीदरम्यान मनीषा हवालदारने एप्रिल २०२६ मध्ये 'नीट-यूजी'च्या भौतिकशास्त्र विषयातील प्रश्न स्मरणशक्तीच्या आधारे तयार करून काही विद्यार्थ्यांना आणि सहआरोपींना दिल्याचे मान्य केले आहे. हे प्रश्न व्हॉट्सअॅप आणि प्रिंटआऊटच्या माध्यमातून पुढे पाठवण्यात आले. शेठ हिरालाल सराफ प्रशालेतील अधिकृत संगणकावरून प्रश्नांचे प्रिंटआऊट काढल्याचेही तपासात समोर आले आहे.

### घरातून सापडले भौतिकशास्त्राचे हस्तलिखित प्रश्न

**पुण्यातील मुख्याध्यापक मनीषा हवालदारच्या घरझडतीत सीबीआयला भौतिकशास्त्राचे २३ पानांचे हस्तलिखित प्रश्न, नीटच्या विविध मूळ प्रश्नपत्रिका, एनटीएची अधिकृत प्रमाणपत्रे आणि रोख रक्कम आढळली आहे. सीबीआयने सदाशिवपेठेतील हवालदारच्या घरी झडती घेतली. याशिवाय 'नीट-यूजी'च्या विविध मूळ प्रश्नपत्रिकाही जप्त करण्यात आल्या. त्यामध्ये मराठी-इंग्रजी 'मास्टर सेट', एम-२ कोडची प्रश्नपत्रिका, तसेच हिंदी-इंग्रजी स्वरूपातील प्रश्नपत्रिकांचा समावेश आहे. तपास पथकाने एनटीएकडून देण्यात आलेली उपस्थिती प्रमाणपत्रे आणि ओळखपत्रांच्या प्रतीही ताब्यात घेतल्या आहेत.हे प्रश्न एनटीएच्या रसायनशास्त्र तज्ज्ञ डॉ. सुजाता काळे यांच्या सांगण्यावरून दिल्याचा दावा त्यांनी केला आहे.** ■

#### रोखीने व्यवहार

सीबीआयच्या चौकशीत मनीषा हवालदारने सुरुवातीला प्रश्नांच्या बदल्यात एका तरुणाकडून २० हजार रुपये आणि एका महिलेकडून २५ हजार रुपये रोख घेतल्याचे सांगितले. ही रक्कम मनीषा मांढरेच्या उपस्थितीत मिळाल्याचे नमूद केले. मात्र, नंतर तिने पैसे घेतले नसल्याचे सांगितल्याचे सीबीआयने रिमांड रिपोर्टमध्ये म्हटले आहे. झडतीदरम्यान घरातून एक लाख एक हजार ९३० रुपये रोख सापडल्याचेही त्यात नमूद आहे. ◄(तभा वृत्तसेवा)



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### राघव चड्ढा राज्यसभेच्या याचिका समितीच्या अध्यक्षपदी

**नवी दिल्ली, २३ मे**



राघव चड्ढा यांची राज्यसभेच्या याचिका समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. आप सोडून चड्ढा यांनी नुकताच भाजपात प्रवेश केला आहे. राज्यसभेचे अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन् यांनी याचिका समितीची पुनर्रचना केली असून, राघव चड्ढा यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. या समितीत राज्यसभेतील दहा सदस्यांचाही समावेश करण्यात आला आहे. या समितीत हर्ष महाजन, गुलाम अली, शंभूशरण पटेल, मयंककुमार नायक, मस्तान राव यादव बिधा, जेबी माथेर हिशाम, सुभाशिष खुंटिया, रंगवा नारजारी आणि संदोशकुमार पी. यांचा समावेश आहे. राघव चढ्डा यांच्यासह आपच्या सात राज्यसभा सदस्यांनी २७ एप्रिलला भाजपात प्रवेश केला होता. आपचे राज्यसभेत दहा सदस्य होते, आता फक्त तीन उरले आहेत. राघव चड्ढा यांच्याशिवाय राज्यसभा सदस्य असलेल्या संदीप पाठक, अशोक मित्तल, हरभजनसिंग, स्वाती मालिवाल, राजिंदर गुप्ता आणि विक्रमजितसिंह साहनी यांना आप सोडून भाजपात प्रवेश केला आहे.

### जनजाती सुरक्षा मंचतर्फे आज दिल्लीत जनजाती सांस्कृतिक समागम

**नवी दिल्ली :** भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त जनजाती सुरक्षा मंच तसेच जनजाती जागृती समितीतर्फे रविवार २४ मे रोजी लाल किल्ला मैदानावर विराट अशा जनजाती सांस्कृतिक समागमचे आयोजन करण्यात आले आहे. जनजाती सुरक्षा मंचचे राष्ट्रीय संयोजक गणेशराम भगत यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. जनजाती सुरक्षा मंचचे राष्ट्रीय सहसंयोजक डॉ. राजकुमार हांसदा, अ. भा. वनवासी कल्याण आश्रमाचे अध्यक्ष सत्येंद्रसिंह सरवार, हर्ष चौहान, बुधरी ताती, तेची गुविन, हीराकुमार नागू हे मान्यवर यावेळी विशिष्ट अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या सांस्कृतिक समागमात देशभरातून विविध आदिवासी समुदायाचे दीड लाख प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. रविवारी दुपारी तीन वाजता दिल्लीतील वेगवेगळ्या भागांतून पाच शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या सर्व शोभायात्रा लाल किल्ला मैदानावर एकत्र येतील, त्यानंतर सायंकाळी ६ वाजता मुख्य कार्यक्रम होणार आहे. यात गृहमंत्री अमित शाह संबोधित करतील. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.


### २४१ कोटींचा घोटाळा; माजी जिल्हाधिकारी निलंबित

**बीड :** २४१ कोटी रुपयांच्या कथित भूसंपादन नुकसानभरपाई घोटाळाप्रकरणी बीडचे माजी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना ७ मे रोजी अटक करण्यात आली होती. आता महाराष्ट्र सरकारने त्यांच्या निलंबनाचा आदेश जारी केला. अविनाश पाठक हे २०१३ च्या तुकडीतील आयएएस अधिकारी आहे. त्यांना बीड पोलिसांच्या विशेष तपास पथकाने लातूरमधून अटक केली होती. सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत. राज्य महसूल विभागाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, पाठक यांचे औपचारिकरीत्या निलंबन करण्यात आले असून, हा निलंबन आदेश त्यांच्या अटकेच्या दिवसापासूनच लागू मानला जाईल. निलंबनाच्या कालावधीत पाठक यांचे अधिकृत मुख्यालय बीड येथेच राहील, असेही या प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार बीड येथील शिवाजीनगर पोलिस ठाण्यात पाठक यांच्यासह एकूण १० जणांविरुद्ध भूसंपादनाच्या नुकसानभरपाईबाबत फसवणूक करणारा आदेश काढल्याच्या आरोपावरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. बीड जिल्ह्यातून बदली झाल्यानंतरही पाठक यांचे नाव, पदनाम आणि त्यांच्या बनावट स्वाक्षऱ्यांचा वापर करून नुकसानभरपाईच्या मंजुरीचे खोटे आदेश काढण्यात आले होते.

# ...अन्यथा देशाचे विभाजनच झाले नसते : सुनील आंबेकर

### 'दिल्ली में संघयात्रा' वृत्तपटाचे लोकार्पण




**नवी दिल्ली, २३ मे**

देशाच्या विभाजनाच्या वेळी संघाची पुरेशी ताकद नव्हती, संघाची त्यावेळी पुरेशी ताकद असती तर, देशाचे विभाजनच झालेच नसते, असे प्रतिपादन रा. स्व. संघाचे अ. भा. प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी केले.

इंद्रप्रस्थ विश्व संवाद केंद्रातर्फे 'दिल्ली में संघ यात्रा' या वृत्तपटाचे शुक्रवारी लोकार्पण करण्यात आले. यावेळी आंबेकर बोलत होते. दिल्ली प्रांत संघचालक डॉ. अनिल अग्रवाल यावेळी उपस्थित होते. १९४२ ते १९४७ दरम्यान दिल्ली आणि संपूर्ण पंजाबमध्ये संघाचे काम वेगाने आणि व्यापक स्वरूपात वाढले, मोठ्या संख्येत लोक संघासोबत जुळून काम करू लागले. मात्र, देशाच्या विभाजनाच्या वेळी संघाची तेवढी ताकद नव्हती, अन्यथा देशाचे विभाजनच झाले नसते, असे आंबेकर म्हणाले.

विभाजनानंतर नवीन पाकिस्तान बनला, त्या भागातील हिंदूंचे संरक्षण झाले पाहिजे. त्या भागातील शेवटचा हिंदू भारतात सुखरूप परत येईपर्यंत संघाच्या स्वयंसेवकांनी त्यांना सुरक्षा दिली पाहिजे, असे गुरुजींनी तेव्हा म्हटले होते, याचा उल्लेख या वृत्तपटात आहे, याकडे आंबेकर यांनी लक्ष वेधले. या कामात अनेक स्वयंसेवकांना प्राणाचे बलिदान द्यावे लागले, अनेक स्वयंसेवक जखमीही झाले. पाकिस्तानातून आलेल्या शरणार्थ्यांसाठी मोठ्या संख्येत मदत शिबिरे चालवण्यात आली, त्यात लाखो लोक आश्रयाला होते, असे ते म्हणाले. ऑगस्ट १९४७ च्या आधी गुरुजी कराचीत होते. त्यावेळच्या अस्थिर राजकीय परिस्थितीत हिंदूंचे संरक्षण कसे करावे, यासाठी ते स्वयंसेवकांना मार्गदर्शन करीत होते, अव्याहतपणे काम करत होते, असे आंबेकर म्हणाले.

**संघाच्या १०० वर्षांच्या इतिहासाचा आढावा**

संघ आणि डॉ. हेडगेवार यांना राजकारण करायचे असते, तर त्यांनी राजकीय पक्षाची स्थापना केली असती, पण त्यांना समाज उभा करायचा होता, संपूर्ण समाजाचे सांस्कृतिक जागरण करायचे होते, म्हणून त्यांनी रा. स्व. संघाची स्थापना केली, याकडे त्यांनी लक्ष वेधले. रा. स्व. संघाचे दिल्ली प्रांत प्रचार प्रमुख रितेश अग्रवाल यांनी वृत्तपटामागची भूमिका विषद दिली. या वृत्तपटात संघाच्या १०० वर्षांच्या इतिहासाचा आढावा घेण्यात आला आहे. (तभा वृत्तसेवा)



रंगीबेरंगी चेंडू आणि फुगे लहान मुलांच्या आकर्षणाचे केंद्र तर दुसरीकडे ते कुणासाठी भाकरीचा आधार असतात. कारण, दररोजची भूक त्याच्या विक्रीवरच भागवली जाते. दिल्लीत दुचाकीवर चेंडू घेऊन जात असलेला विक्रेता

# हद्दपार केलेल्यांना परत आणणार

### सरकारची सुप्रीम कोर्टात माहिती

### नागरिकत्वाच्या दाव्यांची चौकशी होणार

**नवी दिल्ली, २३ मे**

बांगलादेशात हद्दपार केलेल्यांपैकी काहींना भारतात परत आणले जाईल आणि त्यांच्या भारतीय नागरिकत्वाच्या दाव्यांची चौकशी करणार असल्याची माहिती केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला दिली आहे. विशेष परिस्थिती लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

कायदेशीर दस्तवेजाअभावी भारतातून हद्दपार करण्यात आलेल्या कुटुंबातील काही सदस्यांनी आक्षेप घेत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यावर न्यायासनाने केंद्र सरकारला नोटीस बजावत हद्दपार केलेल्या नागरिकांना परत आणून त्यांच्या नागरिकत्वाच्या दाव्याची चौकशी करणार का, असे विचारले होते. मानवी दृष्टिकोनातून यावर निर्णय घेण्याचा सल्ला नोटीसमधून देण्यात आला.

यावर महान्यायाभिकर्ता तुषार मेहता यांनी सरकारची बाजू मांडताना सांगितले की, सरकारने या प्रकरणातील विशेष परिस्थिती लक्षात घेऊन बांगलादेशात पाठवण्यात आलेल्या काही नागरिकांना परत आणण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्याकडे असलेल्या भारतीय नागरिकत्वाच्या पुराव्याची चौकशी केली जाईल. या लोकांना भारतात परत आणण्यासाठी ८ ते १० दिवस लागू शकतात. सरकारच्या उत्तरावर समाधान व्यक्त करीत सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या न्यायासनाने या प्रकरणाची पुढील सुनावणी जुलैमध्ये निश्चित केली. (वृत्तसंस्था)




मार्गदर्शन करताना सप्रे, व्यासपीठावर डॉ. मकरंदे, सपकाळ, तामशेट्टीवार व डॉ. देशमुख

ऑनलाईन तभा वाचण्यासाठी
www.tarunbharat.net
वर भेट द्या!

# संघ व्यक्तिप्रधान नव्हे, तर ध्येयप्रधान : सप्रे

### रा. स्व. संघ विदर्भ प्रांत संघ शिक्षा वर्गाचा समारोप

**वर्धा, २३ मे**

संघाने गुरुस्थानी भगवा ध्वज ठेवलेला आहे. अगदी पहिला उत्सव गुरुपुजनाचा झाला तेव्हा स्वयंसेवकांना वाटले होते की एखादी महान व्यक्ती गुरू असेल. पण, डॉ. हेडगेवार यांनी आजच्या उत्सवाची तुम्ही तयारी करा. पण, काय बोलायचे ते मी बोलेल आणि तुम्हाला सांगेल आणि स्मरण करून देईल. अनेक शतके ज्याचे अमर अस्तित्व आहे असा भगवा ध्वज आपला गुरू असेल आणि तिथून अनेक वैशिष्ट्यांची सुरुवात झाली. आज शंभर वर्षे झाली तरी एकसंध आहोत. भगवा ध्वज गुरू म्हटल्यानंतर आपले संघटन हे व्यक्तिप्रधान नाही, तर ध्येयप्रधान असल्याचे मार्गदर्शन सेवा भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील सप्रे यांनी केले.

स्थानिक केसरीमल कन्या शाळेच्या मैदानावर शनिवारी आयोजित राष्ट्रीय स्वयंसेवक संघ विदर्भ प्रांत संघ शिक्षा वर्गाच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. जयंत मकरंदे उपस्थित होते. व्यासपीठावर संघ शिक्षा वर्गाचे सर्वाधिकारी मनोहर सपकाळ, विदर्भ प्रांताचे प्रांत संघचालक दीपक तामशेट्टीवार, नगर संघचालक डॉ. प्रसाद देशमुख यांची उपस्थिती होती.

ते म्हणाले की, स्वयंसेवक भगव्या ध्वजापुढे गुरुदक्षिणा समर्पण करतात. त्यातून वर्षभर काम चालते. त्याच्यामुळे एक स्वावलंबीपणाचे शिक्षण येथे दिले जाते. संघाचे सेवा कार्य देशभर चालणारी आहेत. सेवाभावामध्ये ईश्वर बघायचा हा आपला धर्म आहे. ईश्वराची सेवा अव्याहतपणे चालत असते. सेवा करणे हिंदू समाजाचा गुणधर्म आहे. देशभर चालणाऱ्या सेवा कार्यात विविधता आहे. आसामसारख्या प्रदेशात डॉक्टरांची उपलब्धता कमी आहे म्हटल्यावर तिथे वर्षातून एकदा धन्वंतरी यात्रा होते आणि प्रत्येक जिल्ह्यामध्ये दोन डॉक्टर आणि दोन कार्यकर्ते सेवा देत असतात, असे ते म्हणाले. देश हेच एक विशाल कुटुंब आहे आणि त्यामुळे एखाद्या कुटुंबात जशी सहजपणे चर्चा होईल तशी चर्चा करून निर्णय करण्याची एक पद्धतसुद्धा आपल्यामध्ये आहे. संपूर्ण विश्वाचे कल्याण करणाऱ्या ऋषींनी राष्ट्र ही कल्पना प्रत्यक्षात आणली. या देशाचा आध्यात्मिक आधार म्हणजे काय तुम्ही मी सर्व विश्व एकच तत्त्व विद्यमान आहे आणि त्याच्यामुळे या आधारावर आपले राष्ट्र उभे असल्याचे ते यावेळी म्हणाले. त्यांनी पंचपरिर्वतनाचेही महत्त्व विशद केले.

प्रमुख अतिथी डॉ. मकरंदे यांनी संघाला आपण अजून जवळून अनुभले नाही. परंतु, संघ सर्वाधिक लोकशाही असलेले, कोणताही एक चेहरा नसलेले आणि स्वावलंबी संघटन असल्याचे सांगितले. शिक्षा वर्गातून देशसेवा करणारे भावी नागरिक घडतील. तुमच्या हातात देश सुरक्षित राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

वर्ग सर्वाधिकारी मनोहर सबकाळ यांनी वर्गाचे संक्षिप्त वृत्त वाचन केले. सुरुवातीला सांघिक गीत, योग, सांघिक योगासने, वैयक्तिक गीत, अमृत वचन सादर केले. परिचय, स्वागत आणि आभार वर्ग कार्यवाह दत्तात्रय रत्नपारखी यांनी मानले.

कार्यक्रमाला पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, आ. समीर कुणावार, माजी खासदार रामदास तडस, भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय गाते आदींसह जिल्ह्यातील प्रतिष्ठित नागरिक, संघप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

# विधान परिषदेच्या १७ जागांचा तिढा सुटण्याच्या मार्गावर

**मुंबई, २३ मे -**

राज्याच्या राजकारणात सध्या विधान परिषदेच्या आगामी १७ जागांच्या निवडणुकीची जोरदार चर्चा सुरू आहे. या अनुषंगाने महायुतीतील जागावाटपाचा गुंता सोडवण्यासाठी राजकीय हालचाली गतिमान झाल्या आहेत. याच पृष्ठभूीवर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांची एक महत्त्वाची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीनंतर, जागा वाटपावर लवकरच तोडगा निघेल आणि हा फॉर्म्युला अंतिम टप्प्यात आला असल्याची माहिती भाजपा नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने या निवडणुकीत तब्बल सात जागांची मागणी लावून धरली आहे. त्यांच्याकडे सध्या पाच जागा असून, पक्षाची वाढलेली राजकीय ताकद लक्षात घेता त्यांनी आणखी दोन वाढीव जागांचा दावा केला आहे. या सर्व घडामोडींवर 'नंदनवन' या शासकीय बंगल्यावर उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत सखोल मंथन करण्यात आले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या बैठकीत घटक पक्षांध्ये बहुतांश मुद्द्यांवर एकवाक्यता दिसून आली असून, जागावाटपाचे चित्र सकारात्मक आहे.

'सिटिंग-गेटिंग'चेच सूत्र कायम जागावाटपाच्या निकषांबाबत चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, महायुतीचे जागावाटप हे प्रामुख्याने सिटिंग-गेटिंग (विद्यमान जागा त्याच पक्षाला) या तत्त्वावरच आधारित असेल. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांध्येही याच सूत्राचा यशस्वी अवलंब करण्यात आला होता. त्यामुळे ज्या पक्षाचा आमदार सध्या त्या जागेवर आहे, ती जागा त्याच पक्षाला सोडण्यात येईल, हे स्वाभाविक आहे. उरलेल्या जागांचे वाटप हे विधानसभेतील घटक पक्षांच्या संख्याबळाचा विचार करून केले जाणार आहे.

मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत मोहोर तत्पूर्वी, शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक यांनीही पक्षाच्या वाढलेल्या आमदारांच्या संख्येचा दाखला देत सात जागांचा आग्रह धरला होता. शिवसेनेची ही मागणी पूर्णपणे मान्य होणार की तडजोड केली जाणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या आगामी महत्त्वाच्या बैठकीत या संपूर्ण फॉर्म्युल्यावर मोहोर उमटवली जाईल.

# परिस्थिती पाहूनच शाळा सुरू करण्याचा निर्णय

### पंकज भोयर यांची माहिती

**नागपूर, २३ मे**

विदर्भात सध्या उष्णतेची लाट सुरू आहे. त्यामुळे एकूण परिस्थिती लक्षात घेतल्यावरच विदर्भातील शाळा १५ ऐवजी २६ जूनपासून सुरू करण्याबाबत निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी शक्यता शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी व्यक्त केली.



राज्यातील अनेक शहरांवर सध्या सूर्य आग ओकत आहे. विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी सध्या देशातील सर्वाधिक उष्ण शहर ठरले आहे. येथे नुकतेच ४७.२ अंश सेल्सिअस एवढे विक्रमी तापमान नोंदवण्यात आले. हवामान खात्याने पुढील दोन दिवस विदर्भात उष्णतेचा तडाखा कायम राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. तसेच अकोला, अमरावती व वर्धा या जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट, तर नागपूर व यवतमाळ जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या पृष्ठभूमीवर मंत्री पंकज भोयर यांनी उपरोक्त माहिती दिली.

पंकज भोयर म्हणाले, तापमानात दिवसेंदिवस सातत्याने वाढ होत आहे. १० जूननंतरही विदर्भात उष्णतेची लाट सुरू राहिली तर, विदर्भात १५ जूनपासून सुरू होणाऱ्या शाळा २६ जूनपासून सुरू करण्याबाबत सरकार विचार करेल. शालेय शिक्षण विभाग लवकरच या प्रकरणी बैठक घेऊन स्थितीचा आढावा घेणार आहे. या प्रकरणी लवकरच योग्य तो निर्णय घेतला जाईल.

पंकज भोयर यांनी यावेळी राज्यात प्री-प्रायमरी स्कूल रजिस्ट्रेशन ॲक्ट आणण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचेही सांगितले. राज्यातील प्री-प्रायमरी स्कूलचे रजिस्ट्रेशन शासनाकडे झाले पाहिजे. या प्रकरणी कायदा आणण्याची मागणी होत होती. त्यानुसार शालेय शिक्षण विभागाने तयारी पूर्ण केली आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. (तभा वृत्तसेवा)

### हॉलिवूड अभिनेते ग्रिझ चॅपमन यांचे निधन

**न्यू यॉर्क :** हॉलिवूडमधील लोकप्रिय अभिनेते ग्रिझ चॅपमन यांचे शुक्रवारी निधन झाले. ते दीर्घकाळापासून मूत्रपिंडाच्या गंभीर आजाराशी झुंज देत होते. त्यांच्या निधनामुळे चाहत्यांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. '३० रॉक' या लोकप्रिय सिटकॉममधील दमदार भूमिकेमुळे ग्रिझ चॅपमन यांना विशेष ओळख मिळाली होती. त्यांच्या सहज अभिनयशैलीमुळे त्यांनी प्रेक्षकांच्या मनात वेगळी जागा निर्माण केली होती. विनोदी आणि प्रभावी अभिनयामुळे त्यांचे लाखो चाहते होते.

ग्रिझ चॅपमन यांनी अभिनयासोबतच डिजिटल माध्यमातही स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांनी ग्रिझ क्रॉनिकल्झ नावाची युट्यूब मालिका सुरू केली होती. त्यात विनोदी लघुनाट्यांचे व्हिडीओ प्रेक्षकांपर्यंत पोहोचवले जात होते. याशिवाय त्यांनी 'ब्लू ब्लड्स', 'द गुड फाईट' व 'द ब्लॅकलिस्ट'यासारख्या अनेक गाजलेल्या मालिका आणि चित्रपटांमध्येही काम केले होते.

# सोलापूर जिल्ह्यातील ३२ लाख ८३ हजार मतदारांचे मॅपिंग पूर्ण

## मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम् यांच्याकडे सादर करण्यात आला आढावा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ मे-**

सोलापूर जिल्ह्यात एकूण ७७ हजार ८६ ब्लर फोटो व चुकीच्या नोंदी प्रकरणांपैकी ७२ हजार ६४८ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. जिल्ह्याच्या एकूण मतदार संख्येच्या ३२ लाख ८३ हजार ८११ मतदारांचे सखोल पुनर्निरीक्षण झालेले आहे. सरासरी प्रमाण ८३.२० टक्के इतके आहे. ग्रामीण भागात नोंदणी टक्केवारी ८७.२० टक्के असून शहरी भागात ७२.६७ टक्के आहे. याबाबतचा आढावा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त एस.चोक्कलिंगम् यांच्यासमोर मांडण्यात आला.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण देशासह महाराष्ट्र राज्यातही मतदार यादींच्या अचूकतेसाठी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम सुरू आहे. या कार्यक्रमाचा उद्देश म्हणजे प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट करणे, चुकीची नोंद दुरुस्त करणे तसेच अपात्र नावे वगळणे असा आहे. सोलापूर जिल्ह्यातील सर्व मतदार नोंदणी अधिकारी यांनी कोणत्याही पात्र मतदाराचे नाव मतदार यादीतून वगळले जाणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम् यांनी केले.

प्रारंभी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी एस. कार्तीकेयन यांनी पीपीटीद्वारे सादरीकरण केले. यावेळी जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी तथा प्रभारी उपजिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत पाटील, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय



कबाडे यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार उपस्थित होते.

मुख्य निवडणूक अधिकारी चोक्कलिंगम पुढे म्हणाले की, या अंतर्गत केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी घर भेटी मध्ये नागरिकांना गणना फॉर्म दिल्यानंतर तो त्यांच्याकडून लगेच भरून घ्यावा. नागरिकांनी सोबत आवश्यक पुरावे दिल्यास तेही घ्यावेत. मतदार यादीतील नावात विसंगती असेल तसेच अविवाहित मतदार असतील अशा ठिकाणी डॉक्युमेंट आवश्यक आहेत. बीएलओ व सुपरवायझर यांचे व्यवस्थित प्रशिक्षण मतदार अधिकाऱ्यांनी घेतले पाहिजे. बीएलओंनी नागरिकांच्या घरोघरी भेटी देत असताना त्यांच्याशी व्यवस्थितपणे बोलून मतदार यादी गणना माहिती सांगावी.

काही ठिकाणी मतदार यादीतील मतदारांचे पत्ते एकाच ठिकाणावर असल्याचे निर्देशनास आलेले आहे, त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी व महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या अंतर्गत प्रत्येक घराचे नंबरिंग यंत्रणेकडून करून घ्यावे. मतदार यादीतील दुरुस्तीसाठी प्रत्येक बीएलओ यांच्याकडे ब्लॅक इमरेशन फॉर्म ठेवा. नव्याने अठरा वर्षे पूर्ण झालेल्या नागरिकांचे मतदार यादीत नोंद करून घ्या. ज्याठिकाणी मॅपिंग कमी झालेले आहे अशा ठिकाणी लक्ष ठेवावे व त्या ठिकाणी कामाची गती वाढवावी, अशा सूचना चोक्कलिंगम यांनी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तीकेयन म्हणाले, जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघांची संख्या ११ असून लोकसभा मतदारसंघ २ आहेत. एकूण मतदारसंख्या ३९ लाख ४६ हजार ७८१ असून त्यात पुरुष वीस लाख दहा हजार ९४८, महिला १९ लाख पस्तीस हजार पाचशे पाच व इतर ३२८ मतदारांचा समावेश आहे. जिल्ह्यात ३७२३ मतदान केंद्रे कार्यरत आहेत.

### सहा ठिकाणी मतदान केंद्रे

महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदार संघसाठीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला आहे. या अनुषंगाने जिल्ह्यात ६१६ मतदार आहेत. दि.२५ मे ते २ जून या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालयात नामनिर्देशन अर्ज स्वीकारले जाणार असून सहा ठिकाणी मतदान केंद्रे तर नियोजन भवन येथे मतमोजणी होणार आहे.

# कोळसा खाणीत स्फोट, ९० मजूर ठार

## चीनच्या शांक्सी प्रांतातील घटना ● अडीचशेपेक्षा अधिक जण अडकले ● जिनपिंग यांनी दिला चौकशीचा आदेश

**बीजिंग, २३ मे**

चीनच्या उत्तर भागातील शांक्सी प्रांतात असलेल्या लिउशेन्यू कोळसा खाणीमध्ये शुक्रवारी रात्री उत्खननावेळी झालेल्या भीषण स्फोटात ९० कामगारांना मृत्यू झाला, तर २५० पेक्षा अधिक खाणीत अडकले आहे. खाणीत अकडलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी यद्धपातळीवर बचावकार्य सुरू आहे. या घटनेची गंभीर दखल घेत राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी चौकशीचा आदेश दिला आहे.



जमिनीखाली असलेल्या खाणीत उत्खननाचे काम सुरू असताना स्फोट झाल्याचे वृत्तसंस्थेने एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीच्या आधारे दिली आहे. रात्रभर सुरू असलेल्या बचाव अभियानादरम्यान, शनिवारी सकाळपर्यंत ९० कामगारांचे मृतदेह आणि २०१ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आले, तर २५० जण अजूनही खाणीमध्ये अडकलेले आहेत. खाणीत अडकलेल्यांपैकी काही मजुरांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. जिनपिंग यांनी अपघातानंतर बचाव पथकांना बेपत्ता लोकांना शोधण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा निर्देश दिला.



अपघातास जबाबदार असलेल्या लोकांना सोडणार नाही असा इशारा त्यांनी निवेदनातून दिला. स्फोटाचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट असले तरी, प्राथमिक तपासात खाणीतील कार्बन मोनॉक्साईडची पातळी परवानगी असलेल्या मर्यादेपेक्षा खूप जास्त असल्याचे उघड झाले आहे.

**शांक्सी प्रांतात यापूर्वीही अपघात**

शांक्सी प्रांत चीनमधील सर्वांत मोठा कोळसा उत्पादन क्षेत्र मानला जातो. देशाच्या ऊर्जा गरजांचा मोठा भाग येथील खाणींमधून पूर्ण होतो.

मात्र, सततच्या उत्पादनाच्या दबावामुळे येथील सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

गेल्या महिन्यातही शांक्सीच्या लुलियांग परिसरात एका खाणीत अपघात झाला होता, यात चार मजुरांचा मृत्यू झाला होता. २०२५ मध्ये कोळसा खाणीत झालेल्या स्फोटात ५० मजुरांना जीव गमवावा लागला. *(वृत्तसंस्था)*

### जबाबदार अधिकाऱ्यावर होणार कारवाई

चीनचे पंतप्रधान ली च्यांग यांनी सांगितले की, बेपत्ता मजुरांना शोधण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहे. अपघातामागील कारणांची चौकशी करण्याची आणि जबाबदार असलेल्या लोकांवर कारवाई करण्याचा आदेश प्रशासनाला दिला आहे. उपपंतप्रधान झांग गुओकिंग आणि स्थानिक प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारीही घटनास्थळी पोहोचले आहेत आणि मदत व बचाव कार्यावर ते लक्ष ठेवून आहेत.

### कार्बन मोनॉक्साईड वायूमुळे स्फोटाची शक्यता

खाणीत कार्बन मोनॉक्साईड वायूची पातळी खूप वाढली होती. यामुळेच स्फोट झाल्याची माहिती समोर आली आहे. सध्या या अपघाताच्या मूळ कारण शोधण्यासाठी चौकशी सुरू आहे. जिनपिंग यांनी म्हटले की, सर्व क्षेत्रांनी आणि सरकारी विभागांनी या अपघातातू धडा घ्यावा, कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेबाबत सतर्क राहावे आणि मोठ्या घटना टाळण्यासाठी धोक्यांची पूर्ण चौकशी करावी.

# ममतांचा आवडता पुतळा पाडला

## विचित्र अन् निरर्थक डिझाईन



**कोलकाता, २३ मे**

कोलकाता येथील सॉल्ट लेक स्टेडियममध्ये माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी विचित्र आणि निरर्थक डिझाईन केलेला पुतळा पाडण्यात आला. या पुतळ्यात शरीरापासून वेगळे झालेले दोन पाय आणि त्यावर एक फुटबॉल बनवला होता. हा पुतळा २०१७ मध्ये फिफा अंडर-१७ वर्ल्ड कपपूर्वी बसवण्यात आला होता. यावर मागील तृणमूल सरकारचा विश्व बांग्ला लोगो देखील होता.



सुरुवातीपासूनच हा पुतळा वादात सापडला होता. अनेक लोक आणि फुटबॉल चाहते या विचित्र डिझाईनला अत्यंत वाईट आणि कुरूप म्हणत होते. नवीन मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांनी शपथविधीच्या दुसऱ्या दिवशी सांगितले होते की, आम्ही हा पुतळा पाडू. मूर्तीच्या खाली माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे नावही लिहिलेले होते.

पश्चिम बंगालचे क्रीडा मंत्री निसिथ प्रामाणिक यांनी सांगितले होते की, या कुरूप आणि निरर्थक संरचनेचा या स्टेडियमच्या सौंदर्याशी काहीही संबंध नाही. अनावरण झाल्यापासून या पुतळ्यावर वाद उफाळला होता. चाहत्यांनी डिझाईनवर प्रश्न उपस्थित केले होते. सॉल्ट लेक स्टेडियमवरील कुरुप रचना आठवते का, दिलेल्या आश्वासनाप्रमाणे ती हटवण्यात आली, अशी पोस्ट भाजपाच्या नेत्या केया घोष यांनी पुतळा हटवल्यानंतर 'एक्स'वर केली. *(वृत्तसंस्था)*

# तुलसी गबार्ड यांचा राजीनामा

**वॉशिंग्टन, २३ मे -**

अमेरिकेच्या राष्ट्रीय गुप्तचर विभागाच्या संचालक तुलसी गबार्ड यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. हा निर्णय आपल्या पतीच्या गंभीर आजारामुळे घेतल्याचे त्यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.. गबार्ड यांनी शुक्रवारी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेतली आणि राजीनामा त्यांच्याकडे सोपवला. गबार्ड यांनी आपल्या पत्रात ट्रम्प यांचे आभारही मानले आणि सांगितले की, राष्ट्रीय गुप्तचर कार्यालयाचे नेतृत्व करणे त्यांच्यासाठी सन्मानाची बाब होती. गबार्ड यांचे पती एका अत्यंत दुर्मिळ हाडांच्या कर्करोगाशी झुंज देत असल्याने त्यांनी हा निर्णय घेतल्याचे वृत्तसंस्थेने म्हटले आहे. गबार्ड यांनी त्यांच्या ११ वर्षांच्या वैवाहिक जीवनाचा उल्लेख करताना 'एक्स'वरील पोस्टमध्ये सांगितले की, अब्राहम (पती) नेहमीच त्यांचे सर्वांत मोठे आधार राहिले आहेत. पूर्व आर्फिकेत माझी नियुक्ती असो, कोणतीही राजकीय मोहीम असो किंवा या पदावर माझी सेवा असो. प्रत्येक कठीण प्रसंगात ते माझ्यासोबत खंबीरपणे उभे राहिले.

# भारतीय हद्दीत घुसताना दोन पाकिस्तानी पकडले

## सीमा ओलांडताना एक ठार; दोघेही लाहोरचे रहिवासी

**अमृतसर, २३ मे**

कारमधून भारतीय हद्दीत घुसताना दोन पाकिस्तानी नागरिकांना सुरक्षा दलाने पकडले, तर दुसऱ्या एका घटनेत, सीमा ओलांडताना एक पाकिस्तानी घुसखोर ठार झाला. अटक केलेले घुसखोर लाहोरचे रहिवासी असून, दोघांची अमृतसरमध्ये चौकशी सुरू आहे.

सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) एका अधिकाऱ्याने सांगितले की, शुक्रवारी रात्री पाकिस्तानच्या सीमेवर दोन वेगवेळ्या घटना घडल्या. एका घटनेत, कारमधून दोन पाकिस्तानी नागरिक पंजाब सीमेवरून भारतीय हद्दीत घुसले आणि त्यांना जवानांनी ताब्यात घेतले. दुसऱ्या घटनेत, आणखी एका पाकिस्तानीने सीमा ओलांडली आणि बीएसएफने त्याला ठार केले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये लाहोरमधील फिरोजपूर रोडवरील नास्टर कॉलनीचा रहिवासी मोहम्मद सलीम आणि लाहोरमधील गाझी रोडवरील जशीन टाऊनचा रहिवासी आमिर नवाजचा समावेश आहे. एका सामाजिक सेवा संस्थेचे कार्यकर्ते असल्याचा दावा करणारे हे दोघे गावातील मुलांना शैक्षणिक पुस्तके वाटण्यासाठी आले होते, परंतु चुकून रस्ता चुकल्याने ते भारतीय हद्दीत आल्याचे त्यांनी चौकशीत सांगितल्याची माहिती खालदा पोलिस ठाण्याचे अधिकारी बलजिंदर सिंग यांनी दिली. हा पूर्वनियोजित प्रयत्न होता का, याचाही तपास केला जात आहेत. बीएसएफने या घटनेची माहिती पाकिस्तानी रेंजर्सना दिली आहे. सध्या अमृतसर सेक्टरमध्ये दोघांची चौकशी सुरू आहे. *(वृत्तसंस्था)*

सत्यमेव जयते | महाराष्ट्र शासन

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

देशाचे जबाबदार नागरिक बनूया, घनकचरा व्यवस्थापनाचे नियम पाळूया.

महाराष्ट्रात १ एप्रिल २०२६ पासून 'घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६' ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे.

**घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ अंतर्गत**

'बल्क वेस्ट जनरेटर (बीडब्ल्यूजी)' म्हणजे काय?

- दररोज सरासरी १०० किलोपेक्षा अधिक कचरा निर्माण करणाऱ्या इमारती/आस्थापना
- दररोज ४० हजार लिटर पाण्याचा वापर करणाऱ्या इमारती
- २० हजार चौरस मीटरपेक्षा अधिक बांधकाम क्षेत्रफळ असलेल्या इमारती

**'बल्क वेस्ट जनरेटरनी (बीडब्ल्यूजी)' करावयाच्या गोष्टी**

- राज्यातील सर्व 'बल्क वेस्ट जनरेटरनी (बीडब्ल्यूजी)' तात्काळ आपल्या आस्थापनेची ऑनलाइन पोर्टलद्वारे नोंदणी करणे अनिवार्य.
- 'बल्क वेस्ट जनरेटरनी (बीडब्ल्यूजी)' ओला कचरा, सुका कचरा, सॅनिटरी व विशेष काळजी योग्य कचरा अशा चार प्रकारांत आपल्या परिसरातच कचऱ्याचे विलगीकरण व प्रक्रिया करणे गरजेचे.
- इमारतीच्या परिसरात सध्या अस्तित्वात असलेल्या 'बल्क वेस्ट जनरेटरनी (बीडब्ल्यूजी)' प्रक्रिया न करता येणाऱ्या ओल्या कचऱ्याच्या विल्हेवाट व व्यवस्थापनेसाठी प्रक्रिया करणाऱ्या संबंधित आस्थापना/महानगरपालिका/नगरपालिका यांच्याकडून प्रमाणपत्र मिळवावे.
- 'बल्क वेस्ट जनरेटरनी (बीडब्ल्यूजी)' जैव-वैद्यकीय कचरा अधिकृत संस्थेकडे द्यावा.

- महापालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायत आणि अधिसूचित क्षेत्रांना लागू
- ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजी योग्य असे चार प्रकारात कचऱ्याचे वर्गीकरण आवश्यक
- घर व आस्थापनांमधून कचरा संकलन अनिवार्य
- मोठ्या कचरा उत्पादकांनी स्वतःच्या कचऱ्याचे व्यवस्थापन करणे आवश्यक
- कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावणे बंधनकारक
- कंपोस्टिंग आणि बायोमिथनेशनला प्रोत्साहन दिले जाणार
- सुका कचरा पुनर्वापरासाठी पाठवणे आवश्यक
- फक्त नॉन-रिसायकल आणि निष्क्रिय कचऱ्याचीच लँडफिलमध्ये विल्हेवाट लावली जाणार
- उघड्यावर कचरा टाकण्यास बंदी
- कचरा वाहतुकीसाठी बंद वाहने वापरणे आवश्यक
- मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी (MRF) उभारणे आवश्यक
- Reduce-Reuse-Recycle केंद्रांना प्रोत्साहन दिले जाणार
- सिंगल यूज प्लास्टिकविरोधात कडक कारवाई केली जाणार
- नियम मोडल्यास दंड व वापर शुल्क आकारले जाणार




एक पाऊल प्रदूषणमुक्त महाराष्ट्रासाठी!

@mpcb_official @MPCBOfficial

संपूर्ण तपशीलासाठी https://mpcb.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.

VENTURES

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत


https://epaper.dainiktarunbharat.com/



## रोखठोक

**दिनेश गुणे**

# पहिला दगड मारण्याआधी...



कोणत्याही जीवनशैलीची एक चौकट असते. व्यक्ती, कुटुंब, समाज आणि व्यवस्था हे त्या चौकटीचे कोन असतात. यामुळे जीवनशैली परिपूर्ण होते. कोणताही समाज व्यक्ती आणि कुटुंबाविना पूर्ण होत नाही. समाज म्हणजे व्यक्ती आणि कुटुंबांचा समूह असतो आणि जीवनशैलीची घडी विस्कटू नये याकरिता या समूहातूनच व्यवस्था निर्माण केली जाते. म्हणजेच, व्यवस्था आणि समाज या भिन्न बाबी नाहीत. व्यवस्था हादेखील समाजाचाच एक भाग असतो आणि समाजातूनच व्यवस्थेची उभारणी केली जात असते. जेव्हा समाज व्यवस्थेवर नाराज होतो, व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवू लागतो, तेव्हा मात्र, समाज आणि व्यवस्था यांचे अस्तित्व वेगळे असल्याचा संभ्रम निर्माण होतो. समाज हा संवेदनशील असतो. अन्याय, अत्याचार, व्यभिचार, भ्रष्टाचार या बाबी समाजास सहन होत नाहीत. तरीही, हजारो वर्षांपासून अन्याय, अत्याचार होतच राहिले आहेत आणि या बाबींच्या विरोधातील समाजाची संवेदनशीलताही उघड होत गेली आहे. म्हणूनच, येशू ख्रिस्ताच्या काळातील हजारो वर्षांपूर्वीच्या, बायबलमधील त्या कथेचा संदर्भ आजही दिला जातो. त्या काळातील समाजातही व्यभिचार, भ्रष्टाष्टाचार, अन्याय, अत्याचार होत होते आणि तेव्हाही संवेदनशील समाज त्याविरुद्ध पेटून उठत होता. बायबलमधील ती प्रसिद्ध बोधकथा हे त्याचेच उदाहरण आहे. एका महिलेवर व्यभिचाराचा आरोप होतो, तेव्हा समाजात प्रचंड संताप प्रकट होतो. त्या महिलेस भर चौकात शिक्षा करावी असे ठरते आणि दगडांनी ठेचून मारण्यासाठी तिला चौकात आणले जाते. व्यभिचारी महिलेस होणाऱ्या शिक्षेची कार्यवाही पाहण्यासाठी लोकांची चौकात गर्दी होते आणि गर्दीतील प्रत्येक जण हातात दगड घेऊन शिक्षेच्या कार्यवाहीचे भागीदार होण्यासाठी उभा राहतो. अशा व्यभिचारी महिलेस शिक्षा देण्याची समाजाची मानसिकता म्हणजे, एक प्रकारे संवेदनशील समाजाचा व्यभिचाराविरुद्धचा संतापच असतो. पुढच्या काही क्षणांत शिक्षेची कार्यवाही सुरू होणार असते. प्रत्येक जण आपल्या हातातील दगड उंचावतो, तेवढ्यात गर्दीतून येशूचा आवाज येतो, ''ज्याने आयुष्यात कोणतेच पाप केलेले नाही, त्याने पहिला दगड मारावा!'' उंचावलेले हात खाली येतात, गर्दीतील संवेदनशील माणसांच्या माना लाजेने खाली जातात आणि बघता बघता गर्दी पांगते. लोक घरी परततात.

शिक्षा देणारी व्यवस्था आणि समाज यांची दोन रूपे या कथेच्या निमित्ताने आजही स्पष्ट दिसतात. महाराष्ट्रात पुणे जिल्ह्यातील एका गावात सुट्टीच्या निमित्ताने मामाच्या घरी गेलेल्या साडेतीन वर्षांच्या एका चिमुरडीला गोठ्यातले गायीचे वासरू दाखवतो म्हणून आडोशाला घेऊन गेलेल्या भीमराव कांबळे नावाच्या ६५ वर्षांच्या वृद्धाने तिच्यावर पाशवी बलात्कार केला आणि तिला ठार मारून तिचा देह शेणाच्या ढिगाऱ्याखाली लपविला. मुलगी बेपत्ता झाल्याचे लक्षात आल्यावर तिचा शोध सुरू झाला आणि ती सापडली नाही तेव्हा गावकरी व्यवस्थेच्या विरोधात संतापाने पेटून उठले. गावात असंतोष खदखदू लागला. ग्रामस्थांनी स्वतःच शोधमोहीम सुरू केली आणि तो भीमराव कांबळेदेखील गावकऱ्यांच्या शोधमोहिमेत सहभागी होऊन मुलीला शोधण्याचे नाटक करू लागला. आपणच गुन्हा केला आहे असा संशय येऊ नये म्हणून गर्दीत वावरताना तो लोकांना उलटसुलट माहिती देऊन व संशयास्पद उत्तरे देऊन लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत होता. आपला संशय येऊ नये म्हणून तो अत्यंत शांत आणि सामान्य राहून समाजाचा विश्वास जिंकण्याचा प्रयत्न करत होता आणि त्यामुळेच संशयाची सुई त्याच्याकडे वळली. एका सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील फुटेजमुळे तो संशय पक्का झाला आणि भीमराव कांबळेचा मुखवटा उतरला. तोपर्यंत तो संवेदनशील समाजाचा एक भाग म्हणून वावरत होता. मुलीचा शोध घेणाऱ्या व्यवस्थेचा भाग म्हणून त्यामध्येही तो शहाजोगपणे सहभागी झाला होता. पण तोच आरोपी आहे हे स्पष्टपणे उघडकीस आले, तेव्हा तो व्यवस्थेच्या आणि समाजाच्या दुसऱ्या बाजूचा भाग झाला. व्यवस्था आणि समाज यांचे वेगळेपण हे असे असते. जेव्हा कोणतीही व्यक्ती समाजाचा भाग म्हणून वावरत असते, तेव्हा ती व्यवस्थेच्या विरोधात आवाज उंचावते, अन्यायाविरुद्ध दंड थोपटून समाजाच्या असंतोषाचा भाग बनते, पण तीच व्यक्ती जेव्हा समाजातून बाहेर पडून व्यवस्थेच्या खुर्चीवर बसते, तेव्हा समाजाच्या असंतोषाचे लक्ष्य बनते. म्हणजेच, ज्या व्यवस्थेच्या विरोधात समाज नेहमी पेटून उठतो, कोणत्याही अन्याय, अत्याचाराविरोधात व्यवस्थेस जाब विचारतो, ती व्यवस्था म्हणजे समाजाचीच दुसरी बाजू असते.

ज्याने कधीच पाप केले नाही त्यानेच व्यभिचारी महिलेस दगड मारावा असा निर्णय देऊन या व्यवस्थेला आरसा दाखविण्याचे काम हजारो वर्षांपूर्वीच्या त्या कथेतून केले गेले, म्हणून ती कथा आजही कालसुसंगत ठरते. आज समाजात व्यवस्थेविरुद्ध असंतोष उमटलेला दिसतो. त्या असंतोषाला वाचादेखील फुटते आहे. समाजातील भ्रष्ट लोकांनी बनावट बुरखे पांघरूण काही व्यवस्थांमध्ये शिरकाव केल्याची खंत व्यक्त करताना भारताच्या सरन्यायाधीशांनी केलेल्या एका कथित वादग्रस्त वक्तव्यानंतर संवेदनशील समाज असाच खवळून उठला. समाजमाध्यम नावाच्या मंचावर या संतापाचे तीव्र पडसाद उमटू लागले आहेत आणि व्यवस्थेच्या विरोधात आवाज उठविण्याचा हाकारादेखील सुरू झाला आहे. या सुरात सूर मिसळून समाजाने आता व्यवस्थेला धडा शिकविण्यासाठी हात उगारले आहेत. अशा वेळी बायबलमधील त्या कथेचा संदर्भ आठवतो आणि एक प्रश्न उभा राहतो, 'व्यवस्थेच्या विरोधात पेटून उठणाऱ्या समाजासमोर आरसा धरण्याची गरज निर्माण झाली आहे का?' ज्या व्यवस्थेच्या विरोधात समाज पेटून उठतो आहे, ती व्यवस्था समाजाच्या जीवनशैलीतूनच उभी राहिलेली असेल, तर व्यवस्थेच्या बिघडलेल्या घडीसाठी जबाबदार नेमके कोण असणार आहे, या प्रश्नाचे उत्तर शोधणेदेखील गरजेचे आहे. गुन्हेगाराचा शोध घेणाऱ्या गर्दीत सहभागी झालेला कोणी स्वतःच गुन्हेगार असेल, तर तो व्यवस्थेला जाब कसा विचारू शकेल हा प्रश्नदेखील भीमराव कांबळेवरील गुन्ह्याच्या आरोपानंतर ठळकपणे अधोरेखित झाला आहे. पाप, पुण्य या कल्पना कालबाह्य होऊ लागल्या आहेत. त्याची चाडदेखील आता फारशी राहिलेली नाही. अन्यथा, येशू ख्रिस्ताने दिलेला निवाडा आजच्या समाजात दिला गेला, तर किती माना लाजेने खाली जातील आणि शिक्षा देण्याच्या आवेशाने उगारले गेलेले किती हात शरमेने खाली येऊन गर्दी घरोघरी जाईल, हा चिंतनाचा मुद्दा ठरेल.

व्यक्ती, कुटुंब, समाज आणि व्यवस्था यांचे चेहरे व मुखवटे यांतील फरक स्पष्ट करून दाखविणारे आरसे आसपास असतात. काचेच्या घरात राहणाऱ्यांनी दुसऱ्याच्या घरावर दगडफेक करू नये असा इशारा जेव्हा कोणीतरी अन्य कोणास देतो, तेव्हा तो आरसा दाखविण्याचा एक प्रयत्न असतो. हमाम में सब नंगे है, असाही दाखला काही प्रसंगी दिला जातो. त्यामुळे, व्यवस्था हा समाजाच्या आणि व्यक्ती, कुटुंबाचा भाग आहे, हे वेगळे सांगावे लागत नाही. अन्याय, अत्याचार, व्यभिचार, भ्रष्टाचार ही व्यवस्थेला लागलेली कीड आहे, म्हणजे ती समाजाला लागलेली कीड आहे आणि व्यक्ती, कुटुंब येथूनच त्याची सुरुवात झालेली आहे, हे उघड आहे. अन्यथा, व्यवस्थेला जाब विचारण्यासाठी सरसावणारे अनेक जण काचेच्या घरात राहतात, हे माहीत असूनही व्यवस्थेविरुद्धच्या संघर्षाचे नेतृत्व करावयास ते सर्वांत पुढे असले तरी त्याबद्दल फारशी तक्रार केली जात नाही. व्यवस्थेविरोधातील संघर्षात पहिला दगड कोणी मारावा हा मुद्दाच त्यामुळे कालबाह्य झाला आहे.


व्यक्ती, कुटुंब हा समाजाचाच घटक असतो, त्यामुळे तो व्यवस्थेचाच भाग असतो, त्यामुळे कुटुंब आणि व्यक्ती या व्यवस्थेलाही आता आरशात पाहावे लागेल, हे स्पष्ट आहे. अलिकडेच, सुमारे आठवडाभरापूर्वी, उत्तर प्रदेशातील अमरोहा जिल्ह्यातील एका गावात १८ वर्षांच्या एका नवविवाहितेने सासरच्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. आपल्या जीवाला धोका आहे अशा शंकेने भयभीत झालेल्या या तरुणीने आत्महत्या करण्याच्या काही तास अगोदर असहायपणे आपल्या जन्मदात्यास फोन करून घरी घेऊन जाण्याची विनवणी केली होती, असे सांगण्यात येते. माहेराहून दहा लाख रुपये घेऊन येण्यासाठी तिच्यापाठी पतीने आणि सासरच्यांनी तगादा लावला होता आणि त्यामुळेच प्रचंड मानसिक तणावातून तिने पित्याला माहेरी घेऊन जाण्याचे साकडे घातले आणि अखेर एका अगतिक क्षणी असहायपणे आपले आयुष्य संपविले. हा हुंडाबळीचा प्रकार असल्याचा आरोप तिच्या माहेरच्या माणसांनी केला आहे. गेल्या फेब्रुवारीमध्ये या तरुणीचा विवाह झाला, तेव्हा तिच्या पित्याने भरपूर हुंडा दिला होता, पण आणखी पैसे आणण्यासाठी तिचा छळ होत होता. या भयाखाली वावरणाऱ्या त्या तरुणीने त्या दिवशी रडत आपल्या पित्याला गाऱ्हाणे घातले, पण तिचा जन्मदाता तिला माहेरी नेण्याकरिता येण्याआधीच तिने गळफास घेऊन आपले आयुष्य संपविले होते. अशाच घटनेची पुनरावृत्ती त्याच दरम्यान महाराष्ट्रात नागपूरमध्ये उघडकीस आली. १९ वर्षांच्या एका नवविवाहितेचा सासरच्या मंडळींकडून हुंड्यासाठी छळ सुरू होता, त्या सूडातूनच तिच्यावर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली आणि हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाल्याचा कांगावा पोलिसांसमोर करण्यात आला. मृतदेहाच्या उत्तरीय तपासणीनंतर, तिच्या शरीरावरील झटापटीच्या खुणा आणि श्वास गुदमरल्यामुळे झालेल्या यातना यामुळे तिचा मृत्यू झाल्याचे खरे कारण उघड झाले. उत्तर प्रदेशात ग्रेटर नोएडामध्ये जालपुरा गावात एका नवविवाहितेस हुंड्यासाठी छळ करून ठार मारल्यानंतर, घराच्या तिसऱ्या मजल्यावरील गच्चीतून पडून मृत्यू झाल्याचा कांगावा करणाऱ्या कुटुंबाचा कट पोलिसांनी उघडकीस आणला. व्यक्ती, कुटुंब, हा समाजाचा, पर्यायाने व्यवस्थेचाच एक घटक असल्याने अशा घटना व्यवस्थेच्या शुद्धतेवरही प्रश्नचिन्हे उमटवणार हे स्पष्ट आहे. त्याच दरम्यान, उत्तर प्रदेशात अलिगड येथे घडलेली एक घटनादेखील व्यक्ती, समाज आणि व्यवस्था यांच्यासमोर आरसा धरणारी ठरली आहे. आपल्या मुलीस प्रियकरासोबत बोलत असताना पाहून चिडलेल्या पित्याने तिला बांधले आणि अर्धवट बेशुद्धावस्थेत असलेल्या आपल्या मुलीला मोटारसायकलवर टाकून बाजूच्या शेतात नेऊन तिची हत्या केली. तिचा मृतदेह तेथेच पुरला. दुसऱ्या दिवशी सकाळी मुलगी बेपत्ता झाल्याचा कांगावा करत शोधमोहिमेत सहभागी झाला. महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्यातील नसरापुरात साडेतीन वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करणाऱ्या व मृतदेहाची शेणाच्या ढिगाऱ्याखाली विल्हेवाट लावून गुन्हा लपवत व्यवस्थेस जाब विचारण्यासाठी गर्दीत सहभागी झालेल्या भीमराव कांबळेनेदेखील असेच केले होते.

वाराणसी येथील सरकारी निवारागृहात मे महिन्याच्या सुरुवातीस आत्महत्या करून आपले आयुष्य संपविणाऱ्या या कोवळ्या मुलीची कहाणी करुण आणि माणुसकी, व्यवस्था, व्यक्ती, समाज, कुटुंब या सर्वांवर प्रश्नचिन्हे उमटविणारी आहे. जौनपूरच्या एका भाजी विक्रेत्याच्या कुटुंबातील ही सर्वांत लहान मुलगी. आईच्या अकाली निधनानंतर पित्याच्या कमाईवरच पोट भरणाऱ्या या कुटुंबातील अन्याय आणि ओढगस्तीमुळे तणावाखाली असलेली ही जेमतेम १२ वर्षांची मुलगी एका क्षणी मित्राचा हात धरून घरातून पळून गेली. नातेवाईकांनी तिचा शोध घेऊन तिला घरी आणले, पण ती अस्वस्थ होती. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये तिने भावासोबत जौनपूरचे पोलिस ठाणे गाठले आणि कौटुंबिक लैंगिक हिंसाचाराचे एक अस्वस्थ करणारे प्रकरण उघडकीस आले. मारून टाकण्याच्या धमक्या देत या कोवळ्या मुलीवर वर्षभर लैंगिक अत्याचार करणाऱ्या तिच्या बापानेच त्याच्या दुसऱ्या मुलीलाही आपल्या वासनेची शिकार केले होते. त्यानंतर त्या मुलीचा मृत्यू झाला आणि घाबरलेल्या या पीडित मुलीने पोलिसांना साकडे घातले. अत्याचारी बापास अटक होऊन शिक्षा झाली आणि पीडित मुलीस वाराणसीच्या सरकारी निवारा केंद्रात दाखल करण्यात आले. जबर मानसिक आघाताखाली असलेल्या या मुलीच्या वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यावर निवारा केंद्रातून बाहेर पडावे लागेल आणि बाहेरच्या जगात आपल्या जवळचे कोणीच नसल्याने येथून बाहेर पडल्यानंतर आपण समाजात सुरक्षित राहणार नाही, या भीतीने तिने निवारा केंद्रातच आत्महत्या केली. वाढत्या वयाची समज येण्याआधीच खडतर संघर्ष करत जगण्याच्या भयाने जीवन संपविणाऱ्या या मुलीने एका भीषण सामाजिक वास्तवाचे रूप दाखवून दिले आहे. तिची कहाणी पचविणे समाजासाठी सोपे नाही. लैंगिक अत्याचाराची शिकार होणाऱ्या बालकांच्या मानसिक स्थितीचे एक अस्वस्थ चित्र तिच्या कहाणीतून उमटले आहे आणि त्यातून समाज व व्यवस्थेस काही प्रश्नदेखील विचारले गेले आहेत. अनेकदा, अशा अत्याचाराविरोधात बळी पडणाऱ्यांना गप्प राहण्याचे सल्ले समाजातून किंवा कुटुंबाकडून दिले जातात. समाजात तोंड दाखवायला जागा राहणार नाही, समाज कोणत्या नजरेने पाहील, अशी भीती जेव्हा पीडितांना आणि त्यांच्या कुटुंबांना सतावते, तेव्हा प्रश्नचिन्हांचा रोख साहजिकच, समाजाकडेही वळलेला असतो. अशा असंख्य पीडिता तोंड दाबून समाजात वावरत असतात. त्यामुळे, व्यवस्थेला प्रश्न विचारण्यासाठी सरसावलेल्या समाजातून, पहिला दगड मारण्यासाठी कोण पुढे येणार हा प्रश्न विचारण्याचीही गरज आता निर्माण झाली आहे. ▮

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### सुरक्षित भविष्यासाठी जन आक्रोश




जन आक्रोश ही संस्था गेल्या १४ वर्षांपासून महिन्यातील दर बुधवारी नागपुरातील चौकांमध्ये एक तास सिग्नलवर वाहनचालकांशी संवाद साधून वाहतुकीचे नियम पाळण्यासाठी विनंती करते. मागील सहा महिन्यांपासून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याकरिता दर शनिवारी सुद्धा चौकात प्रबोधन सुरू केले आहे. संस्थेचे सगळे सदस्य सातत्याने नि:स्वार्थपणे काम करत आहेत. सोबतच इतर दिवशी शाळा, महाविद्यालये, ट्युशन क्लासेस, आयटीआय, पोलिस ट्रेनिंग स्कूल, होमगार्ड, नर्सिंग कॉलेज व अन्य ठिकाणी ५० मिनिटांचे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे वाहतूक नियमांचे महत्त्व व ते न पाळल्यास त्यामुळे होणाऱ्या परिणामांची माहिती देण्यात येते. नागरिकांच्या या प्रबोधनातून दररोज होणारे रस्ते अपघात कमी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. नागपुरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या उन्हाळी संस्कार शिबिरांमध्ये 'जन आक्रोश फॉर बेटर टुमारो' या संस्थेमार्फत सामाजिक बांधिलकी या नात्याने वाहतूक नियम आणि शिस्तीबद्दल शिबिरार्थींना प्रबोधन करण्यात आले.

वाहतुकीचे नियम सगळ्याच वाहनचालकांना नक्कीच माहीत आहेत. तरुणाईच नाही तर सर्व वयोगटातील वाहनचालक नियम तोडताना आपण पाहतो. म्हणून बालसंस्कार वर्गात प्रबोधन करून मुलांच्या पालकांपर्यंत पोहोचून वाहतूक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे, हा संदेश पोहोचवण्यासाठी हा उपक्रम सुरू केला आहे. मराठीत म्हण आहे 'कळते पण वळत नाही.' तेव्हा नि:शुल्क शिबिराचा लाभ घ्यावा व होणारे अपघात टाळण्यास मदत करावी. तसेच नागपूरमध्ये शौर्य शिबिर, क्रिकेट कोचिंग, उन्हाळी ट्युशन क्लासेस यांनी सुद्धा जन आक्रोश या संस्थेच्या माध्यमातून लहान वयापासून वाहतूक नियम पालनाचे धडे गिरवावे. यामुळे रस्ते अपघात कमी होतील असा विश्वास आहे. काही दिवसांपूर्वी नागपुरातील जयताळा येथील मंगलमूर्ती चौकात जनप्रबोधन करण्यात आले. या उपक्रमाला उदंड प्रतिसाद मिळाला. जन आक्रोश संस्थेशी जुळण्यासाठी खालील नंबरवर संपर्क साधता येईल.

**रवींद्र कासखेडीकर**/९४२२१०५९११

●● ●●

### अशी पाखरे येती...

भल्या पहाटे प्रसन्न सूर्यकिरणांनी जाग येताच खिडकीत यावी चिऊताई... किती रम्य कल्पना आहे! सर्वांत जास्त समोर येणारा हा सर्वज्ञात पक्षी म्हणून हा उल्लेख? चिऊताई थेट घरात येते आणि पहाटे नैसर्गिक अलार्म लावून चिवचिवाट करते, ही दिवसाची सकाळची सुरुवात किती रम्य. किती गोड! यासाठी चिमणी असावी, दिसावी, चिमणी यावी आणि बागडावी अंगणी यासाठी चिमणी वाचावी! पक्ष्यांना निसर्गाने दिलेले ते पंख, त्यांचे आकाशात उडणे, मंजुळ कूजन, झाडावर नक्षीदार घरटी बनवणे इत्यादी कारणांनी पक्षी हे समस्त जीवसृष्टीत वेगळे ठरतात. पक्षी अनेक आहेत, त्यांचे नानाविध प्रकार आहेत. पण अशा किती पक्ष्यांची आपल्याला माहिती असते? अंदाजे १०-२० पक्ष्यांची नावे कुणीही सांगू शकेल, पण माझ्या नुकतेच वाचनात आलेल्या निशिकान्त ना. मायी लिखित 'अशी पाखरे येती' या पुस्तकात टिटवीपासून रामगंगापर्यंत तब्बल १०१ पक्ष्यांची माहिती समाविष्ट असल्याचे लक्षात आले. खरंच हे निसर्गनिर्मित पक्षिविश्व विलक्षण आहे. पक्षी माणसाला फार हानिकारक नसतात; माणूस मात्र त्यामानाने पक्ष्यांसाठी जास्त हानिकारक असतो. पूर्वीपासून जाळे, शिकार, पिंजरा आणि आपल्या जेवणाच्या थाळीत समावेश करणे यामार्गे बुद्धिमान माणूस पक्ष्यांचा दुनियेसाठी जास्त धोकादायक गणला जावा, हे किती भयावह आहे? याउलट कुणी पक्षिप्रेमी उन्हाळ्यात जलपात्र मोहीम सुरू करतात. कुणी दाणे टाकतात, ही त्यातल्या त्यात मोठी समाधानाची बाब आहे. पक्षी विहार करतात तरी एकोप्याने राहतात. पक्षी कधीही उपासमारीने मरत नाहीत; प्रसंगी ते ऋतुमानानुसार स्थलांतर करताना आढळतात. आकाशात शिस्तीत उडणारा पक्ष्यांचा थवा बघून तणावाचा निचरा होतो. पक्ष्यांची घरटी हा एक वेगळाच संशोधनाचा विषय निशिकान्त मायी यावेळी उद्धृत केला आहे. प्रत्येक पक्षी त्यांची वैशिष्ट्यपूर्ण घरटी कशी तयार करतात. इतर पक्ष्यांची घरटी बघून त्यांना काही बदल करण्याची इच्छा होत नसावी काय? पण अनुकरण करत बदल करणे हा मानवी स्वभाव असून पक्षी कधीच निसर्गाच्या विरोधात जात नाहीत, हे उल्लेखनीय. पक्ष्यांचा मृत्यू आकाशात विहार करताना नैसर्गिक पद्धतीने होतो. पक्षी कधीच घरट्यात मरून पडलेला आढळत नाही. शिकार आणि विजेच्या तारांमध्ये अडकून वगैरे अनैसर्गिक मृत्यू वगळता पक्ष्यांचा मृतदेह सापडत नाही. पक्षी अडकतात विजेच्या तारांमध्ये. कधी नायलॉन मांजांमध्ये, कधी मोबाईल इंटरनेटच्या अदृश्य जाळ्यांत आणि हा दुष्ट माणूस त्यांना जमिनीवर लोळवतो. असं म्हणतात पक्षी घरट्यात कधी मरून पडत नाही. याअर्थी ते उत्तुंग आकाशाला मिठी मारतानाच कधीतरी आकाशाशी एकरूप होत असावे काय? अशा निसर्गदूतांना जर कुणी निसर्गशत्रू पिंजऱ्यात बंदिस्त करीत असतील, कुणी विक्री तर कुणी चक्क शिकार करीत असतील तर बुद्धिशाली माणसाने हा स्वभाव बदलणे गरजेचे आहे. झाडांची कत्तल करून बहुमोल निसर्गाशी प्रतारणा करून धूर्त मानव निसर्गाचा समतोल बिघडवत आहे. परिणामी निसर्गात अनेक बदल घडत आहेत. यावर मूकपणे पक्षी त्यांच्या परीने उपाययोजना करून निसर्गाच्या कार्याला हातभार लावत आहेत. हे पक्ष्यांचे मानवावर किती मोठे उपकार! विद्यार्थ्यांनाही उपयोगी पडू शकणारी पक्ष्यांची माहिती उपलब्ध करून दिल्याबद्दल निशिकान्त मायी यांचे अभिनंदन करायलाच हवे.

**मो. बा. देशपांडे**/८३२९१९३५४२

●● ●●

### मनाची विश्रांती

दैनंदिन ताणतणाव कमी करण्यासाठी आणि जेवणाचा आनंद घेण्यासाठी एखादी आवडती मालिका लावणे, काहीतरी हलकं-फुलकं आणि रिलॅक्स करणारं चित्रण बघणं कुणाला आवडणार नाही? अनेक कुटुंबांमध्ये एक नियम म्हणजे जेवण करताना टीव्हीवर आवडती मालिका लावणे. हे एक व्यसन नाही तर व्यासंग म्हणावा लागेल. यामागे एक सोपी आणि खूप महत्त्वाची सायकोलॉजी लपलेली आहे. वारंवार बघण्यासाठी आवड असणाऱ्या मालिकांना मानसशास्त्रात 'कम्फर्ट व्ह्यूईंग' किंवा 'पॅरासोशल रिलेशनशिप' म्हणतात. नॉस्टॅल्जिया आणि बंध यात समाविष्ट होतो. अनेक मालिकांमध्ये आदर्श समाजाचे उदाहरण असल्याचे दिसून येते. वाटते की, हे 'आपलेच' लोक आहेत. वारंवार पाहिल्याने या पात्रांशी एक भावनिक बंध निर्माण होतो. जुने एपिसोड्स पाहिल्याने 'नॉस्टॅल्जिया' वाढतो आणि एक सकारात्मक भावना मिळते. सुसंगतीची गरज आणि करुणेचा भाव या मालिकेची पद्धत कधी बदलत नाही. प्रत्येक एपिसोडमध्ये एखादी काल्पनिक नाही तर वस्तुस्थितीशी निगडित अशी समस्या येते; ती सोडविली जाते आणि शेवटी सर्व काही ठीक होते. एक सकारात्मक संदेश दिला जातो. प्राधान्याने हीच सुसंगती प्रेक्षकांना आवडते आणि जीवनातील अनिश्चिततेमध्ये एक मानसिक आधार देते. तुम्ही तीच मालिका पुन्हा पाहता, जेव्हा तुम्हाला कथा माहीत असते. त्यामुळे मेंदूला नवीन माहितीवर प्रक्रिया करावी लागत नाही. यामुळे मनाला खूप सुरक्षित आणि आरामदायी वाटते. जेवताना किंवा तणावात असताना मेंदूला विश्रांती हवी असते आणि आपल्या आवडीची मालिका नेमकी तीच विश्रांती अनुभवायला भाग पाडते. ती आपल्याला एका सुरक्षित जगात नेते, जिथे तुम्हाला कथेबद्दल विचार न करता फक्त मनोरंजनाचा आनंद घेता येतो. तेव्हा लक्षात ठेवा की, जेवताना टीव्हीवर मालिका पाहताना केवळ तुमची आवड नाही, तर तुमच्या संगोपनाची, मनोरंजनाची अन् मनाच्या विश्रांतीची नैसर्गिक गरज म्हणून पाहतो आहोत; जिचा उद्देश केवळ आनंद आणि आनंदच असतो.

**धनश्री विवेक ठाकरे**/पुणे, ७५१७७९९०५७

●● ●●

### टोपल्या घ्या... परड्या घ्या...!

कुणाचं आयुष्य कसं सरेल हे नियतीच्या न्यायावर अवलंबून असलं, तरी बऱ्याच वेळा नियतीचा न्याय का कोणास ठावूक उफराटाच वाटतो. बालपणीचे वय कसे निघून जाते ते कळतही नाही. ही दुनिया फार वेगळी असते; मात्र त्या वयातली काही समज मोठ्यांनाही चक्रावून टाकणारी असते. मी १०-१२ वर्षांचा असताना आमच्या गल्लीत डोक्यावर एकमेकांवर ठेवलेल्या टोपल्या आणि बगलेत एक गाठोडं घेऊन एक बाई नियमितपणे यायची. तिच्याबरोबर परकर-पोलक्यात आठ-नऊ वर्षांची चुणचुणीत मुलगी असायची. तिचा एक हात आईच्या हाताला धरलेला आणि दुसरा डोक्यावर असलेल्या टोपल्यांना धरलेला असायचा. गल्लीत आल्याबरोबर ती 'डालकं घ्याऽ टोपल्या घ्याऽऽ परड्या घ्याऽऽऽ' असे अतिशय गोड आवाजात म्हणायची. ती आमच्या ओट्यावर बसायची. डोक्यावरच्या टोपल्या बाजूला ठेवून गाठोडेही एका बाजूला ठेवायची. शेजारी ती मुलगीही बसायची. काही टोपल्यांची आणि एक-दोन परड्यांची विक्री व्हायची. धान्य ठेवण्यासाठी मोठमोठ्या कोठ्याही आम्ही बनवतो, असे म्हणायची. या कोठ्यांचा फायदा म्हणजे धान्याला हवाही लागते अन् खराबही होत नाही. एका बाबतीत ती फार भाग्यवान होती. तिच्या नवऱ्याच्या हातात रंगीबेरंगी चटया तयार करण्याची कला होती. मोठमोठ्या बैठक खोलींसाठी खूप छान चटया तयार करण्याचे कौशल्य तिच्या नवऱ्याच्या हातात होते. येणाऱ्या बायका काही वेळेला हाताने दाखवून अशी टोपली हवी, असे सांगायच्या तेव्हा ती तिथल्या तिथे गाठोड्यातून बांबूच्या काड्या काढून टोपली विणायला सुरुवात करायची. तिच्या हातांची बोटे इतक्या वेगाने चालायची की, पाहणारा अवाक् होऊन जायचा. इतकंच काय, कोणी परडी सांगितली की ती छोटीशी चिमुरडी तिथल्या तिथेच परडी करायला सुरुवात करायची. तिच्या हातांची बोटेही अतिशय वेगाने काम करायची. तिचा नवरा बांबू दोन-तीन दिवस ओले करून ते तासून छान काड्या काढायचा. एके दिवशी ती मुलीला घेऊन रिकाम्या हातांनी आली. गुजरातमधल्या एका व्यापाऱ्याने चांगल्या भावाने चटया तसेच टोपल्या खरेदी करण्याचे आश्वासन दिल्याने आम्ही आठ दिवसांनी तिकडे जाणार आहोत, असे तिने सांगितले.

सहा दिवसांनी दोघे नवरा-बायको मुलीसह आमच्या घरी आले. तिच्या डोक्यावर खूप वेगळ्या आकाराच्या सुंदर दोन टोपल्या अन् मुलीच्या डोक्यावर झाकण असलेल्या दोन सुरेख परड्या होत्या. आईने त्यांना बैठकीत बोलाविले. 'दोन टोपल्या आणि परड्या तुम्हाला भेट म्हणून आणल्या आहेत' असे तिने आईला सांगितले. टोपल्या आणि परड्या आईच्या हातात दिल्या. आईनेही त्यांच्यासाठी आधीच देण्याच्या वस्तू आणल्या होत्या. त्यांना खायला नाश्ता दिला. आता मात्र या गोष्टीला दीर्घ कालावधी उलटला. काळ पुढे सरकत गेला. आजही मला पाठमोरी डोक्यावर टोपल्या घेतलेली ती, तिच्या हाताला धरून चालणारी चुणचुणीत चिमुरडी डोळ्यांसमोर दिसते अन् डोळे नकळत पाणावतात.

**उज्ज्वल कुळकर्णी**/पुणे, ९४२२२८८०६२

### अभिव्यक्ती स्वातंत्र्य की स्वैराचार?

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारितेकडे आदराने पाहिले जाते. प्रश्न विचारणे, सत्ताधाऱ्यांना धारेवर धरणे आणि जनतेचा आवाज बुलंद करणे हे पत्रकारितेचे परम कर्तव्य आहे. परंतु, नॉर्वेच्या एका महिला पत्रकाराने देशाच्या सन्माननीय पंतप्रधानांच्या बाबतीत जे वर्तन केले, त्याने पत्रकारितेच्या या पवित्र कर्तव्याला काळिमा फासला आहे. तो प्रकार केवळ निंदनीय नसून पत्रकारितेच्या नावाखाली सुरू असलेल्या मानसिक दिवाळखोरीचे आणि स्वैराचाराचे जिवंत उदाहरण आहे. पंतप्रधान हे केवळ एका पक्षाचे नसतात. ते संपूर्ण देशाचे प्रतिनिधित्व करीत असतात. त्या पदाला एक प्रतिष्ठा असते, जागतिक सन्मान असतो. प्रश्न धारदार, कटू किंवा आक्रमक असू शकतात; लोकशाहीत त्याला पूर्ण मुभा आहे. पण प्रश्नांची धार आणि भाषेची घसरलेली पातळी या दोन्हीमध्ये गल्लत होऊ नये. या पत्रकार परिषदेत जे काही घडले, तो पत्रकारितेचा भाग नव्हता, तर तो निव्वळ प्रसिद्धिलोलुपतेचा आणि उद्दामपणाचा कळस होता. पत्रकारितेत तथ्य आणि मर्यादा या दोन गोष्टींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करताना या मर्यादांचे भान अधिक प्रगल्भ असावे लागते. परंतु, या महिला पत्रकाराने सर्व नियम, शिष्टाचार आणि सुसंस्कृतपणा धाब्यावर बसवला. आजकाल जागतिक पातळीवर 'माईक' हातात आला की स्वतःला कायद्यापेक्षा आणि नैतिकतेपेक्षा श्रेष्ठ समजण्याची घातक प्रवृत्ती काहींमध्ये बळावत आहे. हा प्रकार याच प्रवृत्तीचे हिडीस प्रदर्शन होते. केवळ टीआरपी आणि सोशल मीडियावरील काही लाईक्ससाठी देशाच्या पंतप्रधानांचा जाहीर अपमान करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अशा विकृत मानसिकतेचा तीव्र शब्दात निषेध व्हायलाच हवा. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थ काहीही बोलण्याचा आणि कसाही वागण्याचा परवाना असा अजिबात होत नाही. स्वातंत्र्य हे जबाबदारीसोबत येते. नॉर्वेच्या त्या महिला पत्रकाराने केलेल्या अभद्र व्यवहारामुळे केवळ तिचीच नव्हे, तर तिच्या देशाच्या सुसंस्कृतपणावरही प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. अशा उद्धट पत्रकारांवर केवळ तात्पुरती बंदी घालून भागणार नाही; त्यांना नैतिकतेचे आणि शिष्टाचाराचे धडे देणे गरजेचे आहे. पंतप्रधानांनी अत्यंत संयमाने आणि परिपक्वतेने या परिस्थितीला हाताळले, हे त्यांच्या पदाला साजेसे होते. मात्र, म्हणून समोरच्याचा उद्दामपणा खपवून घेतला जाऊ शकत नाही. टीका जरूर व्हावी, पण ती वैचारिक पातळीवर असावी, वैयक्तिक चिखलफेक आणि अभद्रतेच्या पातळीवर नाही. हीच सुदृढ लोकशाहीची ओळख आहे, असे मला वाटते.

**श्याम कोळी**/८३८००८०९५०

●● ●●

### 'झुरळांच्या उद्रेकाचे अर्थ' परखड अग्रलेख

दि. २३ मे च्या अंकातील 'झुरळांच्या उद्रेकाचे अर्थ' हे संपादकीय अत्यंत परखड विचार मांडणारे वाटले. परखड मते मांडण्याच्या परंपरेला जागून तरुण भारतने झुरळ जनता पार्टीच्या निर्मितीच्या पृष्ठभूमीचे विश्लेषण केले आहे. अशीच निरुपद्रवी वाटणारी आंदोलने नंतर जनआंदोलने कशी झाली ते आम आदमी पार्टी तसेच नवनिर्माण आंदोलन यासारखे दाखले देऊन संबंधितांना सावध करण्याचा प्रयत्न अग्रलेखात केला आहे. फरक इतकाच, की ती आंदोलने ज्या सरकारच्या विरोधात झाली, त्यांच्या तुलनेत सध्याचे सरकार अधिक कणखर आणि लवचीक आहे. शेतकरी आंदोलनाचा धोका पाहून, संसदेत मान्य झालेले कायदे मागे घेण्याची लवचीकता किंवा प्रचंड बहुमत असूनही सीएएची अंमलबजावणी किंवा राम मंदिर स्थापनेसाठी योग्य वेळ येण्याची वाट बघण्याचा संयम या सरकारने दाखवला आहे. त्यामुळे झुरळ पार्टीचा प्रभाव वाढताना (बंदी वगैरे घालून) पेस्ट कंट्रोल करून स्वच्छता करण्याबरोबरच कायम स्वरूपाच्या स्वच्छतेचा (म्हणजे भ्रष्टाचार, बेरोजगारी, कायदा व सुव्यवस्था वगैरे जेन-झीला भडकवू शकणारे प्रश्न योग्य प्रकारे हाताळण्याचा) सल्लाही संपादकीयात दिला आहे. एकूणच या पार्टीला झुरळ म्हणून झटकून न टाकता भविष्यातील धोका ओळखून पवित्रा घेण्याचा निर्भीड सल्ला या अग्रलेखात दिला आहे. त्याबद्दल अभिनंदन.

**जयंत जेस्ते**/पुणे. ९८२२५१०३४९

●● ●●

### सात्त्विक आहाराचे विज्ञान आणि आधुनिक जीवनातील उपयुक्तता!

आजच्या आधुनिक युगात मनुष्याचे जीवन वेगवान झाले आहे. तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे माणसाच्या जीवनशैलीत मोठे बदल घडून आले आहेत. व्यस्त दिनचर्या, ताणतणाव, अपुरी झोप, फास्ट फूडचे वाढते प्रमाण आणि शारीरिक



हालचालींचा अभाव यामुळे अनेक शारीरिक व मानसिक समस्या निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत निरोगी आणि संतुलित जीवनशैलीचा शोध घेणे ही काळाची गरज बनली आहे. या संदर्भात सात्त्विक आहार ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरते. सात्त्विक आहार हा केवळ पोट भरण्यासाठी घेतला जाणारा अन्नप्रकार नसून तो शरीर, मन आणि आत्म्याच्या संतुलनाचा पाया मानला जातो. भारतीय योगशास्त्र आणि आयुर्वेदात सात्त्विक आहाराला विशेष महत्त्व देण्यात आले आहे.

'सत्त्व' या शब्दाचा अर्थ शुद्धता, शांतता, संतुलन आणि सकारात्मकता असा होतो. मनाला प्रसन्न ठेवणारे, शरीराला आवश्यक पोषण देणारे आणि मानसिक स्थैर्य वाढवणारे अन्न म्हणजे सात्त्विक आहार होय. ताजी फळे, हिरव्या भाज्या, अंकुरित धान्ये, कडधान्ये, दूध, तूप, सुकामेवा, मध आणि नैसर्गिक अन्नपदार्थ हे सात्त्विक आहाराचे मुख्य घटक आहेत. या आहारात अति मसालेदार, तेलकट, प्रक्रिया केलेले किंवा कृत्रिम घटक असलेले पदार्थ टाळले जातात.

सात्त्विक आहाराचे विज्ञान समजून घेतले तर त्यामागील तत्त्वे अत्यंत प्रभावी आणि व्यावहारिक असल्याचे दिसून येते. आधुनिक विज्ञानाने हे सिद्ध केले आहे की आपण घेत असलेल्या अन्नाचा थेट परिणाम आपल्या शरीरावर तसेच मानसिक आरोग्यावर होत असतो. आपल्या शरीरातील ऊर्जा, रोगप्रतिकारकशक्ती, हार्मोन्सचे संतुलन आणि मेंदूची कार्यक्षमता यावर आहाराचा मोठा प्रभाव असतो. सात्त्विक आहारामध्ये जीवनसत्त्वे, खनिजे, प्रथिने, तंतुमय पदार्थ आणि अँटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात आढळतात. ताज्या फळांमध्ये आणि भाज्यांमध्ये असलेले अँटिऑक्सिडंट्स शरीरातील विषारी घटक कमी करण्यास मदत करतात.

विद्यार्थ्यांसाठी सात्त्विक आहार विशेष उपयुक्त आहे. योग्य आहारामुळे स्मरणशक्ती वाढते, एकाग्रता सुधारते आणि मानसिक तणाव कमी होतो. सात्त्विक आहार म्हणजे केवळ विशिष्ट पदार्थांचे सेवन नव्हे; तर एक जीवनशैली आहे. योग्य वेळेवर भोजन करणे, अति खाणे टाळणे, शांत वातावरणात अन्न सेवन करणे आणि कृतज्ञतेच्या भावनेने भोजन करणे ही देखील त्याची तत्त्वे आहेत.

शेवटी असे म्हणता येईल की सात्त्विक आहार हा प्राचीन भारतीय ज्ञानाचा अमूल्य वारसा आहे. आधुनिक विज्ञानानेही त्यातील अनेक तत्त्वांना मान्यता दिली आहे. निरोगी शरीर, शांत मन आणि संतुलित जीवनासाठी सात्त्विक आहाराचा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे. कारण योग्य आहार हीच निरामय जीवनाची खरी गुरुकिल्ली आहे. ▮

**कुमार व्यंकटेश नेरकर**/७६२०६८७३०३

●● ●●

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com/



# 'धाराशिव'मध्येही 'लातूर पॅटर्न'चा शिरकाव?

## ५५ पैकी २७ विद्यार्थी रेसमध्ये; जनहित याचिका दाखल करणार सुधीर पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि. २३ मे-**

धाराशिवमध्येही 'लातूर पॅटर्न'चा शिरकाव झाल्याचा गंभीर आरोप करत काही क्लासेसनी परीक्षेची उत्तरतालिका येण्यापूर्वीच विद्यार्थ्यांना ६०० पेक्षा अधिक गुण मिळणार असल्याचे बॅनर लावल्याचा दावा संस्थाचालक सुधीर अण्णा पाटील यांनी केला आहे. या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी त्यांनी केली असून, या संदर्भात जनहित याचिका दाखल करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



धाराशिव येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना सुधीर पाटील म्हणाले की, परीक्षा झाल्यानंतर उत्तरतालिका जाहीर होण्यापूर्वीच "लातूर पॅटर्न सायन्स अकॅडमी"च्या वतीने शहरात बॅनर लावण्यात आले. या बॅनरवर "५५ पैकी २७ विद्यार्थी रेसमध्ये" तसेच " २०२६ मध्ये ५५ पैकी १० विद्यार्थी ६०० च्या पुढे" असा दावा करण्यात आला होता. विद्यार्थ्यांचे फोटो आणि संभाव्य गुणांसह प्रसिद्ध करण्यात आलेले हे बॅनर संशयास्पद असल्याचा आरोप त्यांनी केला.

या प्रकाराची तक्रार सीबीआय आणि पोलिसांकडे करणार असून, यामागील संपूर्ण रॅकेटची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. काही महत्त्वाची नावे सीबीआयला गोपनीय पद्धतीने देणार असल्याचेही ते म्हणाले.

सुधीर पाटील यांनी पुढे आरोप केला की, दोन वर्षांपूर्वी संबंधित क्लासेसचे मोटेगावकर धाराशिवमध्ये आले होते. त्यावेळी "आर्थिक क्षमता असलेले विद्यार्थी मिळाल्यास त्यांना वेगळ्या पद्धतीने पास करता येईल," असे सांगण्यात आले होते. मात्र, आपण त्यास नकार दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. संबंधित क्लासेसकडून ५ लाख, ३ लाख आणि ६० हजार रुपयांपर्यंत फी आकारली जात असल्याचाही आरोप त्यांनी केला.

"जर आर्थिक निकषावर गुणवत्तेचा खेळ सुरू असेल, तर सामान्य विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यायचे नाही का?" असा सवाल करत त्यांनी सारख्या देशाच्या भवितव्याशी संबंधित परीक्षांमध्ये पारदर्शकता आवश्यक असल्याचे म्हटले.

अनेक विद्यार्थी रात्रंदिवस मेहनत घेतात, मात्र पेपरफुटी आणि गैरप्रकारांमुळे गुणवंत विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याचे त्यांनी सांगितले. "पेपर आणि उत्तरे १० ते १५ दिवस आधी मिळत असल्यामुळे काही विद्यार्थ्यांना अवास्तव गुण मिळतात. पालकांनी अशा जाहिराती आणि बॅनरला बळी पडू नये," असे आवाहनही त्यांनी केले. तसेच, काही क्लासेसमध्ये न शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचेही चांगले गुण आल्यास त्यांचे फोटो जाहिरातीसाठी वापरले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. या संपूर्ण प्रकरणामुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली असून, पुढील काही दिवसांत आणखी धक्कादायक बाबी समोर येतील, असा दावा सुधीर पाटील यांनी केला.

# पीककर्ज देण्यास बँकांची अडवणूक थांबवावी

## बँकांवर एफआयआर दाखल करण्याची आमदार कैलास पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि. २३ मे-**

शेतकऱ्यांना पीक कर्ज देताना बँका विविध कारणे देत अडवणूक करत असल्याचा आरोप करत, सरकारचे आदेश असूनही सहकार्य न करणाऱ्या बँकांवर एफआयआर दाखल करावेत तसेच कोणतीही अट न घालता शेतकऱ्यांना पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी कैलास पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

या संदर्भात आमदार कैलास पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन विविध मागण्या मांडल्या. राज्यात मान्सूनचे आगमन लवकरच होणार असून शेतकरी बी-बियाणे व खते खरेदीसाठी तयारी करत आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना वेळेत कृषी कर्ज मिळणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असूनही अनेक बँका शेतकऱ्यांचा सिबिल स्कोअर पाहून कर्ज नाकारत आहेत. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीत शेतकऱ्यांकडे सिबिल स्कोअरची मागणी करू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही बँकांकडून सिबिल स्कोअरची अट लावली जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

### "शेतकऱ्यांना जावे लागेल सावकाराच्या दारात"



सरकारच्या आदेशाला बँकांकडून केराची टोपली दाखवली जात असून विविध कारणे देत शेतकऱ्यांना कर्ज नाकारले जात आहे. लाखो कर्जदार शेतकरी अचानक कमी झाले आहेत. त्यामुळे सिबिल स्कोअर नसलेल्या आणि कर्जापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना अखेर सावकारांच्या दारात जावे लागेल.

**- कैलास पाटील, आमदार**

शेतकऱ्यांना कृषी कर्जाचा पुरवठा न झाल्यास त्याचे गंभीर परिणाम शेती आणि अर्थव्यवस्थेवर होतात. मागील वर्षी कृषी कर्जाचा पुरवठा न करणाऱ्या बँकांवर एफआयआर दाखल करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, अद्याप त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचेही आमदार पाटील यांनी निदर्शनास आणून दिले.

ज्या शेतकऱ्यांनी तडजोडीअंती एकरकमी परतफेड (ओटीएस) करून कृषी कर्जाची रक्कम भरली आहे, अशा शेतकऱ्यांनाही "कुलिंग ऑफ पिरियड"च्या नावाखाली पुन्हा कर्ज दिले जात नसल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. राज्यातील काही बँकांमध्ये हा कालावधी ३ ते ७ वर्षांचा असून काही ठिकाणी कायमस्वरूपी असल्याचे त्यांनी सांगितले. या कालावधीत शेतकऱ्यांना कृषी कर्ज मिळत नसल्याने त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

त्यामुळे सिबिल स्कोअरची अट न घालता तसेच ओटीएस अंतर्गत कर्जफेड केलेल्या शेतकऱ्यांसाठी कुलिंग ऑफ पिरियडची अट रद्द करून सरसकट कृषी कर्ज उपलब्ध करून देण्याचे आदेश राज्यस्तरीय बँकर्स समितीला द्यावेत, अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी सरकारकडे केली आहे.

# 'स्वराज्य'चा वर्धापन दिन व मेळावा उत्साहात साजरा

**सोलापूर दि. २२ मे**

स्वराज्य पोलीस मित्र, पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटनेचा ५वा वर्धापन दिन व कार्यशाळा आणि राज्यस्तरीय मेळावा उत्साहात संपन्न झाला.

विजापूर रोडवरील निर्मिती लॉन्समध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या पाहिल्या सत्राच्या अध्यक्षस्थानी संस्थापक कमलेश शेवाळे तर दुसऱ्याला सत्राच्या अध्यक्षस्थानी संस्थापक दिपक कांबळे होते.

विश्वस्त धनश्री उत्पात व उपाध्यक्ष राजेंद्रकुमार रघोजी यांनी मान्यवरांचे स्वागत केले. प्रास्ताविक जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक यांनी केले. याप्रसंगी मान्यवराच्या हस्ते पाचव्या वर्धापन दिनाचा केक कापण्यात आला. सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष बाबासाहेब जाधव यांनी गुन्हेगारीचे बदलते स्वरूप या विषयावर तर ॲड. दादासाहेब जाधव यांनी दिवाणी प्रकरण आणि सामाजिक कार्यकर्ते या विषयावर प्रबोधन केले.

सोलापूर जिल्ह्यात विविध विभागात उल्लेखनीय कार्य केलेले ॲड बाबासाहेब जाधव, ॲड दादासाहेब जाधव, दिपक कुरुलकर, मोडनिंबचे संपत महामुनी, सचिन अस्टिकर, गिरीश शहाणे किशोर कुरुलकर, नरसिह रत्नपारखे, विठ्ठलराव टाक, कमल टाक, लातूरचे विजयकुमार दीक्षित, अमित वेर्णेकर, यांच्या विषेश पुरस्कार ट्रॉफी, सन्मान पत्र, शाल व मोत्याचे माळ देऊन सन्मान करण्यात आला.

तसेच स्वराज्यच्या माध्यमातून लक्षवेधी कार्य केल्याबद्दल राष्ट्रीय अध्यक्ष दिपक कांबळे, राष्ट्रीय मुख्य महासचिव कमलेश शेवाळे, प्रदेशाध्यक्षा धनश्री उत्पात, जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक, जिल्हा कार्याध्यक्ष सुनिल पंडित, जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्रकुमार रघोजी, जिल्हा सचिव सुधाकर शहाणे, जिल्हा जिल्हा सरचिटणीस दिपक कुरुलकर, जिल्हा सरचिटणीस दत्तगुरु वेदपाठक, अमोल शहाणे या मुख्य कार्यकर्त्यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

## मंगळवेढ्यात बेकायदा पिस्टल बाळगल्या प्रकरणी दोघाना अटक

**मंगळवेढा, दिनांक २३ मे-**

शहरातील पंढरपूर रोडवरील एमआयडीसी परिसरात नाना ज्ञानेश्वर जगताप (वय २५) व कृष्णा महेश खटकाळे (वय २८, दोघे रा. मंगळवेढा) हे दोघे आले असता पोलिसांना संशय आल्याने या दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे देशी बनावटीचे दोन पिस्तूल व तीन जिवंत काडतूस मिळाले असून याप्रकरणी दोघाविरुद्ध मंगळवेढा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार २३ मे रोजी सायंकाळी साडेपाच वाजता शहरातील एमआयडीसी परिसरामध्ये वरील दोघे आरोपी दोन पिस्तूल बेकायदेशी घेऊन येत असल्याची माहिती पोलिसांना मिळतात मंगळवेढाचे डीवायएसपी बसवराज शिवपुजे पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरगिड्डे यांनी सापळा लावून पोलिसांच्या जाळ्यात अडकवले. एक लाख ६० हजाराचे दोन देशी बनावटीचे पिस्तूल व १८०० रुपयांचे तीन जिवंत काडतूस. ३०हजार किमतीची मोटरसायकल असा एकूण एक लाख ९१ हजार आठशे रुपये किमतीचे मुद्देमाल जप्त केला आहे. याची गोपनीय खबर प्रमोद मोरे यांना मिळाली होती. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक विजय पिसे हे करीत आहेत.

# आ. तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली मतदारसंघात "गाव भेट दौरा अभियान" सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**भूम, दि. २३ मे-**

भूम-परंडा-वाशी मतदारसंघाचे आमदार तथा माजी मंत्री तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण भूम तालुक्यात राबविण्यात येणाऱ्या "गाव भेट दौरा अभियान"ची सुरुवात सामनगाव आणि वालवड येथून उत्साहात करण्यात आली.

या अभियानाच्या माध्यमातून गावोगावी जाऊन नागरिकांच्या प्रमुख समस्या प्रत्यक्ष जाणून घेणे, त्या संबंधित प्रशासन व आमदार डॉ. तानाजीराव सावंत यांच्यापर्यंत पोहोचवणे आणि त्या समस्या तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणे, ही जबाबदारी सर्व पदाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. "विकास हेच व्हिजन" समोर ठेवून जनतेपर्यंत पोहोचण्याचा संकल्प करण्यात आला असून प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.



हा उपक्रम आमदार डॉ. तानाजीराव सावंत यांच्या आदेशानुसार संपूर्ण मतदारसंघात प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक विशाल ढगे यांनी दिली.

गाव भेट दौऱ्यादरम्यान नागरिकांशी थेट संवाद साधून पाणीपुरवठा, रस्ते, वीज, शेती, आरोग्य, शिक्षण, शासकीय योजना तसेच स्थानिक पातळीवरील विविध समस्यांची माहिती घेण्यात आली. लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्यात थेट संवाद निर्माण होत असल्याने जनतेच्या समस्या तातडीने प्रशासनापर्यंत पोहोचण्यास मदत होणार असून शासनाच्या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचणार असल्याचे सांगण्यात आले.

ग्रामीण भागातील नागरिकांना आपल्या अडचणी मांडण्यासाठी अनेकदा कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. मात्र, अशा गाव भेट दौऱ्यांमुळे लोकप्रतिनिधी स्वतः गावात येऊन समस्या जाणून घेत असल्याने जनतेमध्ये विश्वास निर्माण होत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. तसेच गावपातळीवरील विकासकामांना गती मिळून नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी अशा उपक्रमांची मोठी गरज असल्याचे मतही ग्रामस्थांनी मांडले.

गावपातळीवर लोकप्रतिनिधी स्वतः येऊन जनतेशी संवाद साधत असल्याने प्रशासनाविषयीचा विश्वास अधिक दृढ होत असल्याची भावना ग्रामस्थांनी यावेळी व्यक्त केली.

या कार्यक्रमाला बाजार समिती संचालक विशाल ढगे, बालाजी काळे, शंकर सुबुगडे, बाजार समितीचे माजी सभापती निलेश शेळवणे, कृषी अधिकारी किशोर अंधारे, सरपंच विशाल अंधारे, संजय गांधी निराधार योजना समिती अध्यक्ष समाधान सातव, संचालक युवराज तांबे आदी मान्यवर उपस्थित होते. यांच्यासह कार्यकर्ते व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

गाव भेट दौरा अभियानाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून आगामी काळात संपूर्ण मतदारसंघात हे अभियान व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



# केगावचा रितेश भोसले उळेतील शंभूराजे केसरीचा मानकरी

**सोलापूर, दि. २३ मे-**

उळे (ता. दक्षिण सोलापूर) येथे धर्मवीर संभाजीराजे जयंतीनिमित्त झालेल्या कुस्ती स्पर्धेत केगावच्या रितेश भोसले याने मनोज दोरकरवर मात करीत शंभूराजे केसरीचा मान पटकावला. येथील श्री धर्मवीर छत्रपती शंभूराजे कला व कुस्ती संकुलाच्या मैदानात कुस्त्याचे मैदान झाले.

सामाजिक कार्यकर्ते सोमनाथपटणे यांच्या हस्ते आखाडा पूजन झाले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य नेताजी खंडागळे, उपमहाराष्ट्र केसरी मौला शेख (बादोला), अध्यक्ष पैलवान महेश शिंदे, महेश कोळी, राजेंद्र कोले, पांडुरंग कुंभार, अप्पा साखरे, महेश गुंड, नवनाथ शिंदे, राजेंद्र गुंड (वस्ताद) भैरवनाथ शिंदे, सुभाष खंडागळे, श्याम हुडकर, श्याम इटूकडे, जुना मेळावा व सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

विजेता पैलवान भोसले याचा राजेंद्र शिंदे (सोनार ) यांच्यातर्फे चांदीची गदा रोख १५ हजार रुपये देऊन तर उपविजेता पैलवान दोरकर यास लक्ष्मण गुंड यांच्या कडून दहा हजार रोख रक्कम व चषक देण्यात आला. यावेळी सुमारे दीड लाख रुपयांची बक्षिसे वाटप करण्यात आली. यंदा प्रथमच मुलींच्या सहभागामुळे येथील कुस्ती स्पर्धा विशेष ठरली.

# गोव्यात आमदार चषक क्रिकेट स्पर्धेस सुरुवात

## पर्यटन मंत्री रोहन खंवटे यांच्या हस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**गोवा, दि. २३ मे-**

पर्वरी रायझिंगच्या वतीने पुरुष व महिला क्रिकेट संघांसाठी आयोजित करण्यात आलेल्या बहुप्रतिक्षित आमदार चषक लीग क्रिकेट स्पर्धेस सुरवात झाली. याचे उद्घाटन पर्यटन व आयटी मंत्री तसेच पर्वरीचे आमदार रोहन अशोक खंवटे यांच्या हस्ते पर्वरीतील साल्वादोर द मुंद मैदानावर पार पडले.



२४ मे पर्यंत होणाऱ्या आमदार चषक स्पर्धेमुळे मतदारसंघात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पर्वरी मतदारसंघातील ७० हून अधिक पुरुष व महिला संघ या लीग स्पर्धेत सहभागी झाले. या उद्घाटन सोहळ्यास जिल्हा परिषद सदस्य संदीप साळगांवकर, अमित अस्नोडकर, सरपंच स्वप्नील चोडणकर, सोनिया पेडणेकर, पर्वरी भाजप मंडळ अध्यक्ष विनीत परब आदी उपस्थित होते. पर्वरी येथे स्पर्धेची अधिकृत ट्रॉफी आणि सहभागी संघांच्या जर्सीचे अनावरण करण्यात आले. पर्यटनमंत्री खंवटे म्हणाले की, आमदार चषक ही केवळ स्पर्धा नसून क्रीडाभावना, एकता आणि युवा प्रतिभेचा उत्सव आहे. खेळाडू आणि क्रिकेटप्रेमींमध्ये दिसणारा उत्साह, पर्वरीत विकसित होत असलेल्या सशक्त क्रीडा संस्कृतीचे प्रतीक आहे.



# एसपीएम इंग्लिश स्कूलमध्ये सीडबॉल कार्यशाळा

**सोलापूर, दि. २३ मे-**

एस पी एम इंग्लिश स्कूल येथे सुरू असलेल्या संघ शिक्षा वर्गात बीजगोळे (सीडबॉल) कार्यशाळा सुरु झाली. ३० मे पर्यंत रोज सकाळी ७.३० ते ८.३० हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये बीजगोळे (सीडबॉल) कसे करायचे याचे प्रात्यक्षिक झाले. कडुलिंब, चिंच, बहावा, पलस, पारिजातक, करंज, आंबा, जांभूळ आशा विविध प्रकारच्या बियांचे बीजगोळे (सीडबॉल) तयार करन्यात आले. यामध्ये प्रवीण तळे व शिरीष गोळवलकर यांनी मार्गदर्शन केले. राजेश वडीशेरला यांनी व्यवस्था केली. या उपक्रमासाठी यशवंत पाथरूट, कटवा देवी गोशाळेचे रुद्रप्पा बिराजदार, आल्हाद आपटे, अरविंद सालक्की, वैभव हेगडे, शैलेश स्वामी (जयोस्तुते फाउंडेशन) यांनी सहकार्य केले.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सायबर सुरक्षा काम**

सोलापूरच्या मध्य रेल्वेचे वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, नामांकित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट वेबसाईट www.ireps.gov.in वर ऑनलाईन ई-टेंडर मागवत आहेत. टेंडर क्रमांक SUR/TD/T/2026/05.कामाचे नाव : मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील स्काडा सिस्टीमचे अपग्रेडेशन आणि सायबर सुरक्षेची अंमलबजावणी करणे. अंदाजित खर्च : रु. १४,८५,०५,९६७.५५ (१४,८५,०५,९६७.५५) बयाणा रक्कम / बिड सुरक्षा : रु. २९,७०,१००/- (२९,७०,१००/-) काम पूर्ण करण्याचा कालावधी : २४ महिने ऑफरची वैधता : ९० दिवस वेबसाईटवर टेंडर बंद होण्याची तारीख आणि वेळ: १७.०६.२०२६ रोजी दुपारी १५:०० वाजता (३:०० वाजता).

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता,**
**मध्य रेल्वे, सोलापूर**
AK/Sur-34

सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवर प्रवास करणे टाळा.

# सर्व राजकीय पक्षांनी केंद्रस्तरीय एजंटांची नियुक्ती करावी

## राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त एस. चोक्कलिंगम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि. २३ मे-**

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनर्नरीक्षण कार्यक्रमांतर्गत राज्यासह धाराशिव जिल्ह्यात कामाला वेग आला असून, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्या माध्यमातून मतदारांचे मॅपिंग सुरू आहे. मात्र, २००२ मधील मतदार यादी आणि सध्याच्या यादीतील नावे जुळविताना विविध अडचणी निर्माण होत असल्याने कोणत्याही पात्र मतदाराचे नाव वगळले जाऊ नये, यासाठी सर्व राजकीय पक्षांनी आपल्या मतदान केंद्रस्तरीय एजंटांची नियुक्ती करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त एस. चोक्कलिंगम यांनी केले.




जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनर्नरीक्षण आढावा बैठकीत ते बोलत होते.यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, पोलीस अधीक्षक रितू खोखर, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी शिरीष यादव, यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

चोक्कलिंगम म्हणाले, शासनाच्या धोरणानुसार प्रत्येक राजकीय पक्षाने आपल्या जिल्हाध्यक्षांमार्फत अधिकृत बीएलए यादी जिल्हा प्रशासनाकडे सादर करणे अपेक्षित आहे. धाराशिव जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाने १५२३ बीएलए नियुक्त केले आहेत. मात्र, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना, शिवसेना (उबाठा), वंचित बहुजन आघाडी, बहुजन समाज पार्टी आणि इतर पक्षांकडून अद्याप बीएलएची नियुक्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे स्थानिक स्तरावर मतदार मॅपिंग प्रक्रियेत अडथळे निर्माण होत आहे,

मतदार यादी पुनर्नरीक्षण प्रक्रियेदरम्यान बीएलओंनी प्रत्येक घरी भेट देऊन संबंधित सदस्यांची माहिती व आवश्यक पुरावे घेऊन त्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यास प्राधान्य द्यावे, असे निर्देश श्री. चोक्कलिंगम यांनी दिले. तसेच नाव, वय किंवा अन्य तपशील बदलायचा असल्यास जन्म दाखला, फोटो, स्वाक्षरी यांसारखे आवश्यक पुरावे संकलित करून ते ऑनलाइन अपलोड करावेत.

धाराशिव शहरातील सुमारे एक लाख नागरिकांना नोटिसा पाठविण्यासाठी नगर परिषदेचे मुख्याधिकारी आणि तहसीलदार यांनी संयुक्तपणे कार्यवाही करावी, असे निर्देश देताना चोक्कलिंगम यांनी ग्रामीण भागात जनजागृतीसाठी विशेष मेळावे आयोजित करण्यासही सांगितले. मतदार यादीसंदर्भातील सर्व माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने व्यापक प्रयत्न करावेत, एखाद्या नागरिकाचे नाव मतदार यादीतून वगळल्यास त्यामागील कारण स्पष्ट करावे लागणार असून, संबंधित नोटीस व दूरध्वनी संपर्काची नोंद व्यवस्थित ठेवावी लागणार आहे.

मॅपिंगचे काम टाळणाऱ्या किंवा हलगर्जीपणा करणाऱ्या बीएलओंना नोटिसा देण्याचे निर्देशही त्यांनी प्रशासनाला दिले. मतदार मॅपिंगची सद्यस्थिती नागरिकांना समजण्यासाठी हेल्प डेस्क सुरू करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. पुरावे नसलेल्या गरीब नागरिकांची नावे यादीतून वगळली जाऊ नयेत, याची विशेष दक्षता घेण्याचे आवाहन त्यांनी केले. कोणाच्याही मनात आपले नाव मतदार यादीतून वगळले जाईल, अशी भीती निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने मदत करावी, असे श्री. चोक्कलिंगम म्हणाले.

बीएलओंनी प्रत्येक घराचा क्रमांक आणि मोबाईल क्रमांक अचूक नोंदवावा. त्यामुळे कुटुंब मॅपिंग अधिक प्रभावीपणे करता येईल, असे सांगत मॅपिंग न झालेल्या मतदारांकडून अर्ज क्रमांक ६ भरून घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. मात्र, त्यासोबत आवश्यक सर्व पुरावे जोडणे बंधनकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत जिल्हाधिकारी श्री. पुजार यांनी उस्मानाबाद-लातूर-बीड विधान परिषद निवडणूक संदर्भातील मतदार संख्या, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी, निवडणूक समित्या आदींची माहिती सादर केली.

**KATARE SPINNING MILLS LIMITED**
REGD. OFFICE: 14/30 GROUND FLOOR, B WING, KATARE COMPLEX, GANDHINAGAR, BL. NO. 10 Solapur MH- 413006.
CIN: L17119PN1980PLC022962
Email: katarespinningmills@gmail.com

**NOTICE**

In pursuant to Regulation 29 read with Regulation 33 and other applicable regulations of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, Notice is hereby given that a meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Saturday, 30thMay, 2026 at 04.30 P.M. at the registered office of the Company to, inter alia, consider and approve the Audited financial results of the Company for the quarter and year ended on 31st March, 2026.

A copy of this notice is also posted on the website of the Company www.katarespinningmillslimited.comand also on the website of the stock exchange at www.bseindia.com.

**FOR KATARE SPINNING MILLS LIMITED**
**SD/-**
**KISHORE KATARE**
**MANAGING DIRECTOR**
**(DIN- 00645013)**

Place: Solapur
Date: 23.05.2026



## महत्त्वाचे

### मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेत श्रेयांशची विजयी सुरुवात



**मुंबई** : अव्वल मानांकित खेळाडू श्रेयांश सोमैया, तसेच आदित्य शार्दुल कदम आणि इतर काही खेळाडूंनी शनिवारी येथे आयोजित मुंबई रेटेड अखिल भारतीय चेस मास्टर्स स्पर्धेच्या चौथ्या हंगामाची विजयी सुरुवात केली. सोमैयाने ( मानांकन १९७३) आपल्या मोहिमेची सुरुवात एका सहज विजयासह केली. त्याच वेळी, आदित्य (१९१७), रेयांश वेंकट (१९०६), गौरांग भंडारी (१८८९), यश कपाडी (१८५४) आणि पिनाकेश नाहर राजवीर (१८०१) यांसारख्या इतर प्रमुख दावेदारांनीही पहिल्याच फेरीत विजय नोंदवले. पहिल्या दिवसाच्या खेळात काही तरुण आणि मानांकन नसलेल्या खेळाडूंनीही आपली छाप पाडली. यामध्ये देवांश पारकरचा समावेश आहे, ज्याने राघव अग्रवालला (१६६०) बरोबरीत रोखले; तर मिखाईल विक्रम वोरा (१४४७) याने आरव सिंगविरुद्धच्या एका अटीतटीच्या लढतीत गुण विभागून घेतले.

### मोहन बागानचा भारताच्या युनिटी कप मोहिमेला धक्का

**बंगळुरू** : फिफा आंतरराष्ट्रीय विंडोबाहेर खेळल्या गेलेल्या सामन्यांदरम्यान खेळाडूंना झालेल्या दुखापतींसाठी भरपाई देण्यास अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने यापूर्वी 'नकार' दिला होता, या कारणाचा हवाला देत मोहन बागान सुपर जायंट संघाने आपल्या सातही खेळाडूंना माघारी बोलावले आहे. यामुळे लंडनमध्ये होणाऱ्या आगामी युनिटी चषक फुटबॉल स्पर्धेतील भारतीय फुटबॉल संघाच्या मोहिमेला मोठा धक्का बसला आहे. चार देशांच्या या स्पर्धेसाठी प्रशिक्षक खालिद जमील यांनी निवडलेल्या २८ सदस्यीय भारतीय संघात या सात खेळाडूंचा समावेश होता. हे खेळाडू रविवारी बंगळुरू येथून लंडनला रवाना होणार होते; या स्पर्धेसाठीचे सराव शिबीर बंगळुरू येथेच आयोजित करण्यात आले होते.

### भारताला लवकरच प्रक्षेपण भागीदार मिळणार

**कोलकाता** : आगामी फिफा विश्वचषक २०२६ फुटबॉल स्पर्धेसाठी अधिकृत प्रक्षेपक उपलब्ध नसल्यामुळे भारतीय चाहते चिंतेत होते. उत्तर अमेरिकेत ४८ संघांचा समावेश असलेल्या या विस्तारित विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या सुरुवातीला आता केवळ एक महिना उरला असतानाही, जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या या देशाला हा जागतिक क्रीडा सोहळा पाहण्यासाठी अद्याप कोणताही मार्ग उपलब्ध नव्हता. ही अनिश्चितता आता लवकरच संपुष्टात येण्याची शक्यता आहे. अखिल भाररतीय फुटबॉल महासंघाचे माजी सरचिटणीस शाजी प्रभाकरन यांनी समाज माध्यमावर जाहीर केले आहे की, भारतात फिफा विश्वचषक २०२६ च्या प्रक्षेपण हक्कांबाबतच्या वाटाघाटी 'पूर्ण' झाल्या आहेत आणि लवकरच यासंदर्भात अधिकृत घोषणा अपेक्षित आहे.



### बोटाच्या दुखापतीमुळे जेकब बेथेल बाहेर

**हैदराबाद** : आयपीएलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाकडून क्षेत्ररक्षण करताना जेकब बेथेलच्या बोटाला दुखापत झाली. त्यामुळे त्याचा आयपीएलमधील सहभाग संपुष्टात आला आहे तसेच ४ जून रोजी न्यूझीलंडविरुद्ध होणाऱ्या इंग्लंडच्या घरच्या उन्हाळी हंगामातील पहिल्या कसोटी सामन्यासाठी जेकब बेथेलच्या सहभागाबद्दल शंका निर्माण झाली आहे. रविवारी धर्मशाला येथे पंजाब किंग्सविरुद्धच्या आरसीबीच्या विजयाच्या सामन्याच्या शेवटच्या षटकात चौकार वाचवण्यासाठी झेप घेताना बेथेलच्या डाव्या हाताच्या अनामिकेला दुखापत झाली.

### पहिल्याच दिवशी सागर आणि सूरज अंतिम फेरीत

**नवी दिल्ली, २३ मे**

व्हिएतनाममधील दा नांग येथे सुरू झालेल्या युनायटेड वर्ल्ड रेसलिंगच्या (यूडब्ल्यूडब्ल्यू) २३ वर्षांखालील आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत भारताने सकारात्मक सुरुवात केली आहे. टिएन सोन क्रीडा केंद्रावर स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी ग्रीको-रो न शैलीतील कुस्तीपटू सागर सिंग आणि सूरजने आपापल्या गटांतील सुवर्णपदकाच्या लढतींमध्ये (अंतिम फेरीत) स्थान निश्चित केले. भारताच्या या कामगिरीचे नेतृत्व ६७ किलो व ६० किलो ग्रीको-रो न गटांतील उत्कृष्ट खेळाने करण्यात आले. या दोन्ही गटांत कुस्तीपटूंनी आक्रमक बाणा आणि दबावाखालीही शांत राहण्याची वृत्ती दर्शवित अंतिम फेरीत आपले स्थान पक्के केले. सागर सिंगने ६७ किलो गटात दमदार कामगिरी केली.

# जोश इंग्लिसची 'जोश'पूर्ण फलंदाजी

## लखनौ सुरपर जायंट्स ६ बाद १९६

**♦ लखनौ, २३ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शनिवारी पंजाब किंग्सविरुद्धच्या आपल्या अखेरच्या साखळी सामन्यात जोश इंग्लिसच्या जोशपूर्ण फलंदाजीच्या बळावर लखनौ सुपर जायंट्सने मर्यादित २० षटकांत ६ बाद १९६ धावा उभारल्या. पंजाब किंग्ससमोर विजयासाठी १९७ धावा काढण्याचे आव्हान ठेवले.

पंजाब किंग्सचा कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून लखनौ सुपर जायंट्सला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. लखनौने २० षटकांत ६ बाद १९६ धावा उभारल्या.




अभिवादन करताना जोश इंग्लिस



आयुष बदोनीचे १८ चेंडूंत ४३ धावा

मोहिमेचा शेवट गोड करण्याच्या ध्येयाने लखनौच्या सलामीवीर जोश इंग्लिसने जोशाने फलंदाजी केली, परंतु त्याचा जोडीदार अर्शिन कुळकर्णी शून्यावर आणि त्यानंतर भरवशाचा फलंदाज निकोलस पूरन दोन धावांवर बाद झाले. लखनौने २.५ षटकांत २० धावांतच दोन फलंदाज गमावले, परंतु त्यानंतर इंग्लिसला खरी साथ मिळाली ती आयुष बदोनी व ऋषभ पंतची. या त्रिकुटांनी संघाचा डाव सावरला व संघाला सुस्थितीत आणले. जोश इंग्लिसने आयुष बदोनीसोबत तिसऱ्या गड्यासाठी ४९ धावांची भागीदारी करून संघाला ६.४ षटकांत ६९ धावांवर पोहोचवले. आयुष बदोनी अर्धशतकाच्या दिशेने वाटचाल करीत असतानाच त्याला युझवेंद्र चहलने आपल्या फिरकीच्या जाळ्यात ओढले. बदोनीने अवघ्या १८ चेंडूंत ५ चौकार व ३ षट्कारांच्या मदतीने ४३ धावांचे योगदान दिले. जोश इंग्लिसची कर्णधार ऋषभ पंतसोबत फटकेबाजी सुरुच होती, पंतने इंग्लिससोबत चौथ्या गड्यासाठी २५ धावांची भागीदारी करून संघाला शंभर धावांचा उंबरठा ओलांडून दिला. पंतच्या रुपाने चहलने आपला दुसरा बळी मिळविला. पंतने २२ चेंडूंत २६ धावांची भर घातली. दरम्यान, जोश इंग्लिसने अर्धशतक साजरे केले, त्याने अब्दुल सामदसोबत चौथ्या गड्यासाठी ३५ धावांची भागीदारी केली. वैयक्तिक शतकाकडे वाटचाल करीत असतानाच जोश इंग्लिसला फिरकी गोलंदाज शशांक सिंगने रोखले. जोश इंग्लिसने शशांकला मैदानाच्या दिशेने जोरदार फटका मारला, परंतु सरळ सीमारेषेवर श्रेयस अय्यरने त्याचा झेल टिपला. जोश इंग्लिसने ४४ चेंडूंत ७२ धावांची खेळी केली, यात त्याने ९ चौकार आणि २ षट्कार खेचलेत.

पुढे अब्दुल सामदने मुकुल चौधरी ( १) व लखनौकडून पदार्पण करणाऱ्या अर्जुन तेंडुलकरच्या (नाबाद ५) मदतीने लखनौ सुपर जायंट्सला मर्यादित २० षटकांत ६ बाद १९६ धावा उभारून दिल्या. अब्दुल सामदने २० चेंडूंत ३ चौकार व ३ षट्कारांच्या मदतीने नाबाद ३७ धावांची खेळी केली.

पंजाबकडून मार्को जॅन्सेन व युझवेंद्र चहलने प्रत्येकी २ बळी, तर अझ्मतुल्लाह ओमरझाई व शशांक सिंगने प्रत्येकी १ बळी टिपला.

◂(वृत्तसंस्था)

# राजस्थान मुंबई इंडियन्सविरुद्ध 'करा अथवा मरा' लढतीसाठी सज्ज

**♦ मुंबई, २३ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीगच्या प्ले-ऑफमधील शेवटचे स्थान निश्चित करण्याच्या प्रयत्नात असताना राजस्थान रॉयल्स संघ रविवारी वानखेडे स्टेडियमवर संघर्ष करणाऱ्या मुंबई इंडियन्सविरुद्ध आपली सर्व ताकद पणाला लावण्यास सज्ज असेल.

येथील संभाव्य उष्ण आणि दमट अशा रविवारी दुपारच्या वातावरणात, हा सामना दोन्ही संघांच्या जिद्द आणि तंदुरुस्तीची कसोटी ठरेल. एकीकडे, मुंबई इंडियन्स आपला शेवटचा सामना किमान एका समाधानकारक विजयासह संपवण्यास कटिबद्ध असतील; तर दुसरीकडे, राजस्थान रॉयल्सला याची पूर्ण जाणीव असेल की, या सामन्यातील पराभव त्यांचे भवितव्य त्यांच्या हाताबाहेर नेणारा ठरू शकतो.

सध्या १४ गुणांसह गुणतालिकेत चौथ्या स्थानावर असलेल्या राजस्थान रॉयल्स संघाला मुंबई इंडियन्सविरुद्ध विजय मिळविणे अनिवार्य आहे. या विजयासह त्यांचे गुण १६ वर पोहोचतील आणि प्ले-ऑफच्या शर्यतीत अजूनही कायम असलेल्या पंजाब किंग्स व कोलकाता नाइट रायडर्स या दोन्ही संघांपेक्षा ते किमान एका गुणाने का होईना, पण आघाडीवर असतील.

मात्र, जर रविवारी राजस्थान रॉयल्स संघाचा पराभव झाला, तर प्ले-ऑफमध्ये स्थान मिळवण्याची कोणतीही संधी टिकवून ठेवण्यासाठी, त्यांना पंजाब आणि कोलकाता नाईट



रियान पराग



हार्दिक पांड्या

रायडर्स या दोन्ही संघांनाही त्यांच्या अखेरच्या सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागेल, अशी आशा करावी लागेल.

राजस्थान रॉयल्स संघाने आपल्या मागील पाच सामन्यांमध्ये विजयांपेक्षा पराभवांचीच संख्या अधिक पाहिली आहे; तरीही, वानखेडे स्टेडियमच्या तुलनेने लहान असलेल्या मैदानाची रचना आणि येथील परिस्थितीची पूर्ण कल्पना असल्याने मुंबई इंडियन्सविरुद्ध विजय मिळविण्याची आपली संधी उज्ज्वल असल्याचे त्यांना वाटत असेल.

### आजचे सामने

**मुंबई इंडियन्स वि. राजस्थान रॉयल्स**
**स्थळ** : वानखेडे स्टेडियम, मुंबई
**वेळ** : दुपारी ३.३० वाजतापासून
००
**कोलकाता नाईट रायडर्स वि. दिल्ली कॅपिटल्स**
**स्थळ** : ईडन गार्डन्स स्टेडियम, कोलकाता
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

### रवी सिंगच्या जागी इमनजोत चहल

राजस्थानने रवी सिंगच्या जागी डावखुरा फिरकी गोलंदाज इमानजोत चहलला संघात घेतले आहे. रवी सिंग पायाच्या दुखापतीमुळे संघाबाहेर आहे.

◂(वृत्तसंस्था)

### आयपीएल गुणतालिका

| संघ | सामने | विजय | पराभव | गुण | नेट रनरेट |
|---|---|---|---|---|---|
| रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू | १४ | ९ | ५ | १८ | ०.७८३ |
| गुजरात टायटन्स | १४ | ९ | ५ | १८ | ०.६९५ |
| सनरायझर्स हैदराबाद | १४ | ९ | ५ | १८ | ०.५२४ |
| राजस्थान रॉयल्स | १३ | ७ | ६ | १४ | ०.०८३ |
| पंजाब किंग्स | १३ | ६ | ६ | १३ | ०.२२७ |
| कोलकाता नाईट रायडर्स | १३ | ६ | ६ | १३ | ०.०११ |
| चेन्नई सुपर किंग्स | १४ | ६ | ८ | १२ | -०.३४५ |
| दिल्ली कॅपिटल्स | १३ | ६ | ७ | १२ | -०.८७१ |
| मुंबई इंडियन्स | १३ | ४ | ९ | ८ | -०.५१० |
| लखनौ सुपर जायंट्स | १३ | ४ | ९ | ८ | -०.७०२ |

(हैदराबाद-बंगळुरूदरम्यानच्या सामन्यापर्यंतची गुणतालिका)

# निलेश गायकवाड अकॅडमीचा अंतिम फेरीत प्रवेश

## मास्टर्स अकॅडमीची १६ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धा: कन्ना व बोमरा चमकले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे -**

मास्टर्स क्रिकेट अकॅडमीतर्फे डोणगाव रोडवरील पुष्प अकॅडमीच्या मैदानावर सुरु असलेल्या १६ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेतील पाचव्या सामन्यात निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमीने मॉडेल क्रिकेट अकॅडमीवर १ गडी राखून थरारक विजय मिळवित अंतिम फेरी गाठली. सार्थक कन्नाच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर निलेश गायकवाड अकॅडमीने हा सामना खिशात घातला.

मॉडेल क्रिकेट अकॅडमीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. निर्धारित ५० षटकांत मॉडेल अकॅडमीने ९ बाद २०३ धावांपर्यंत मजल मारली. त्यांच्याकडून दर्शन हिरकुरने ५६ धावांची अर्धशतकी खेळी केली, तर झैद शेखने ४० व अभिषेक देशमुख ३३ व रुद्र चौगुलेने २१ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. निलेश गायकवाड अकॅडमीच्या गोलंदाजांनी अचूक मारा करत मॉडेलच्या धावसंख्येला वेसण घातली. गोलंदाजीत आर्यन भूमकर , सार्थक कन्ना व आर्यन हंगेने प्रत्येकी २ बळी टिपले.



सार्थक कन्ना



रणबीरसिंग बोमरा

२०४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना निलेश गायकवाड अकॅडमीची सुरुवात डळमळीत झाली. मात्र, सार्थक कन्नाच्या ६४ धावा आणि रणबीरसिंग बोमराच्या ५९ धावांच्या जोरावर संघाने सामन्यात पुनरागमन केले. अर्जुन चटके ११ धावा यश पवार १७ धावा करीत साथ दिली. शेवटच्या षटकांमध्ये सामन्यात प्रचंड थरार निर्माण झाला होता, अखेर २९.२ षटकांत ९ गडी गमावून २०५ धावा करत निलेश गायकवाड अकॅडमीने १ गडी राखून विजय साजरा केला. मॉडेल अकॅडमीकडून गोलंदाजी करताना समर्थ व झैद शेखने प्रत्येकी २ बळी टिपले. गौरव गाडेकर, संस्कार गवळी, आदिराज रणसिंग व श्रीवर्धन नांदाल यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. पण ते आपल्या संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत. दोन महत्त्वाचे बळी घेणाऱ्या सार्थक कन्नाला 'सामनावीर' पुरस्काराने गौरविण्यात आले. पंच म्हणून नबीलाल पटेल व असलान शेख यांनी तर गुणलेखक म्हणून वरूण डोंबाळे यांनी काम पहिले.

**उद्याचा सामना :**

रोहन क्रिकेट अकॅडमी (लातूर) विरुद्ध मास्टर्स क्रिकेट अकॅडमी.

# 'एसएसआय'चा मॉडेल क्लबवर ९४ धावांनी विजय

## विजय चषक क्रिकेट स्पर्धा: निखिल दोरनालचे शतक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ मे-**

विजय ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत 'एसएसआय' संघाने 'मॉडेल क्लब'चा ९४ धावांनी धुव्वा उडवत स्पर्धेत विजयी घोडदौड सुरू केली आहे. निखिल दोरनालचे शानदार शतक आणि त्याला विशाल मुंगापाटीलने दिलेल्या अर्धशतकी साथीच्या बळावर एसएसआयने हा सामना एकतर्फी जिंकला.



निखिल दोरनाल



विशाल मुंगापाटील

मॉडेल क्लबने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, एसएसआयच्या फलंदाजांनी हा निर्णय सपशेल चुकीचा ठरवला. फलंदाजीसाठी उतरलेल्या एसएसआय संघाने निर्धारित ४० षटकांत ९ बाद ३२९ धावांचा डोंगर उभा केला. एसएसआयच्या निखिल दोरनालने मैदानाभोवती चौफेर फटकेबाजी करत १०७ धावांची शतकी खेळी केली, तर विशाल मुंगापाटीलने ८३ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. मॉडेल क्लबकडून गोलंदाजी करताना वर्धन दळवेने सर्वाधिक ३ बळी घेतले, तर राजवर्धन जिल्हा आणि राजेश यमूल यांनी प्रत्येकी २ बळी घेत एसएसआयच्या धावसंख्येला ब्रेक लावण्याचा प्रयत्न केला. ३३० धावांच्या विशाल आव्हानाचा पाठलाग करताना मॉडेल क्लबला ४० षटकांत ५ बाद २३५ धावांपर्यंतच मजल मारता आली. मॉडेल क्लबकडून राजवर्धन जिल्हाने ८० धावांची झुंजार खेळी केली आणि यश गुंजलने नाबाद ५६ धावा करत चांगली लढत दिली. मात्र, एसएसआयच्या अचूक गोलंदाजीसमोर इतर फलंदाजांना मोठी खेळी करता आली नाही. एसएसआयकडून समर्थ दोरानालने २ बळी घेतले, तर चेतन नारायण आणि निखिल दोरानाल यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. एसएसआय संघाने हा सामना ९४ धावांनी खिशात घातला. उत्कृष्ट शतकी खेळी करणाऱ्या निखिल दोरनालला 'सामनावीर' म्हणून घोषित करण्यात आले. पंच म्हणून चंदू मंजेली व अशोक डोंबाळे तर गुणलेखक म्हणून शुभम मुत्तुर यांनी यांनी काम पाहिले.

# मध्य रेल्वे परेलची घोडदौड; रेल्वेची स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा

## ठाणेच्या मारिया क्लबचा सुपर ओव्हमध्ये विजय; मोहम्मद हाशिम सय्यद, देवा ठाकूर, प्रेम देवकर सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

रेल्वेची ७९ वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत सेंट्रल रेल्वे मेकॅनिक इन्स्टिट्यूट परेलने दोन विजय मिळवित विजयी घोडदौड कायम ठेवली आहे.

रेल्वेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेत शनिवारी झालेल्या सामन्यात सेंट्रल रेल्वे मेकॅनिक इन्स्टिट्यूट परेलने ३९ धावांनी नमविले. मोहम्मद हाशिम सय्यद सामनावीर ठरला.

दुसऱ्या सामन्यात ठाणेच्या मारिया क्रिकेट क्लबने अटीतटीच्या सामन्यांमध्ये सुपर ओव्हरमध्ये कलबुर्गीच्या कर्नाटका क्रिकेट क्लबवर मात केली. कर्नाटका क्रिकेट क्लबला सहा चेंडूमध्ये दोन धावांची गरज होती. परंतु मारिया क्रिकेट क्लबने सुपर ओव्हरमध्ये आपला विजय निश्चित केला. सुपर







ओव्हमध्ये कर्नाटका क्रिकेट क्लबने एका षटकांत १ बाद ७ धावा केल्या. मारिया क्लबने २ चेंडूतच बिन बाद १० धावा करीत सामना जिंकला. देवा ठाकूर सामन्याचा मानकरी ठरला.

शुक्रवारी झालेल्या सामन्यात सेंट्रल रेल्वे मेकॅनिक इन्स्टिट्यूट परेलने रॉयल फ्रेंडस क्लबवर २३ धावांन मात केली. प्रेम देवकर सामन्याचा मानकरी ठरला. सामनावीर पुरस्कार शिरीष जगताप, लियाकत शेख, अंबादास तोरा, रामसुभाष मालव, प्रकाश सुरूडीकर व राजा पटेल यांच्या उपस्थितीत देण्यात आले.

पंच म्हणून सोहेल शेख, दया नवले, महेश सोनवणे व प्रवीण कुलकर्णी तर गुणलेखक म्हणून विशाल कुलकर्णी सचिन गायकवाड यांनी काम पाहिले. सामनावीरचे सर्व पुरस्कार सुदेश मालप व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहे.

**संक्षिप्त धावफलक:**

**सेंट्रल रेल्वे मेकॅनिक इन्स्टिट्यूट परेल क्लब** : २० षटकांत ७ बाद १६३ ( कासिम मलिक २६, सुरज कुर्मी २५, असीम सय्यद १७, विवेक वेलानी ३-२०, सुशांत तीर्थ २-२७) **विजयी विरुद्ध ॲडव्होकेट ११** : २० षटकांत ९ बाद १२३ (प्रविण ननावरे ३२, चिन्मय कोणापुरे १६, शिरीष जगताप ११, मोहमद हाशिम ४-२०, प्रेम देवकर २-१४, कासिम मलिक २-३७, करुणेश उनवे १-११).

**मारीया क्रिकेट क्लब ठाणे** : २० षटकांत ६ बाद १४३ (राजापनदी शेरवय ५९, जयेंद्र २४, मिथ घोळत १४, रोहन रेड्डी ४-१४, शिवकुमार ४-३४) **विजयी विरुद्ध कर्नाटका क्रिकेट क्लब कलबुर्गी** : १९.३ षटकांत सर्व बाद १४३ (पुत्तरज आर्यम ५९, प्रशांत इराण्णा ५४, देवा ठाकूर ३-३९, सुमित १-२३, अभिषेक १-२२

**सेंट्रल रेल्वे मेकॅनिक इन्स्टिट्यूट परेल** : २० षटकांत ७ बाद १७३ (अमित यादव ३५, प्रेम देवकर ३२, सुरज कुर्मी २१, शुभम देवरकोंडा २- २४, राजकुमार हिरेमठ २-३२, रोहित देशमुख १-४४) **विजयी विरुद्ध रॉयल फ्रेंड्स क्रिकेट क्लब** : १९.५ षटकांत सर्व बाद १५० (रोहित देशमुख ३८, राजकुमार हिरेमठ २३. आदर्श पाटील २०, अनिल कोकरे ३-३१, मोहमद हाशिम २-११, सुरज कुर्मी २-१३, प्रेम देवकर २- ४१ धावा २ बळी.

**आजचे सामने**

**सकाळी** : टाइम्स ११ विरुद्ध ग्लोबल क्रिकेट क्लब
**दुपारी** : मारिया क्रिकेट क्लब ठाणे विरुद्ध ख्वाजा बंदेनवाज क्रिकेट क्लब कलबुर्गी.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### फायटर स्पोर्ट्स अकॅडमीच्या समर कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २३ मे-**

टेंभुर्णीतील संकेत मंगल कार्यालय येथे फायटर स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन केले होते. त्याअंतर्गत आयोजित समर कॅम्पला मुला-मुलींचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. शिबिराचे उद्घाटन प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सांगता समारंभ बेंबळे जिल्हा परिषद सदस्य सविता कोकाटे यांच्याहस्ते झाला. यावेळी त्यांनी समर कॅम्प आयोजनाचे कौतुक केले. मुलांना मोबाईल फोन पासून दूर राहून लाठी-काठी, दांडपट्टा, तलवारबाजी इत्यादी खेळ शिकायला मिळाले. शेवटच्या दिवशी मुलांनी पालकांसमोर प्रात्यक्षिके सादर करून दाखवली. कॅम्पमध्ये मुलांना राजा शिवाजी हा चित्रपट तसेच वॉटर पार्कलाही नेण्यात आले होते. मुलांमधून बेस्ट कमांडो ट्रॉफी प्रमाणपत्र शिवतेज जगताप व मुलीमधून बेस्ट कमांडो ट्रॉफी व प्रमाणपत्र प्रतीक्षा मुळे यांना देऊन गौरविण्यात आले. विविध खेळांमधून प्रत्येक विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले शिबिरात १२८ मुला मुलींचा सहभाग नोंदवला होता. श्रीकांत पुजारी, शुभम पुरवत, रणजीत चंदनकर, सुरेश खोत, भारत जगताप, मीनाक्षी खरात, तेजस्विनी बनसोडे यांच्या हस्ते मुलांचा सन्मान करण्यात आला. प्रशिक्षक म्हणून मृणाली सावंत,कोमल देशमाने,आरकिले, यश रेडे, ओम माने, तेजप्रताप पाटील, यश बनसोडे यांनी काम केले. कार्यक्रमासाठी आयोजक संयोजक स्नेहदिप व्यवहारे, अनंत उंबरदंड यांनी परिश्रम घेतले.

### ताडसौंदणे येथे तरुण शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या; कारण अस्पष्ट

**बार्शी, दि.२३ मे-**

बार्शी तालुक्यातील ताडसौंदणे येथे शेतामधील पत्राशेडमध्ये गळफास घेतलेल्या अवस्थेत एका शेतकऱ्याचा मृतदेह आढळून आला. शुक्रवार दि. २२ मे रोजी दुपारी उघडकीस आली. विश्वास मोरे (वय ३५, रा. ताडसौंदणे, ता. बार्शी, जि. सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. याबाबत रोहन सातपुते (वय २५, रा. ताडसौंदणे) यांनी पोलिसांत खबर दिली आहे. २२ मे रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास ते ट्रॅक्टरने शेतात जात असताना विश्वास मोरे यांची मुलगी समृद्धीने थांबवत माझ्या पप्पांना वाचवा अशी आर्त हाक दिली. त्यानंतर रोहन सातपुते यांनी मित्र सुनिल शिंदे यांच्यासह शेडकडे धाव घेतली. शेडमध्ये विश्वास मोरे यांनी पत्राशेडच्या अँगलला सुताच्या दोरीने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. दोघांनी त्यांना खाली उतरविले. मात्र ते मृतावस्थेत असल्याचे लक्षात आले. दरम्यान आत्महत्येचे कारण अस्पष्ट असून पोलिस तपास करत आहेत



### मुळवीत पहाटे कुटुंबावर हल्ला; व्हिडीओ व्हायरल, पोलिस चौकशी सुरू

**मंगळवेढा, दि. २३ मे -**

तालुक्यातील मुळवी गावात दि. २३ च्या पहाटे सुमारे ३ वाजताच्या दरम्यान चंद्रकांत कदम यांच्या कुटुंबावर हल्ला होत असल्याचा एक व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला आहे. व्हिडीओमध्ये दहा मोटारसायकलवरून येणाऱ्या व्यक्तींचा मोठा गट घराभोवती फिरताना आणि काही वाहनांची विकृती करताना दिसतो. सकाळी ११२ हॉटलाईनवर गावकऱ्यांनी झालेल्या हल्ल्याची तक्रार नोंदविल्यानंतर पोलिस हवालदार तुकाराम कोळी यांच्यासह पोलिस कर्मचारी घटनास्थळी त्वरीत दाखल झाले. पोलिस निरीक्षणानुसार घराचा दरवाजा, अंगणातील काही वस्तू आणि मोटारसायकलींची काही भागीण तुटलेली दिसली. घटनास्थळी पोलीसांनी प्राथमिक नोंदी, व्हिडीओचे प्रारूप आणि स्थानिक साक्षीदारांची माहिती गोळा करायला सुरुवात केली आहे. पोलिस सूत्रांनुसार रात्री उशिरापर्यंत अधिकृत गुन्हा दाखल झाला नव्हता. प्राथमिक चौकशीवरून तात्काळ तपास सुरू ठेवण्याचे आदेश आहेत. व्हिडीओची सत्यता शोधण्यासाठी त्यांना अधिक पुरावे आणि साक्षीदारांची जबाबदारीची माहिती आवश्यक आहे. घटनेची प्रकृती आणि कारणे अद्याप अस्पष्ट आहेत. त्यामुळे संशयितांबाबत कोणतेही निष्कर्ष लवकरच काढले जात नाहीत, असे पोलिस अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. चंद्रकांत कदम कुटुंबीयांनी तात्काळ तक्रार नोंदवली असून आपल्या सुरक्षिततेबाबत भीती व्यक्त केली.

## निधन वृत्त...

### माजी नगरसेवक प्रवीण निकाळजे

**सोलापूर, दि. २३ मे-**



काँग्रेसचे माजी नगरसेवक व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते प्रवीण उत्तमराव निकाळजे (वय ५८) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने शनिवारी सकाळी ९ वाजता निधन झाले.

संजय नगर येथील निवासस्थानी पहाटेच्या सुमारास त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यानंतर कुटुंबीयांनी त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, एक मुलगा, दोन भाऊ असा परिवार आहे. शनिवारी सायंकाळी त्यांच्यावर मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. खा. प्रणिती शिंदे यांनी त्यांना श्रद्धांजली वाहून परिवाराचे सांत्वन केले.

प्रवीण निकाळजे हे २०१७ मध्ये काँग्रेसचे नगरसेवक म्हणून निवडून आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल हायस्कूलचे ते संचालक होते. सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते.

# आखाती युध्दाचा शेतकऱ्यांना मोठा फटका

## रासायनिक खते, इंधन, मशागतीच्या दरात वाढ



**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २३ मे-**

आखाती देशातील युद्धाचा शेतीवर मोठा परिणाम झाला आहे डिझेलच्या दरात वाढ होत असून ऐन खरीपाच्या तोंडावर खतांच्या किमतीतही मोठी दरवाढ झाली आहे. मशागतीच्या खर्चातही वाढ झाल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका बसत आहे.

डिझेलच्या दरवाढीने ट्रॅक्टर व जेसीबीच्या भाड्यात मोठी वाढ झाली आहे. नांगरणी, फणणी, रोटरीच्या सहाय्याने तसेच जेसीबीने करावयाची कामे यामध्ये २०० ते ३०० रुपयाची मोठी वाढ झाली आहे. मशीन व ट्रॅक्टरचे हप्ते, ड्रायव्हरचा पगार, मशीनचा देखभाल खर्च या सगळ्याचा ताळमेळ घालताना शेतकऱ्यांची गणिते बिघडत आहेत. यामुळेच मशागतीच्या दरात मोठी दरवाढ केली आहे. शेतकरी खरीप हंगाम सुरु होण्यापूर्वी नांगरट, फणणी, रोटर मारणे जमीन सपाटीकरण, शेततळे असेल किंवा चारी काढणे अशी कामे ट्रॅक्टर व जेसीबी मार्फत करीत असतात. पण दरवाढीमुळे मोठा आर्थिक भार शेतकऱ्यांना सोसावा लागत आहे.

शेतकरी मशागतीसाठी ट्रॅक्टरचाच वापर करतात. पुर्वी बैलांनी मशागतीची कामे करत, पण सध्या शेतकऱ्यांनी बैलच ठेवले नाहीत. ही कामे पावसाळ्यापूर्वी करणे आवश्यकच आहेत. मशागतीच्या दरवाढीचा भार सोसावा लागत असतानाच खते, बियाणे, तणनाशकांच्या किंमतीतही मोठी वाढ झाली आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. शासनाने किमान शेतकऱ्यांना खरीप हंगामापासुन पिकांना उत्पादन खर्चाचा वाढता आलेख पाहता हमीभाव वाढण्याची आवश्यकता आहे. तेव्हाच शेतकऱ्यांचे आर्थिक गणित जुळेल अन्यथा शेतकरी कर्ज बाजारी झाल्याशिवाय राहणार नाही. मात्र यंदा तरी युद्धाचे ढग विरण्याची चिन्हे दिसत नसल्याने शेतकऱ्यांपुढील संकटात वाढ होणार आहे.

> डिझेल दरात मोठी वाढ झाल्यामुळे सर्व होणाऱ्या खर्चाचा ताळमेळच जुळत नाही, नाईलाजानेच दरवाढ करावी लागत आहे.
>
> **-नितीन मदने-पाटील,** जेसीबी व ट्रॅक्टर मालक

> डिझेल दरात मोठी वाढ झाली आहे. यामुळेच ट्रॅक्टरने केल्या जाणाऱ्या मशागतीचे दर वाढवण्याशिवाय पर्याय नाही.
>
> **-राजेंद्र इंगळे,** ट्रॅक्टर मालक.

# आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्याच वस्तीत अस्वच्छतेचे साम्राज्य

## विक्रम शिरसट यांचा आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ मे -**



शहरातील १९७ ब, रामबाग रोड झोपडपट्टी परिसरात नगरपालिकेचे अनेक आरोग्य कर्मचारी राहतात. मात्र, याच परिसरात ड्रेनेज लाईन आणि उघड्या गटारींचा प्रश्न गंभीर बनला असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. भागातील महिलांनी माजी नगरसेवक विक्रम शिरसट यांच्याकडे समस्या मांडल्या.

दोन महिन्यांपासून ड्रेनेजची चेंबर तुंबून भरुन वाहत आहेत. मैलायुक्त पाणी घरांमध्ये शिरत आहे. गटारी सतत तुंबलेल्या असल्याने दुर्गंधी पसरत आहे. अस्वच्छतेमुळे नागरिकांना श्वसन तसेच हृदयविकारासारखे आजार उद्भवत आहेत.

> आरोग्य विभागात सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच अस्वच्छ वातावरणात राहावे लागत असेल, तर सामान्य नागरिकांचे काय? पालिकेने तातडीने हा प्रश्न मार्गी न लावल्यास हे मैलामिश्रित पाणी नगरपालिकेच्या दालनात आणून टाकू तसेच नगरपालिकेविरोधात तीव्र आंदोलन छेडू.
>
> **- विक्रम शिरसट,** माजी नगरसेवक, पंढरपूर.

# संभाजी आरमारचा वज्रमुठ मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**




छत्रपती संभाजी महाराज जयंती आणि संभाजी आरमार संघटनेच्या १८ व्या वर्धापन दिनानिमित्त सोलापूर येथील वोरोनोका प्रशाला मैदानावर संभाजी आरमार संघटनेच्या वतीने वज्रमुठ मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी उपस्थिती लावली आणि त्यांच्या हस्तेच विविध मान्यवरांचा सत्कार सोहळा पार पडला.

यामध्ये अन्नछत्र मंडळाचे प्रमुख जन्मेजयराजे भोसले, सोलापूर जिल्हा यंत्रमागधारक संघ, चादर-टर्किश टॉवेल गारमेंट उत्पादक संघटनेच्या कार्याचा गौरव करून सन्मान केला. तसेच सांगोला तालुक्यातील अजनाळे गावातील शेतकऱ्यांनी शेततळ्यांच्या माध्यमातून क्रांती घडवत वार्षिक १५० कोटी रुपयांच्या डाळिंब उत्पादनाचा विक्रम घडविला असून, त्यांच्या या विक्रमी कामगिरीचा देखील सन्मान केला.

या मेळाव्याच्या निमित्ताने शाहीर महाराष्ट्राचा संतोष साळुंखे यांचा छत्रपती शिवाजी महाराज छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर आधारित प्रेरणादायी स्फूर्ती गीतांचा कार्यक्रम झाला. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी या कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती संभाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून संघटनेच्या वतीने करण्यात आलेल्या सत्काराचा स्वीकार केला.

यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, संभाजी आरमार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे, कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, यांच्यासोबत संघटनेचे सर्व पदाधिकारी, सोलापूर शहरातील नागरिक मोठ्या संख्येने या वज्रमुठ मेळाव्यास उपस्थित होते.



# पालकमंत्र्यांकडून दिलीप धोत्रे यांच्या तब्येतीची विचारपूस

## निवासस्थानी भेट; लवकर बरे होण्याची दिली शुभेच्छा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२३ मे -**

काही दिवसांपूर्वी मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या गाडीचा पुणे-मुंबई महामार्गावर भीषण अपघात झाला होता. अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. आज पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी त्यांची पंढरपुरातील घरी भेट घेत तब्येतीची विचारपूस केली.

अपघातानंतर धोत्रे यांच्यावर पुणे येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारानंतर ते पंढरपूर येथील त्यांच्या निवासस्थानी परतले आहेत. शनिवारी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पंढरपूर येथे जाऊन मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या निवासस्थानी भेट घेतली. धोत्रे यांच्या प्रकृतीबाबत माहिती घेत लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह विविध राजकीय पक्षांतील अनेक नेतेमंडळींनी दूरध्वनीद्वारे तसेच प्रत्यक्ष भेट देत दिलीप धोत्रे यांच्या तब्येतीची विचारपूस केली होती. धोत्रे पंढरपूर येथे आल्यानंतर शनिवारी झालेल्या या भेटीमुळे राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांना धीर दिला. यावेळी सहकार शिरोमणी वसंतराव काळे साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे, नगरसेवक किरणराज घाडगे, नगरसेवक संजय बंदपट्टे, नगरसेवक प्रसाद कळसे, समाजसेवक बाबा चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

# बार्शीत कत्तलीसाठी जनावरांची अमानुष वाहतूक उघड; वाहनासह चालक ताब्यात

## प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २३ मे-**

कत्तलीसाठी अमानुष पद्धतीने जनावरांची वाहतूक करणाऱ्या वाहनावर बार्शी शहर पोलिसांनी कारवाई केली. कारवाईत तीन जनावरे व वाहन ताब्यात घेतले आहे. वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिस कॉन्स्टेबल कुमार माने यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शनिवार दि. २३ मे २०२६ रोजी सकाळी १०.४८ वाजण्याच्या सुमारास नियंत्रण कक्ष सोलापूर येथून जैन मंदिर, कुर्डुवाडी रोड बार्शी येथे मारुती सुझुकी कंपनीच्या छोटा हत्ती वाहनातून जनावरांची कत्तलीसाठी वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाली. त्यावरुन कॉन्स्टेबल कुमार माने व कॉन्स्टेबल चौधरी यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. तेथे एमएच १३ सीयू ४६७४ क्रमांकाचा पांढऱ्या रंगाचा छोटा हत्ती उभा असल्याचे आढळले. कॉलर किशोर आकोसकर यांनी वाहनचालकास पकडून ठेवले होते.

चौकशी दरम्यान चालकाने आपले नाव लक्ष्मण सुरेश शिंदे (वय ३१, रा. जामगाव, ता. माढा, जि. सोलापूर) असे सांगितले. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये दोन रेडे व एक जर्सी जातीचे खोंड अशी तीन जनावरे अत्यंत अमानुष पद्धतीने कोंबून बांधलेली आढळली. जनावरांच्या चारापाणी किंवा औषधांची कोणतीही सुविधा उपलब्ध नव्हती. चालकाकडे जनावरांच्या वाहतुकीसाठी आवश्यक वैध परवानाही नव्हता. जनावरे बार्शी यार्डात घेऊन जात असल्याचे चालकाने सांगितले होते.

यानंतर पोलिसांनी जनावरांनी भरलेले वाहन चालकासह ताब्यात घेत बार्शी शहर पोलिस ठाण्यात आणले. या प्रकरणी लक्ष्मण सुरेश शिंदे याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# 'लोकमंगल'तर्फे बुधवारपासून निवासी बालसंस्कार शिबिर

**सोलापूर, दि. २३ मे-**

विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त, राष्ट्रप्रेम, नैतिक मूल्ये आणि आध्यात्मिक विचार रुजविण्याच्या उद्देशाने आमदार सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली लोकमंगल फाउंडेशन व सोलापूर सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने निवासी बालसंस्कार शिबिराचे आयोजन केले आहे. आजचे संस्कारयुक्त बालक हे उद्याचे आदर्श नागरिक या संकल्पनेवर आधारित हे शिबिर २७ मे ते २९ मे या कालावधीत लोकमंगल कॉलेज, वडाळा, ता. उत्तर सोलापूर येथे पार पडणार आहे. शिबिरात विद्यार्थ्यांसाठी वारकरी प्रशिक्षण, टाळ वादन प्रशिक्षण, पंचपदी प्रशिक्षण, हरिपाठ, कीर्तन मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास, संस्कारक्षम कथा, मोबाईलचे दुष्परिणाम, उत्तम आरोग्यासाठी आहार, सामूहिक खेळ, कला गुणदर्शन, प्रश्नमंजुषा तसेच सहविचार गप्पा आदी विषयांचा समावेश आहे. शिबिरासाठी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी विराट माशाळे ( समन्व्यक - ८८५७८३०७१७) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# घाणेगावला दर्जेदार रस्त्यांची प्रतीक्षा

## तेल घाण्यांचा वारसा ते उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचे वैभव असलेले गाव

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २३ मे -**

वैरागपासून पाच किलोमीटर वसलेले, साडेतीन हजार लोकसंख्येचे 'घाणेगाव' हे बार्शी तालुक्यात कायम अग्रस्थानी राहिले आहे. तेलाच्या घाण्यांचा वारसा ते उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचे वैभव लाभले आहे. मात्र विकासाच्या उंबरठ्यावर असलेल्या गावाला आता दर्जेदार रस्त्यांची प्रतीक्षा आहे.

पूर्वी या गावामध्ये तेलाच्या घाणी प्रचंड प्रम ाणात होत्या. त्यामुळे गावचे नाव 'घाणेगाव' असे रूढ झाले. गावातील बहुतांश लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. भुईमुगाचे हे मुख्य पीक असून आता शेतकऱ्यांचा नगदी पिकांकडे कल वाढला आहे. रब्बी ज्वारीसह येथील कष्टाळू शेतकरी डाळिंब, द्राक्षे आदी फळबागांचीही यशस्वी लागवड करत आहेत. गावाला हिंगणी (पा.) मध्यम प्रकल्पाचा मोठा फायदा होतो. तलावातून कालव्याद्वारे पिण्याचे आणि सिंचनाचे पाणी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते, ज्यामुळे येथील शेती बहरली आहे.

घाणेगावमध्ये शिक्षणाचा दर्जा सुरुवातीपासूनच उत्तम राहिला असून येथील वातावरण अभ्यासपूरक आहे. सन १९११ मध्ये स्थापन झालेल्या जिल्हा परिषद शाळेला तब्बल ११५ वर्षांचा ऐतिहासिक वारसा आहे. तर कै. शोभाताई सोपल माध्यमिक विद्यालयामुळे (स्थापना १९९९) गावातील मुलींचे शिक्षणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. घाणेगावचे अनेक सुपुत्र आज देश-विदेशात आणि




शासनाच्या उच्च प्रशासकीय पदांवर कार्यरत आहेत. वैष्णवी पाटील (शास्त्रज्ञ, इस्रो) मुकुंद पवार: (डी.डी.आर.अधिकारी), रणधीर शिंदे: (मराठी विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ), शहाजी गोसावी (अधिकारी, एम.एस.ई.बी.) डॉ. आनंद मोरे, डॉ. आदित्य जाधव, डॉ. सुदर्शन चवरे, डॉ. तुषार दोलतोडे, डॉ. विनय जाधव आदी डॉक्टर. निखील मोरे: (भूमी अभिलेख अधिकारी), शरद शिंदे: (सर्कल अधिकारी), गोविंद बचुटे: ( मुख्याध्यापक), हनुमंत जाधव: (प्राध्यापक), प्रदीप काटे: (प्राध्यापक), विलास मस्तूद: (बँक अधिकारी), धन्यकुमार मोरे: (मुख्याध्यापक), विक्रम टकले: (मुख्याध्यापक), पांडूरंग काळे: (मुख्याध्यापक), महादेव जाधव: (मुख्याध्यापक), आशितोष जाधव: (प्रशासकीय अधिकारी), अशोक गवळी: (ग्रंथपाल), सुनील जाधव: (ग्रंथपाल) आदींसह गावात २५ हून अधिक शिक्षक, १० पोलीस जवान, ५ ग्रामसेवक, १० एसटी कर्मचारी कार्यरत आहेत.

शैक्षणिक आणि बौद्धिक क्षेत्रात संपूर्ण तालुक्यात अग्रेसर आणि एवढा मोठा अधिकारी वर्ग असलेले गाव असूनही, रस्त्यांच्या बाबतीत मात्र येथे प्रशासकीय अनास्था स्पष्टपणे दिसून येते. योग्य प्रशासकीय व नियोजनाच्या अभावामुळे गावाला जोडणारे सर्वच बाजूंचे मुख्य रस्ते आज अत्यंत दयनीय आणि दुरावस्थेत पोहोचले आहेत. रस्त्यांवरील मोठ्या खड्ड्यांमुळे वाहनधारकांना, शाळकरी मुलांना आणि रुग्णांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. देश-विदेशात गावाचा डंका वाजवणारा अधिकारी वर्ग देणाऱ्या या घाणेगावची रस्त्यांची समस्या प्रशासनाने तातडीने दूर करावी, अशी संतप्त भावना समस्त ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

### गावाला ऐतिहासिक मंदिरांचा वारसा

गावाला ऐतिहासिक संगमेश्वर आणि सिद्धेश्वर मंदिरांचा अद्वितीय वारसा लाभला आहे.'भोगावती' आणि 'नीलकंठा' या दोन पवित्र नद्यांचा त्रिवेणी संगम जवळ आहे. संगमावर यादवकालीन हेमाडपंथी 'संगमेश्वर मंदिर' भाविकांचे श्रद्धास्थान आहे. दर सोम वारी परिसरातील भाविक येथे मोठ्या संख्येने दर्शनासाठी हजेरी लावतात. महाशिवरात्रीला येथे भव्य यात्रा भरते. ग्रामदैवत असलेल्या प्रभू हनुमानाची यात्रा दरवर्षी दत्त जयंतीनंतर येणाऱ्या पहिल्या शनिवारी अत्यंत उत्साहात साजरी केली जाते.

# प्रतिबंधित मांगूर माशांची मोठी वाहतूक; ३ हजार किलो जिवंत मांगूर मासे नष्ट

## तब्बल १८ तासानंतर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.२३ मे-**

बार्शी तालुका पोलिस ठाण्याच्या रात्रगस्त पथकाने नागोबाचीवाडी शिवारातील परांडा चौकाजवळ मोठी कारवाई करत केंद्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या मांगूर प्रजातीच्या माशांची अवैध वाहतूक उघडकीस आणली आहे. या कारवाईत अंदाजे १८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सुमारे ३ हजार किलो जिवंत मांगूर मासे नष्ट करण्यात आले आहेत.

दि. २२ मे २०२६ रोजी पहाटे २ वाजण्याच्या सुमारास बार्शी बायपास रोडवरील नागोबाचीवाडी परिसरात रात्रगस्तीदरम्यान पोलिसांना एक अशोक लेलँड कंपनीचा संशयित टेम्पो (क्र. घ-५२-इ-४६८७) उभा असल्याचे आढळून आले. वाहन चालकाकडे चौकशी केली असता त्याने संशयास्पद उत्तरे दिल्याने पोलिसांनी टेम्पोची तपासणी केली.

टेम्पोच्या मागील भागात ताडपत्रीचा हौद तयार करून त्यामध्ये पाण्यात जिवंत मासे वाहतूक होत असल्याचे दिसून आले. यानंतर बार्शी तालुका पोलिसांनी मत्स्य व्यवसाय विभागाशी संपर्क साधून अधिक तपासणी केली.

### दिवसभर नेमक्या कोणत्या हालचाली सुरू होत्या?

पहाटेच वाहन ताब्यात घेऊन प्रतिबंधित मासे जप्त करण्यात आले होते. मत्स्य व्यवसाय विभागालाही तातडीने कळविण्यात आले होते. असे असतानाही दिवसभर गुन्हा दाखल करण्यात विलंब का झाला? कोणत्या पातळीवर चर्चा सुरू होत्या? कोणाच्या हस्तक्षेपामुळे कारवाई थांबली होती का? असे अनेक प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. गुन्हा नोंदवण्यासाठी जवळपास १८ तासांचा कालावधी लागल्याने बार्शी तालुका पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या संपूर्ण प्रकरणात नेमके काय घडले, दिवसभर कोणत्या हालचाली सुरू होत्या, गुन्हा दाखल करण्यास विलंब का झाला याबाबत पारदर्शक खुलाशाची मागणी होत आहे.



सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय, सोलापूर भिमाशंकर शरणप्पा पाटील व कनिष्ठ लिपिक विनोद शिवाजी वाघमोडे यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात येऊन माशांची पाहणी केली असता ते केंद्र शासनाने प्रतिबंधित केलेले मांगूर प्रजातीचे मासे असल्याचे स्पष्ट झाले.

पोलिसांनी चालक संदिप बारातीलाल कुमरे (वय ३५, रा. हराई, ता. लखनादोन, जि. सिवनी, मध्यप्रदेश) व त्याच्यासोबत असलेला सत्येंद्र कुमार दशरथ इरपाची (वय २९, रा. बम्होडी, ता. लखनादोन, जि. सिवनी, मध्यप्रदेश) यांना ताब्यात घेतले. चौकशीत हे मासे पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथून भरून मध्यप्रदेशातील भोपाळ येथे नेण्यात येत असल्याची माहिती समोर आली. या कारवाईत अंदाजे १५ लाख रुपये किमतीचा अशोक लेलँड टेम्पो व ३ लाख रुपये किमतीचे सुमारे ३००० किलो वजनाचे जिवंत मांगूर मासे असा एकूण १८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

### मानवी आरोग्यास धोकादायक

मत्स्य व्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांनी केंद्र शासनाच्या आदेशानुसार मांगूर प्रजातीचे मासे भारतीय मत्स्य संपत्ती, पर्यावरण आणि मानवी आरोग्यास धोकादायक असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे पोलिस प्रशासन, मत्स्य व्यवसाय विभाग व पंचांच्या उपस्थितीत नागोबाचीवाडी ग्रामपंचायत हद्दीत जेसीबीच्या सहाय्याने खड्डा खोदून सदर मासे ब्लिचिंग पावडर व जाड मीठ टाकून नष्ट करण्यात आले. याप्रकरणी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २२३, २७५, ३(५) तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ आणि अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ चे कलम ५९ अन्वये रात्री ८ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सोलापुरातही ‘गॅस’ टंचाईच्या झळा, ‘आपत्कालीन रॉकेल प्लॅन’ ॲक्शन मोडमध्ये

## ४ तालुक्यांना २४ हजार लिटर लिटरचे २ टँकर रवाना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या गॅस टंचाईवर उपाय म्हणून, सोलापूर जिल्ह्यात रेशन दुकानांमार्फत केरोसीन (रॉकेल) वाटप सुरू करण्यात आले आहे. सोलापूरसाठी १ लाख ४४ हजार लिटर केरोसीन मंजूर झाले असून, त्याचे वाटपही ४ तालुक्यात सुरू झाले आहे. या तालुक्यांसाठी २ टँकरद्वारे २४ हजार लिटर पाठविण्यात आले असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिली.

जिल्ह्यातील बार्शी, मोहोळ, सांगोला आणि मंगळवेढा तालुक्यांना रॉकेल जरी पाठविले असले तरी पात्र लाभार्थ्यांपैकी केवळ १० टक्के कुटुंबांकडेच स्टोव्ह असल्याने याच्या वापरावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सध्या प्रतीकार्ड ३ लिटर रॉकेल वाटप करण्यात येणार आहे. इतर ७ तालुक्यांतील राशन दुकानदारांकडेही आता लवकरच रॉकेलचा कोटा पाठविण्यात येणार आहे.

सोलापूर जिल्ह्यासाठी १ लाख ४४ हजार लिटर केरोसीन मंजूर करण्यात आले आहे. यातील १ लाख ३२ हजार लिटर कोटा ग्रामीण भागासाठी, तर १२ हजार लिटरचा कोटा सोलापूर शहरासाठी निश्चित करण्यात आला आहे.

पहिल्या टप्प्यात १२ हजार लिटरचा टँकर जिल्ह्यात दाखल झाला असून, चार तालुक्यातील विविध भागांत वितरणाला सुरुवात झाली आहे. अंत्योदय आणि प्राधान्यक्रमातील कुटुंबांना याचा पहिला लाभ दिला जात आहे. रेशन कार्डवर ३ लिटरप्रमाणे जवळपास ३ लाख कुटुंबांना रॉकेल देण्याची तरतूद आहे. परंतु, धक्कादायक बाब म्हणजे यातील फक्त कमी कुटुंबाकडेच केरोसीनचे स्टोव्ह उपलब्ध आहेत. त्यामुळे उर्वरित कुटुंबांना रॉकेलचा वापर कसा करायचा, हा प्रश्न पडला आहे. गॅस टंचाईमुळे प्रशासनाने सिलिंडर बुकिंगसाठी शहरात २५ दिवस आणि ग्रामीण भागात ४५ दिवसांची मर्यादा घातली आहे.

आखाती देशांतील युद्धस्थितीमुळे गॅस टंचाईचे सावट देशावर आले आहे. गॅस टंचाईचे सावट कमी-अधिक प्रमाणात असले तरी भविष्यातील उपाययोजना म्हणून शासनाने केरोसीन वाटपाचा निर्णय घेतला आहे. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेमुळे २०१६ पासून केरोसीन पुरवठा बंद करण्यात आला होता.

### १० वर्षानंतर केरोसीन आले जिल्ह्यात

गॅस आल्याने केरोसीन हा विषय मागे पडला होता; मात्र आता पुन्हा १० वर्षानंतर गॅसची टंचाई जाणवू लागल्याने केरोसीनचा विषय शासनाने पुन्हा अजेंड्यावर घेतला आहे. गेल्या १० वर्षांत केरोसीनच्या किमतीमध्ये जवळपास २२ ते २३ रुपयांनी वाढ झाली आहे. आता केरोसीन ६२ रूपये दराने (वाहतूक खर्चामुळे या दरात थोडाफार फरक होऊ शकतो) मिळणार आहे.

### घरातील स्टोव्ह गेले भंगारात

नव्याने विविध कंपन्यांचे गॅस आल्यानंतर काही दिवस त्याचीही टंचाई जाणवली. मात्र एलपीजी गॅस कधीही मिळत असल्याने अनेक महिलांनी काही वर्षे अडगळीत टाकलेले स्टोव्ह भंगारात घालून टाकले आहेत. आता पुन्हा गॅस टंचाईचे दिवस आल्याने अनेक कुटुंबांना स्टोव्हची पंचायत आली असून, त्यांना बाजारात स्टोव्ह आल्यानंतरच मिळणार आहे. इतकेच नाहीतर आता या स्टोव्हबरोबर त्याची पीनही त्यांना खरेदी करावी लागणार असून, स्टोव्हच्या धुराशीही सामना करायची वेळ महिलावर्गावर येणार आहे.



# भाजपा कार्यकर्त्यांच्या सन्मानाला सर्वोच्च प्राधान्य : पालकमंत्री



## पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे -**

भारतीय जनता पार्टीच्या तीन पिढ्यांमधील देवदुर्लभ कार्यकर्त्यांमुळे भाजपाला सुवर्णकाळ पाहता येत आहे. त्यामुळे भाजपा कार्यकर्त्यांच्या सन्मानाला नेहमीच सर्वोच्च प्राधान्य असेल, असे प्रतिपादन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

भारतीय जनता पार्टीच्या पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान अंतर्गत दोन दिवसांच्या कार्यकर्ता प्रशिक्षण निवासी शिबिराचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते शनिवारी दीपप्रज्वलन करून उद्घाटन झाले. चिंचोली औद्योगिक वसाहतीमधील प्रभाकर रिसॉर्ट येथे हे शिबिर सुरू आहे. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी व्यासपीठावर भाजपाचे सोलापूर प्रभारी आमदार योगेश टिळेकर, आमदार देवेंद्र कोठे, माजी खासदार अमर साबळे, योगेश बाचल, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सोलापूर महानगरपालिकेचे सभागृह नेते नरेंद्र काळे उपस्थित होते.

पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, संघटनेपेक्षा दुसरे काहीही महत्त्वाचे नाही. पक्षाला चांगले दिवस आलेले आहेत. त्यामुळे पक्षाच्या कार्यकर्त्यांना सन्मान आणि न्याय मिळाला पाहिजे, यासाठी आम्ही कार्यरत राहणार आहोत. कार्यकर्त्यांनी केलेल्या संघर्ष वाया जाऊ देणार नाही, असेही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी याप्रसंगी सांगितले. भाजपच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर म्हणाल्या, भाजपा हा कार्यकर्त्यांचा पक्ष असून पक्षात कार्यकर्त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कार्यकर्ता केंद्रबिंदू मानून काम करणाऱ्या भारतीय जनता पार्टीचा १९८० ते २०२६ हा प्रवास प्रेरणादायी असल्याचेही शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी याप्रसंगी सांगितले.

या निवासी प्रशिक्षण शिबिरात दिवसभर माजी खासदार अमर साबळे यांनी देशापुढील राजकीय व सामाजिक आव्हाने, आमदार योगेश टिळेकर यांनी कार्यविस्तार, प्रा. मोहिनी पत्की यांनी कार्यकर्ता विकास व अपेक्षा, योगेश बाचल यांनी मन की बात व कार्यपद्धती तर ॲड. अनिकेत निकम यांनी सोशल मीडिया या विषयावर मार्गदर्शन केले.



सरचिटणीस सुधा अल्लीमोरे, आणि डॉ. शिवराज सरतापे यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी भाजपाचे शहर पदाधिकारी मोर्चा अध्यक्ष सरचिटणीस, प्रकोष्ठ संयोजक मंडळ अध्यक्ष व सरचिटणीस यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. रविवारी दिवसभर विविध सत्र होणार असून, रविवारी सायंकाळी या निवासी शिबिराचा समारोप होणार आहे.

# ‘आरोग्य ते अध्यात्म’ हा संदेश देणारी अक्कलकोट भक्ती रन स्पर्धा २६ जुलैला

## ऑनलाईन रजिस्ट्रेशन लिंकचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या हस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे -**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट अक्कलकोट आणि चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या भव्य ‘‘अक्कलकोट दहा किलोमीटर भक्ती रन’’ या आगळ्यावेगळ्या मॅरेथॉन स्पर्धेच्या ऑनलाईन रजिस्ट्रेशन लिंकचे उद्घाटन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या हस्ते करण्यात आले.

या उद्घाटनप्रसंगी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्टचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशनचे अध्यक्ष अतिश शहा, तसेच मनोज निकम, प्रवीणजी देशमुख, अभिषेक लोकापुरे, सिद्धेश्वर मोरे, किरण पाटील, निखिल पाटील, वैभव मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.



‘‘आरोग्य ते अध्यात्म‘‘ हा प्रेरणादायी संदेश देणारी ही भक्ती रन स्पर्धा येत्या २६ जुलै २०२६ (रविवार) रोजी अक्कलकोटच्या पावन भूमीत रंगणार आहे. शारीरिक तंदुरुस्ती, अध्यात्मिक उन्नती आणि भक्तीमय वातावरणाचा एक सुंदर आणि अभूतपूर्व संगम या उपक्रमाच्या माध्यमातून धावपटूंना अनुभवायला मिळणार आहे.

ही स्पर्धा ३ , ५ आणि १० किलोमीटर अशा तीन वेगवेगळ्या अंतरांच्या गटात आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व धावपटूंना आकर्षक टी-शर्ट, बिब , फिनिशर मेडल, ई-प्रमाणपत्र, पौष्टिक नाश्ता, हायड्रेशन आणि तात्काळ मेडिकल सपोर्ट मिळणार आहे. भक्ती, फिटनेस आणि पारंपरिक संस्कृतीचा संगम घडवणारा हा उपक्रम राज्यभरातील धावपटू, क्रीडाप्रेमी आणि स्वामी भक्तांसाठी एक विशेष पर्वणी ठरणार आहे. राज्यभरातील धावपटूंना या भव्य स्पर्धेत सहभागी होण्यासाठी https://share.google/O3J3U2IOvaaG9AO2k या लिंक वर नावनोंदणी करता येईल. अधिक माहितीसाठी अतिश शहा ( मो.९१७५८ २८२०३ ) यांच्याशी संपर्क साधावा.







# ‘सुजन अभियान’वरुन ‘काँग्रेस’मध्ये प्रचंड खदखद

- ‘सपकाळ हटाव-काँग्रेस बचाव’ची हाक
- सोलापुरातील काँग्रेसजनांनी घेतला पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

अखिल भारतीय राष्ट्रीय (इंदिरा) काँग्रेस पक्षाच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या सुजन अभियानवरुन ‘काँग्रेस’मध्ये प्रचंड खदखद असल्याचे दिसून येते. ‘प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हटाव-काँग्रेस बचाव’ची हाक देण्यात आली. यासाठी सोलापुरातील काँग्रेसजनांनी पुढाकार घेतला असून काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष विजयकुमार हत्तुरे यांच्या नेतृत्वाखाली काहींनी पत्रपरिषदेत ‘बंडाचा झेंडा’ रोवला.

सुजन अभियानातून नव्या नेतृत्वाला संधी मिळेल, अशी अपेक्षा होती. परंतु जुन्याच चेहऱ्यांना पुन्हा संधी देण्यात आली. या अभियानाच्या नियोजनात गोंधळ, निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलणे आणि पदाधिकाऱ्यांमधील समन्वयाचा अभाव आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली चुकीच्या पध्दतीने सुरु असलेल्या कारभाराच्या निषेधार्थ विजयकुमार हत्तुरे यांच्यासह अशोक चोपडे, राजकुमार पवार, सुरेश हावळे, राहुल कौलगे-पाटील, संजय चौगुले या पदाधिकाऱ्यांनी या पत्रपरिषदेत ‘राजीनामास्त्र’ उगारले आहे.




कार्यक्रमाची माहिती वेळेवर न देणे, स्थानिक कार्यकर्त्यांना विश्वासात न घेणे, निवडीतील कथित पक्षपात याविरोधात राज्यभर आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. मागील निवडणुकीत पक्षाने उमेदवार दिले नाही. कुणाला मतदान करायचे अशी विचारणा केली असता प्रदेशाध्यक्षांनी नोटाला मतदान करा असे स्पष्ट सांगितले, असा आरोपही या पत्रपरिषदेत करण्यात आला.

सोलापूर जिल्ह्यात पदाधिकारी नेमताना गडबड करण्यात आली आहे. बारामतीच्या व्यक्तीला जिल्हाध्यक्ष का केला? नवे जिल्हाध्यक्ष संदीप साठे हे कोणत्याही आंदोलनात नव्हते. निवडीनंतरही ते कुठे दिसले नाहीत यावरुन पक्षाने काय सिध्द केले? निष्ठावंतांना डावलले जात आहे. नवे नेमलेले तालुकाध्यक्ष कुणीही पक्षात सक्रिय नव्हते. त्यांनी आंदोलन कधी केले नाही, असे सांगायलाही विजयकुमार हत्तुरे, अशोक चोपडे, राजकुमार पवार, सुरेश हावळे, राहुल कौलगे-पाटील, संजय चौगुले यावेळी विसरले नव्हते.

### दिल्ली दरबारी पाठपुरावा

सुजन अभियान व पदाधिकारी निवडीत काही गडबड झाली असल्यास दिल्ली दरबारी पाठपुरावा करेन, असे सोलापूर जिल्ह्याचे निरीक्षक देवाशिष पटनायक यांनी आम्हाला सांगितले. महाराष्ट्रात काँग्रेस वाचवायची असेल, तर सपकाळ यांना पदावरुन हटवावे, अशी मागणी राष्ट्रीय नेते खा.राहुल गांधी व राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडे करण्यात येणार आहे, असेही सांगण्यात आले.

### आम्ही निष्ठावंत कॉक्रोच

बाहेरचे नेतेमंडळी काँग्रेसचे पदाधिकारी ठरवत आहेत. आपल्या पक्षाऐवजी इतर पक्षाचे काम करणाऱ्यांची संख्या काँग्रेसमध्ये वाढली आहे. आमच्याच पक्षातील लोकांशी आम्हाला लढावं लागत आहे. आम्हाला जबाबदारी द्या अशी विनवणी प्रदेशाध्यक्षांकडे केली असतानाही याकडे साफ दुर्लक्ष करण्यात येत आहे. आम्ही निष्ठावंत कॉक्रोच आहोत. जोपर्यंत निष्ठावंतांना न्याय मिळत नाही तोपर्यंत काँग्रेसचे कोणतेही पद स्वीकारणार नाही. केवळ काँग्रेस पक्षाचा एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून काम पाहणार आहोत, असे एका प्रश्नाला उत्तर देताना सांगण्यात आले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा



## महत्वाचे...

### आचारसंहितेमुळे जिल्हा लोकशाही दिन रद्द

**सोलापूर दि. २३ मे-**
महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक दिनांक २६ सप्टेंबर, २०१२ नुसार तालुका, जिल्हा/महानगरपालिका, विभागीय व मंत्रालय स्तरांवरील लोकशाही दिन अंमलबजावणीबाबत एकत्रित आदेश दिलेले आहेत. उक्त परिपत्रकानुसार ज्या क्षेत्रांमध्ये निवडणुकीकरीता आचारसंहिता लागू असते, त्या स्तरावरील लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येऊ नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात दरमहा पहिल्या सोमवारी जिल्हा लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. मात्र राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र दि. १८.०५.२०२६ नुसार महाराष्ट्र विधान परिषदेच्या सोलापूर मतदारसंघाच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी आचारसंहिता दि. १८ मे पासून लागू करण्यात आली आहे. त्यामुळे दि. १ जून रोजी होणारा जिल्हा लोकशाही दिन आयोजित केला जाणार नाही, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिली आहे.

### प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी २६ मे रोजी कार्यशाळा

**सोलापूर, दि. २३ मे-**
महाडीबीटी पोर्टलवर सन २०१९-२० ते २०२५-२६ या कालावधीतील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज निकाली काढण्यासाठी सोमवार दि.२६ मे रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे आयोजित करण्यात आली असल्याची माहिती समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी दिली. कार्यशाळेस संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य तसेच शिष्यवृत्तीचे कामकाज पाहणारे कर्मचारी यांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे प्रलंबित अर्ज तातडीने निकाली काढावेत, असे आवाहनही करण्यात आले आहे. प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्यासाठी ही कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरणार असून संबंधितांनी वेळेत उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण सोलापूर यांनी कळविले आहे.

### लोकमंगल परिवारातर्फे २७ मे पासून निवासी बालसंस्कार शिबीर

**सोलापूर, दि. २३ मे-**
आमदार सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली लोकमंगल फाउंडेशन व सोलापूर सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने निवासी बालसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आजचे संस्कारयुक्त बालक हे उद्याचे आदर्श नागरिक या संकल्पनेवर आधारित हे शिबीर २७ मे ते २९ मे या कालावधीत लोकमंगल कॉलेज, वडाळा, ता. उत्तर सोलापूर येथे पार पडणार आहे. या शिबिरात विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, वारकरी प्रशिक्षण, टाळ वादन प्रशिक्षण, पंचपदी प्रशिक्षण, हरिपाठ, कीर्तन मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास, संस्कारक्षम कथा, मोबाईलचे दुष्परिणाम, उत्तम आरोग्यासाठी आहार, सामूहिक खेळ, कला गुणदर्शन, प्रश्नमंजुषा तसेच सहविचार गप्पा अशा विविध विषयांचा समावेश आहे. शिबिरासाठी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी विराट माशाळे (समन्वयक - ८८५७८३०७१७) यांच्याशी संपर्क साधावा.

# विधानपरिषद रणधुमाळीत 'महिला पॉवर' निर्णायक

## सोलापूर स्थानिक प्राधिकरण मतदारसंघात महिलांची सरशी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे -**
महाराष्ट्र विधानपरिषद सोलापूर स्थानिक प्राधिकरण मतदारसंघाच्या २०२६ च्या निवडणुकीसाठी जाहीर झालेल्या अंतिम मतदार यादीत महिलांचे वर्चस्व स्पष्टपणे समोर आले आहे. एकूण ६१६ मतदारांपैकी तब्बल ३११ महिला तर ३०५ पुरुष मतदार असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला नेतृत्वाची वाढती ताकद अधोरेखित झाली आहे. विशेष म्हणजे, पुरुषांच्या तुलनेत महिला मतदारांची संख्या सहाने अधिक असल्याने आगामी निवडणुकीत 'महिला फॅक्टर' निर्णायक ठरण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

या मतदारसंघात महापालिका, नगरपालिका, नगरपंचायती आणि जिल्हा परिषदांमधील लोकप्रतिनिधींना मतदानाचा अधिकार असतो. त्यामुळे स्थानिक राजकारणातील समीकरणे ठरवण्यात या मतदार यादीला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. अंतिम आकडेवारीनंतर विविध राजकीय पक्षांनी महिला सदस्यांवर लक्ष केंद्रित करण्यास सुरुवात केली आहे.

सोलापूर महापालिकेमध्ये सर्वाधिक १११ मतदारांची नोंद झाली असून त्यात ५८ पुरुष आणि ५३ महिला सदस्यांचा समावेश आहे. जिल्हा परिषदेमध्ये मात्र महिलांची स्पष्ट आघाडी दिसून आली. येथे ७९ मतदारांपैकी ४४ महिला तर ३५ पुरुष सदस्य आहेत.महापालिकेनंतर बार्शी नगरपरिषदेत सर्वाधिक ४७ मतदार आहेत. पंढरपूर नगरपरिषदेत ४१ मतदारांची नोंद झाली असून अकलूजमध्ये ३० तर अक्कलकोटमध्ये २९ मतदार आहेत.

### अंतिम मतदार यादीने बदलले राजकीय गणित

अंतिम मतदार यादीने राजकीय गणित बदलल्याचे दिसून येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचे वाढते प्रतिनिधित्व ही केवळ आकडेवारी नसून बदलत्या राजकीय-सामाजिक वास्तवाची नांदी मानली जात आहे. आगामी विधानपरिषद निवडणुकीत उमेदवारांची रणनीती, प्रचाराची दिशा आणि राजकीय संपर्क मोहीम यामध्ये महिला सदस्य केंद्रस्थानी राहणार असल्याचे स्पष्ट संकेत या अंतिम यादीतून मिळत आहेत.



सांगोला नगरपरिषदेत महिला आणि पुरुष सदस्यांची संख्या समान असून प्रत्येकी १३ सदस्य आहेत. करमाळा, कुर्डुवाडी, मैंदर्गी, दुधनी, मोहोळ आणि मंगळवेढा नगरपरिषदांमध्ये प्रत्येकी २३ मतदार आहेत. माढा, वैराग, माळशिरस, नातेपुते आणि म्हाळुंग श्रीपूर नगरपंचायतींमध्ये प्रत्येकी १९ मतदारांची नोंद झाली आहे. अनगर नगरपंचायतीत २० मतदार आहेत.

# सुवासिनी मातेची पूजा केल्यास सुख, समृध्दी प्राप्त : रम्यानंद भारती महास्वामिनी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मे-**



सुवासिनी मातेमध्ये आपल्याला महालक्ष्मीचे दर्शन होते. तिची पूजा केल्याने कुटुंबाला सुख, सुदैव, आरोग्य, समृद्धी आणि लक्ष्मीचा आशीर्वाद मिळतो, असे आंध्र प्रदेशातील श्री शक्ती पिठाधीश्वरी श्री श्री श्री रम्यानंद भारती महास्वामिनी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील महालक्ष्मी बॅंक्वेट हॉल येथे होत असलेल्या ऐश्वर्य लक्ष्मी सुवर्ण कुबेर महोत्सवच्या अनुषंगाने त्या सोलापुरात आल्या आहेत.

समाजात जाऊन धर्म, संस्कृती, भक्ती आणि शाश्वत मूल्यांचा प्रसार करणे हे मुख्य धर्मगुरूंचे कर्तव्य आहे. याच कर्तव्याच्या भावनेतून मी हा धार्मिक प्रचार दौरा हाती घेतला आहे. आमचे पूजनीय गुरुदेव श्री श्री सिद्धेश्वरानंद भारती महास्वामी यांच्या दिव्य संकल्पाने, समाजात धर्म, भक्ती, संस्कृती, सेवा आणि सकारात्मक आध्यात्मिक ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

ऐश्वर्य लक्ष्मी कुबेर महोत्सवाचा उद्देश केवळ धन आणि समृद्धी प्राप्त करणे हा नाही. धर्माच्या मार्गाने लक्ष्मीचा आशीर्वाद प्राप्त व्हावा, कुटुंबांमध्ये शांती नांदावी, समाजात सेवेची भावना वाढावी आणि प्रत्येक घर आनंद, आरोग्य, सुदैव व समृद्धीने भरून जावे. आमच्या शाश्वत परंपरेत स्त्रियांना देवी मानले जाते. आमचा 'नारी आणि नारायणी'वर विश्वास आहे. आजची सौभाग्य लक्ष्मी सुवासिनी पूजा याच दिव्य भावनेचे प्रत्यक्ष प्रतीक आहे.

श्री शक्ती पीठाचा मूळ संकल्प स्त्रिया आणि नारायणी हा आहे. आज स्त्रिया भीती आणि कमी झालेल्या प्रतिष्ठेखाली जगत आहेत. ही केवळ एक सामाजिक समस्या नाही, तर एक आध्यात्मिक संकट आहे. जेव्हा स्त्रिया आदर गमावतात, तेव्हा भारत माता तिचे तेज गमावते आणि निसर्गाचा समतोल बिघडतो. म्हणूनच आदिशक्तीने आम्हाला घरोघरी जाऊन प्रत्येक स्त्रीला ती स्वतः एक देवी आहे याची आठवण करून देण्याची आज्ञा दिली.

श्री शक्ती पीठाने 'नारी नमोस्तुते' अभियानांतर्गत आतापर्यंत अंदाजे ६०,००० महिलांची पूजा केली आहे. हा केवळ एक पूजा कार्यक्रम नाही, तर स्त्रियांमध्ये देवीचे दर्शन घेणे हा आपल्या भारतीय संस्कृतीचा एक अमूल्य संदेश आहे, याची समाजाला आठवण करून देणारी ही एक मोहीम आहे. याद्वारे महिलांचा सन्मान, भारतीय संस्कृती आणि शाश्वत शक्तीची उपासना प्रस्थापित करण्याचा एक संकल्प पूर्ण केला, असेही त्यांनी सांगितले.

# जिल्ह्यातील १ लाख ८० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना मिळणार पहिल्याच दिवशी गणवेश

- गणवेश खरेदीसाठी ४.३३ कोटींचा निधी
- दुसऱ्या गणवेशासाठी करावी लागणार प्रतीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मे-**



नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना दिलासा देणारा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. समग्र शिक्षा अभियानांतर्गत इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी मोफत गणवेश देण्याचे नियोजन करण्यात आले. त्यासाठी शासनाकडून सोलापूर जिल्ह्यास ४ कोटी ३३ लाख २६ हजार ४८० रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे.

या निधीतून जिल्ह्यातील तब्बल १ लाख ८० हजार ५२७ विद्यार्थ्यांना गणवेशाचा लाभ मिळणार आहे. शिक्षण विभागाने तालुकास्तरावर निधी वितरणाची प्रक्रिया सुरु केली असून, १५ जूनपासून सुरू होणाऱ्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या हाती पहिल्याच दिवशी नवीन गणवेश देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याला दरवर्षी दोन मोफत गणवेशांसाठी एकूण ६०० अनुदान मंजूर असते. मात्र, यंदा शासनाकडून मंजूर तरतुदीच्या ८० टक्के निधीच उपलब्ध झाल्याने सध्या एका गणवेशासाठीच २४० प्रमाणे अनुदान वितरित करण्यात आले आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यात विद्यार्थ्यांना एकच गणवेश मिळणार असून, दुसऱ्या गणवेशासाठी काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे.

### गणवेश वितरणाची प्रक्रिया वेळेत

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही शाळा सुरु होताच गणवेश मिळावा, यासाठी गटशिक्षणाधिकाऱ्यांना विशेष निर्देश देण्यात आले आहेत. गणवेश वितरणाची प्रक्रिया वेळेत पूर्ण करून विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी गणवेश उपलब्ध करुन देण्याचे नियोजन करण्यात आले आहे, असे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.

# प्राथमिक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन चुकीच्या पध्दतीने करण्याचा प्रयत्न

## शिक्षक महासंघ तीव्र आंदोलन करणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**
सोलापूर जिल्ह्यातील अनुदानित खासगी प्राथमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन शिक्षण संचालक यांच्या आदेशाचे विचार न करता चुकीच्या पध्दतीने करण्याचा प्रयत्न केला गेल्यास शिक्षक महासंघ तीव्र महासंघाच्या वतीने आंदोलन करण्यात येणार आहे, असे महासंघाचे जिल्हाध्यक्ष कल्लप्पा फुलारी यांनी सांगितले. यावेळी राजश्री तडकासे, राजूदास पवार, भिमराया कापसे, किरण गाटे, प्रशांत शिंगे, चेतन बडगंची, गेनसिद्ध कुंभारीकर व नौशाद शेख उपस्थित होते.

प्राथमिक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजनाबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालक प्राथमिकचे शरद गोसावी यांनी १७ एप्रिल २०२६ ला स्पष्ट आदेश दिलेले आहेत. त्या आदेशासह याबाबतीतले इतर आदेशावर उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली आहे. याबाबत प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख व माध्यमिक उपशिक्षणाधिकारी वाघमारे यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली असून त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिले.

सोलापूर जिल्हयात माध्यमिक शिक्षण विभागानी संचालकांचा आदेश, न्यायालयातील याचिका आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्या शिफारसी न घेता अतिरिक्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची चुकीची यादी प्रसिध्द केली आहे. पुढील आठवड्यात वालचंद कॉलेज येथे आचारसंहिता कालावधीत समुपदेशन पध्दतीने समायोजनासाठी उपस्थित राहण्याचे पत्र पारित करण्यात आले आहे, असेही त्यांनी सांगितले.

# मेघगर्जना अन् वादळासह अवकाळी पावसाची हजेरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**
सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या काही भागात शनिवारी सायंकाळी ६:३० वाजेच्या सुमारास मेघगर्जनेसह वादळी वारे आणि अवकाळी पावसाने हजेरी लावली. यामुळे रस्त्याच्या सखोल भागात पाणी साचून नोकरदार वर्ग आणि वाहनधारकांचे हाल झाले.

सोलापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, नवी पेठ, पार्क चौक, सातरस्ता, रंगभुवन, आसरा चौक, कुमठा नाका, गुरूनानक नगर, विमानतळ परिसर, अक्कलकोट रोड आदी ठिकाणी पावसाच्या जोरदार सरी पडल्या. दिवसभर कडक ऊन होते; इतकेच नाहीतर ४० अंशाच्यावर आजचे तापमानही नोंदले गेले होते. मात्र सायंकाळी ६: ३० वाजेच्या नंतर अचानक काळेकुट्ट ढग जमा झाले आणि विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावल्याने यंदाही लवकरच पाऊस पडण्याचे संकेत मिळत आहेत.



### ऊन-पावसाचा खेळ...

**सोलापूर शहरात शनिवारी दिवसभर कडक ऊन आणि सायंकाळच्या सुमारास पाऊस असे जणू ऊन-पावसाचा खेळ सुरु होता. यामुळे सोलापुरकरांची चांगलीच तारांबळ उडाली होती. (छाया- केवल तिवारी)**

गतवर्षी मे महिन्यातच सरासरी १०२ मिलीमीटर पाऊस जिल्ह्यात कोसळला होता. यामुळे चोहीकडे पाणीच पाणी झाले आणि केवळ जमिनीच्या वापस्याअभावी शेतकऱ्यांना गतवर्षी खरिपाच्या पेरण्या गतवर्षी वेळेत करता आल्या नव्हत्या.

आताही अवकाळी पाऊस जोरात कोसळला तर गतवर्षी सारखाच पेरणीस विलंब होतो की काय? असा प्रश्न शेतकरी बांधवांना सध्यातरी पडला आहे.

दरवर्षी रोहिण्या, मृगाचा पाऊस पडल्यावरच शेतकरीदादा तिफणीवर मुठ ठेवतो मात्र गतवर्षी जोरात पाऊस पडल्याने शेतकऱ्यांचे पेरणीचे समीकरण बदलले होते. रब्बी हंगामातही असाच पाऊस पडत गेल्याने गतवर्षी दोन्ही हंगामातील पिकांची वाट लागली होती. इतकेच नाहीतर रब्बी हंगामातही जमिनीचा वापसा होण्यास विलंब लागल्याने ज्वारी पेरणीस विलंब लागला आणि मार्च-एप्रिलपर्यंत ज्वारीच्या काडण्या सुरूच असल्याचे दिसून आले. गतवर्षी हवामान विभागाचा अंदाजही कोलमडल्याने यंदाच्या खरिपाच्या हंगामात काय घडेल? हे येणारा काळच सांगणार आहे.

# 'नो व्हेईकल डे' चा गाजावाजा; पण इंधन खर्चात दुप्पट वाढ!

## जिल्हा परिषदेत पर्यावरणविषयक घोषणा, वाहनभत्त्यांना हिरवा कंदील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**
एका बाजूला इंधन बचत, पर्यावरण संरक्षण आणि 'नो व्हेईकल डे'सारख्या उपक्रमांचा गाजावाजा सुरु असताना, दुसऱ्या बाजूला सोलापूर जिल्हा परिषदेत पदाधिकाऱ्यांच्या वाहनासाठी लागणारा इंधन आणि प्रवास भत्त्यांसाठी मोठी आर्थिक तरतूद करण्यात आल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. सन २०२६-२७ च्या मूळ अंदाजपत्रकात अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समिती सभापती यांच्या शासकीय वाहनांसाठी तब्बल २६ लाख रुपये इंधन खर्चासाठी तर प्रवास भत्त्यासाठी तब्बल ४.७० लाख रुपये राखून ठेवण्यात आले आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत ही वाढ लक्षणीय मानली जात आहे. सन २०२५-२६ मध्ये प्रवास भत्त्यासाठी ३ लाख आणि इंधनासाठी १२ लाखांची तरतूद होती.



निवडणुकीमुळे केवळ सहा महिन्यांच्या कालावधीसाठी सुधारित अंदाजपत्रकात कमी निधी ठेवण्यात आला होता. मात्र आता नव्या आर्थिक वर्षात इंधन दरवाढीचा दाखला देत प्रशासनाने जवळपास दुप्पट तरतूद केल्याचे समोर आले आहे.

जिल्हा परिषद प्रशासनाने पर्यावरणपूरक धोरणाचा मुद्दाही पुढे केला आहे. पंतप्रधानांच्या आवाहनानंतर राज्यात सर्वप्रथम सोलापूर जिल्हा परिषदेकडून 'नो व्हेईकल डे' उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयाची राज्यभर चर्चा झाली होती. मात्र प्रत्यक्षात वाहनांच्या वाढत्या खर्चामुळे घोषणा वेगळ्या आणि वास्तव वेगळे अशी टीका विरोधकांकडून केली जात आहे. सध्या जिल्हा परिषदेकडे असलेल्या वाहनांपैकी बहुतांश गाड्या पेट्रोल आणि डिझेलवर चालणाऱ्या आहेत. इलेक्ट्रिक वाहनांचे प्रमाण केवळ १५ टक्के इतके आहे. आगामी काळात नवीन वाहने खरेदी करताना इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य देण्यात येणार आहे, असे जिल्हा परिषद प्रशासनाकडून सांगण्यात आले. राजकीय पातळीवर पाहिले तर ग्रामीण भागात पाणी, रस्ते आणि आरोग्याच्या मूलभूत प्रश्नांवर निधीअभावी मर्यादा येत असताना पदाधिकाऱ्यांच्या वाहन सुविधांवरील वाढता खर्च चर्चेचा विषय ठरत आहे. आता पर्यावरण बचतीच्या घोषणांबरोबरच प्रत्यक्षात इंधन खर्च कितपत कमी होतो आणि इलेक्ट्रिक वाहनांकडे प्रशासन कितपत गंभीरपणे वळते, याकडे जिल्ह्यातील जनतेचे लक्ष लागले आहे.

### प्रवास अपरिहार्य; स्वतंत्र आर्थिक तरतूद

जिल्हाभर दौरे, बैठका आणि विविध विकासकामांच्या पाहणीसाठी वाहनांचा वापर अपरिहार्य आहे. अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सभापती यांच्या वाहनांच्या दुरुस्तीसाठीही स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. प्रत्येक वाहनासाठी वर्षाला ५ लाख रुपयांपर्यंत दुरुस्ती खर्चाची मर्यादा निश्चित करण्यात आली असून नियमित सर्व्हिसिंग, सुटे भाग बदलणे आणि तांत्रिक देखभाल यासाठी निधी खर्च केला जाणार आहे.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



महत्वाचे...



## पानगाव येथील शिवकालीन जलाशयाच्या नूतनीकरणासाठी शासकीय मदतीची मागणी

**बार्शी, दि. २३ मे-**

तालुक्यातील पानगाव येथील ऐतिहासिक शिवकालीन जलाशयाच्या जीर्णोद्धारासाठी स्थानिक प्रतिनिधींनी जिल्हा प्रशासनाकडे पाठपुरावा केला. उपजिल्हाधिकारी अंजली मरोड यांच्या उपस्थितीत ॲड. प्रशांत शेटे आणि अंकुश वाघमारे यांनी कलेक्टर कार्यालय येथे बैठक घेतली. यावेळी त्यांनी जलाशयाच्या दुरुस्ती व नूतनीकरणासाठी शासकीय निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केली. हा जलाशय शिवकालीन काळातील असल्याने त्याचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता, स्थानिक शेती, पिण्याचे पाणी आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने त्याचे पुनरुज्जीवन आवश्यक असल्याचे प्रतिनिधींनी सांगितले. सध्या जलाशयाची स्थिती जीर्ण झाल्याने पाणी साठवण क्षमता घटली असून, गाळ साचल्याने समस्या निर्माण होत आहे. उपजिल्हाधिकारी अंजली मरोड यांनी मागणीचे गांभीर्य लक्षात घेत प्रस्तावाची तपासणी करुन संबंधित विभागांना निर्देश देण्याचे आश्वासन दिले. या बैठकीत जलसंपदा विभाग, स्थानिक ग्रामपंचायत आणि इतर संबंधित यंत्रणांच्या समन्वयाने लवकरात लवकर कार्यवाही करण्यावर चर्चा झाली. पानगाव परिसरातील शेतकरी आणि नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले असून, शासनाकडून सकारात्मक प्रतिसादाची अपेक्षा व्यक्त केली आहे.



## मायकल हाऊस यांच्या स्मरणार्थ गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**सोलापूर, दि. २३ मे-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील सरस्वती विद्यालयात अमेरिका न्यू जर्सी येथील प्रसिद्ध लेखिका के.टी. मायकल हाऊस यांच्या स्मरणार्थ होनसळ येथील सामाजिक कार्यकर्ते नेताजी पवार यांनी आपल्या स्व:खर्चातून सरस्वती विद्यालयातील गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप प्रशालेचे प्राचार्य सुहास वडणे, पर्यवेक्षक महादेव मसुते, सचिन शिंदे, माजी विद्यार्थीनी रेवती पवार, कार्तिक पवार यांच्या हस्ते करण्यात आले. नेताजी पवार हे सरस्वती विद्यालयाचे माजी विद्यार्थी असून, गतवर्षी सुद्धा अमेरिकेन लेखिकेच्या स्मरणार्थ अनेक होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप त्यांनी केले होते. या त्यांच्या उपक्रमामुळे संस्थेचे अध्यक्ष बसवणप्पा मसुते, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, सचिव यशवंत लोंढे, ज्येष्ठ संचालक मल्लिकार्जुन मसुते, अब्बास पटेल, बाळासाहेब जगताप, प्राचार्य सुहास वडणे, पर्यवेक्षक महादेव मसुते, शंभु गायकवाड बापुसाहेब खेडकर व उद्योगपती प्रल्हाद काशीदसाहेब यांनी कौतुक केले. यावेळी मान्यवरांनी अमेरिकेन सामाजिक संस्थेचे आभार मानले. तसेच माजी विद्यार्थिनी रेवती पवार हिने आपले मनोगत व्यक्त करताना सरस्वती विद्यालयाचे आभार व्यक्त केले.




## संध्या धर्माधिकारी यांचा 'बेरं' कथासंग्रह उत्कृष्ट कथासंग्रह पुरस्काराने सन्मानित

**सोलापूर, दि. २३ मे-**

शनिवार दिनांक २३ मे २०२६ रोजी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा दामाजीनगर मंगळवेढे यांचा साहित्य पुरस्कार सोहळा संपन्न झाला. यावेळी सोलापूर येथील ग्रामीण कथा लेखिका संध्या धर्माधिकारी यांच्या 'बेरं' या कथासंग्रहाला उत्कृष्ट कथासंग्रह अत्यंत प्रतिष्ठेचा समजला जाणारा हा पुरस्कार प्रदान करुन गौरविण्यात आले. साहित्य पुरस्कार प्रा. प्रदीप पाटील ईश्वरपूर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. मसाप दामाजीनगर शाखेचे अध्यक्ष प्रकाश जडे, ॲड. नंदकुमार पवार, संपादक व कार्याध्यक्ष दिगंबर भगरे, दत्ता सरगर, संभाजी सलगर,लहू ढगे, रेखा जडे, अर्चना सरगर, भारती धनवे, जयश्री कवचाळे उपस्थित होते. स्मिता जडे यांचे बहारदार सूत्रसंचालन व साहित्यिक पसायदानाने कार्यक्रमाची गोड सांगता झाली.

## अक्कलकोटमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. २३ मे-**

स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी दहावी बारावी नंतर व्यावसायिक शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहावे, व स्वावलंबन होण्यासाठी आत्मविश्वासाने यश संपादन करावे, असे प्रतिपादन नागणसूर येथील एच.जी. प्रचंडे माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी संस्थेचे सचिव श्रीमंत कळसगोंडा यांनी केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष काशिनाथ पोद्दार होते. याप्रसंगी कन्नड व मराठी माध्यमातील दहावी बारावी मध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यात आले. गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने गौरव करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य शंकर व्हनमाने, संजय कुमार गंगदे, प्राध्यापक अनिल इंगळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक शरणाप्पा मनुरे, बसवराज धनशेट्टी, सोमशेखर कळसगोंडा, बसवराज कोळी, स्टीवन डल्लू, प्रमिला शिवगुंडे थावरू चव्हाण, विश्वनाथ तळवार, सागर पोद्दार, माणिक किणगी, अर्चना मनुरे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख विश्वनाथ वाघमोडे यांनी केले, आभार प्रशांत नागुरे यांनी मानले.

# जलजीवनची ४८७ कामे पूर्ण; हस्तांतरण रखडल्याने गावांमध्ये पेच

### ग्रामपंचायतींचा 'देखभाल खर्चा'ला विरोध; जलजीवन मिशनची कामे अडकली मधल्या टप्प्यात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

ग्रामीण भागातील प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या जलजीवन मिशन योजनेत सोलापूर जिल्ह्यात मोठी विसंगती समोर आली आहे. जिल्ह्यातील तब्बल ४८७ पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्या असतानाही त्या अद्याप ग्रामपंचायतींकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या नाहीत. परिणामी, योजनेची जबाबदारी नेमकी कुणाची? असा प्रश्न निर्माण झाला असून अनेक ग्रामपंचायतींनी नव्या कामांनाही विरोध सुरू केला आहे.

सोलापूर जिल्ह्यात सध्या जलजीवन मिशनअंतर्गत जवळपास १ हजार ९ योजना विविध टप्प्यांवर सुरू आहेत. त्यापैकी निम्म्याच्या आसपास कामे पूर्ण झाली असली, तरी हस्तांतरण प्रक्रियेत मोठा विलंब होत आहे. नियमानुसार योजना पूर्ण झाल्यानंतर सुरुवातीचा एक महिना देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी संबंधित ठेकेदारावर असते. त्यानंतर योजना ग्राम पंचायतींकडे वर्ग करण्यात येते. मात्र प्रत्यक्षात अनेक गावांमध्ये वर्ष उलटूनही हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झालेली नाही.

यामुळे देखभाल, दुरुस्ती, मोटार जळणे, पाईपलाईन गळती, वीजबिल अशा खर्चांची जबाबदारी स्वीकारण्यास ग्रामपंचायती टाळाटाळ करत असल्याचे चित्र आहे. काही ठिकाणी अपूर्ण कामे स्वीकारणार नाही अशी भूमिका सरपंचांनी घेतल्याने नव्या योजनांनाही अडथळे निर्माण होत आहेत. विशेष म्हणजे, पूर्ण झालेल्या योजनांपैकी केवळ दहा टक्के योजनांचेच अधिकृत हस्तांतरण झाल्याची माहिती समोर आली आहे. उर्वरित कामे २५, ५० आणि ७५ टक्के प्रगतीच्या टप्प्यात असल्याने संपूर्ण यंत्रणाच कागदोपत्री अडकून पडल्याचे दिसते.

ग्रामीण भागात पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी योजना सुरू करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडे व्यवस्थित हस्तांतरित करणेही आवश्यक मानले जाते. मात्र हस्तांतरण प्रक्रियेतील दिरंगाईमुळे हर घर जलचे स्वप्न प्रत्यक्षात अर्धवट राहण्याची भीती व्यक्त होत आहे.

> सोलापूर जिल्ह्यातील जवळपास ४८७ कामे पूर्ण आहेत. त्यातील सुमारे १० टक्के कामांचे हस्तांतरण झाले आहे. गेल्या वर्षभरातील आचारसंहितेमुळे प्रक्रियेला विलंब झाला.
>
> **–प्रसाद काटकर,** कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

- संभाव्य परिणाम
- पूर्ण योजनांची देखभाल रखडण्याची शक्यता
- ग्रामपंचायतींवर आर्थिक भार वाढणार
- नळजोडण्या असूनही नियमित पाणीपुरवठा धोक्यात
- नव्या योजनांबाबत गावपातळीवर अविश्वास वाढण्याची चिन्हे

# २९ मे रोजी नोकर भरती मेळावा

### अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त सांगोल्यात आयोजन



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २३ मे-**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त न्यू इंग्लिश स्कूल मैदान येथे आयोजित सांगोला महोत्सवामध्ये फॅबटेक उद्योग समूह यांच्यातर्फे शुक्रवार दि. २९ मे रोजी स.१० ते सायं.५ वा.पर्यंत सोलापूर, सांगली, कोल्हापूर आणि पुणे परिसरातील नामांकित कंपन्यांमध्ये विविध पदांसाठी भव्य नोकरी भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती माजी जि.प.सदस्य सचिन देशमुख यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली. यावेळी भाऊसाहेब रुपनर, ॲड. गजानन भाकरे, बाळासाहेब काटकर उपस्थित होते.

आयटीआय, डिप्लोमा, पदवीधर आणि फ्रेशर्स उमेदवारांसाठी आणि १० वी, १२ वी तसेच ३५ वर्षाखालील महिलासाठी स्पॅरकोन गारमेंट, सूतगिरणी मध्ये ही मोठी संधी आहे.

या नोकरी मेळाव्यात फॅबटेक ग्रुप अंतर्गत फॅबटेक मल्टिस्टेट बँक, वस्त्रोद्योग विभाग, शैक्षणिक विभाग तसेच प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेड (सोलापूर), टाटा ऑटोकॉम्प सिस्टीम्स, भारत फोर्ज, फिनोलेक्स केबल्स, हायर, हुंडाई (पुणे), धूत ट्रान्समिशन, जॉन डिअर, पार्क रोबोटिक्स, पारिजात ऑटोमेशन, जॅबील, किमली, राधा मोटर्स आणि रेविझत प्रा.लि. या कंपन्यांमध्ये उमेदवारांना रोजगाराची सुवर्णसंधी मिळणार आहे.

> **अर्ज कसा करावा?**
>
> इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी आपले अद्ययावत बायोडाटा आणि शैक्षणिक कागदपत्रांसह या मेळाव्यात उपस्थित राहावे. जे उमेदवार थेट उपस्थित राहू शकत नाहीत त्यांनी फॅबटेक ग्रुप, टाटा ऑटोकॉम्प, भारत फोर्ज आणि प्रिसिजन कॅमशाफ्ट्सच्या अधिकृत करिअर वेबसाईट्स आणि लिंक्डइन पेजवर जाऊन ऑनलाईन अर्ज सादर करावा.
>
> **– भाऊसाहेब रुपनर**

## अकलूज-इचलकरंजी एसटी बस सुरु करण्याची मागणी

**पिलीव, दि. २३ मे-**

माळशिरस तालुक्यातील अकलूज येथुन अकलूज आगाराची एस टी बस अकलूज, पिलीव, दिघंची, आटपाडी, तासगावमार्गे इचलकरंजी ही एस टी बस पूर्वी सुरु होती मात्र ही बस बंद केल्यामुळे अकलूज, पिलीव, दिघंची, आटपाडी, तासगाव याठिकाणचे नागरिक मोठ्या प्रमाणावर नोकरीसाठी तसेच इतर कामासाठी कोल्हापूर, इचलकरंजीला जातात तसेच विद्यार्थी सुद्धा शिक्षणासाठी जातात मात्र ही बससेवा अकलूज आगाराने बंद केल्यामुळे नागरिकांची तसेच विद्यार्थ्यांची म ोठी गैरसोय होत आहे.नागरिकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी ताबडतोब ही बससेवा पूर्ववत सुरु करावी, अशी मागणी लोकशाही पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष सुजित सातपुते यांनी निवेदनाद्वारे अकलूज आगार प्रमुख यांच्याकडे लेखी निवेदनावरे केली आहे.

## दुचाकीस्वार तरुणांना मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ मे-**

खेळून घरी परतणाऱ्या दोन तरुणांना गाडीवरून कट मारल्याच्या कारणावरून अडवून लोखंडी रॉड, दगड आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना येथील मलिक चौकात घडली आहे. या हल्ल्यात एक तरुण जखमी झाला असून, बार्शी शहर पोलीस ठाण्यात तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी उबेद शाहनवाज तांबोळी (वय १८, रा. बालाजी कॉलनी, सोलापूर रोड, बार्शी) आणि त्याचा मित्र साईम शाहिद सय्यद हे दोघे १५ मे रोजी रात्री नेहमीप्रमाणे क्रिकेट खेळण्यासाठी गेले होते. रात्री साडे दहाच्या सुमारास आपल्या मोटारसायकलवरून घरी परत जत असताना परांडा रोडवरील मलिक चौकात, पाठीमागून आलेल्या काही जणांनी त्यांना आवाज देऊन थांबवले. अजिंठा कलेक्शनसमोर मोटारसायकल थांबवली असता, आरोपी रेहान बाबुडे आणि यासिर तुटके (दोघे रा. बारंगुळे प्लॉट, बार्शी) यांनी तुम्ही आम्हाला कट का मारला? अशी विचारणा करत वाद घालण्यास सुरुवात केली. फिर्यादी व त्याचा मित्र त्यांना सम जावून सांगत असतानाच, आरोपींनी त्यांचा तिसरा साथीदार शोएब मिर्झा यालाही फोन करून तिथे बोलावून घेतले. वाद विकोपाला गेल्यानंतर आरोपी रेहान बाबुडे याने रस्त्याशेजारी पडलेला दगड उचलून फिर्यादी उबेद याच्या पाठीवर व खांद्यावर जोरात मारला. दुसरीकडे, आरोपी यासिर तुटके आणि शोएब मिर्झा यांनी मित्र साईम सय्यद याला लाथाबुक्क्यांनी आणि हाताने बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. मारहाणीदरम्यान झालेल्या आरडाओरड्यानंतर परिसरातील नागरिक अमन जिकरे व रिझवान तांबोळी यांनी धाव घेत भांडण सोडवले. जखमी तरुणांना तातडीने उपचारासाठी बार्शी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार पूर्ण झाल्यानंतर आणि नातेवाईकांशी चर्चा केल्यानंतर उबेद तांबोळी याने बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.



## कवठेकर प्रशालेच्या इयत्ता पाचवीच्या उन्हाळी वर्गाची यशस्वी सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ मे -**

येथील पंढरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित कवठेकर प्रशाला नाथ चौक पंढरपूर येथे दिनांक २८ एप्रिल पासून इयत्ता पाचवी नूतन प्रवेश घेतलेल्याविद्यार्थ्यांसाठी मराठी, इंग्रजी, गणित विषयांच्या मूलभूत संकल्पना दृढ होण्यासाठी उन्हाळी वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

उन्हाळी वर्गाचा हा उपक्रम पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नानामालक कवठेकर, चेअरमन श्रीमती विणाताई जोशी, मानद सचिव सु.र.पटवर्धन व श्री.अभ्यंकर यांच्या संकल्पनेतून व प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही.वाय.पाटील यांच्या मार्गदर्शनातून यशस्वीपणे राबविण्यात आला.

दि.२८ एप्रिल ते २३ मे पर्यंत दररोज सकाळ सत्रात राबविण्यात आला. त्याचा समारोप शनिवारी (दि.२३) झाला. या समारोप समारंभ प्रसंगी प्रशालेचे ज्येष्ठ पर्यवेक्षक गडदे, ज्येष्ठ शिक्षक राजुरकर, गुरव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर विचार व्यक्त केले. सूत्रसंचालन वसावे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वळवी यांनी केले. याप्रसंगी सुरेंद्र कुलकर्णी, पी.पी. कुलकर्णी, नरेंद्र भंडारकवठेकर व वसावे आवर्जून उपस्थित होते.

## ब्रिलियंट करियर इन्स्टिट्युटमध्ये गुणवंतांचा सत्कार

### ज्येष्ठ पत्रकार उदय निरगुडकर यांचे मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २३ मे-**

ज्येष्ठ पत्रकार उदय निरगुडकर यांनी नुकतीच पंढरपूर येथील प्रा. परिचारक सरांच्या ब्रिलियंट करियर इन्स्टिट्यूट येथील विद्यार्थ्यांना अभ्यास, यश आणि करिअर विषयक मार्गदर्शन केले.कार्यक्रमास महाराष्ट्र नॉलेज सेंटर सोलापूरचे रविराज पवार तसेच महाराष्ट्र नॉलेजसेंटर पुणेचे सचिन शिंदे यांची देखील उपस्थिती लाभली.

याप्रसंगी उदय निरगुडकर यांच्या हस्ते विविध गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या मध्ये इयत्ता दहावीच्या परीक्षेत १०० टक्के गुण मिळवून महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळवणारे पंढरपूरचे तीन विद्यार्थी चि.रुद्र अभय उत्पात, चि. मिहिर मकरंद बडवे व चि.अथर्व अमित वाडेकर तसेच प्रा.परिचारक सरांच्या ब्रिलियंट करियर इन्स्टिट्यूटमधील इयत्ता बारावी परीक्षे मध्ये पंढरपूर केंद्रातून प्रथम क्रमांक मिळवणारे अक्षय घाडगे, जेईई मेन्स २०२६ परीक्षेत ९९.३०% गुण मिळवून पंढरपूरात प्रथम क्रमांक मिळवणारी वैभवी कोळी व जेईई मेन्स २०२६ परीक्षेत ९७.३१% गुण मिळवून क्लासमध्ये द्वितीय क्रमांक मिळवणारे ईशान बाळेकर व अन्य गुणवंत विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला.

व्याख्याना दरम्यान उदय निरगुडकर यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन, सातत्य, आत्मविश्वासआणि यश मिळवण्यासाठी आवश्यक असलेला गुरुमंत्र दिला. त्याग व स्वयंशिस्त यांच्यामुळे आयुष्यात मोठे यश मिळते हे त्यांनी सानिया नेहवाल, सचिन तेंडुलकर अशा मान्यवरांच्या उदाहरणातून अतिशय सोप्या शब्दांत उपस्थित विद्यार्थ्यांना सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे उपस्थित विद्यार्थी भारावून गेले. या मार्गदर्शनाचा मोठा लाभ झाल्याची भावना क्लासमधील विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी व्यक्त केली.

> याप्रसंगी उदय निरगुडकर यांनी प्रा.परिचारक सरांच्या बद्दल बोलतांना एका शिक्षकाने शिक्षणाचा उद्योग नहोऊ देता शिक्षण हे त्याच्याआदर्शा सकट कसं चालवाव याचा आदर्श आपण पंढरपूर येथे निर्माण केला आहे. असे गौरवोद्गार काढले व प्रा.परिचारक सरांच्या ब्रिलियंट करियर इंस्टिट्यूटचे कौतुक केले.

# राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात

### भारतीय जैन संघटनेचा स्तुत्य उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

भारतीय जैन संघटना (बीजेएस) महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुला-मुलींच्या शैक्षणिक पुनर्वसनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आणि संवेदनशील उपक्रम संस्थापक अध्यक्ष शांतीलालजी मुथा याच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना पुणे येथील वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पामध्ये प्रवेश देऊन त्यांचे शिक्षण, निवास, भोजन, ड्रेस, शैक्षणिक साहित्य तसेच इतर आवश्यक सुविधा पूर्णतः विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

मागील दोन वर्षांत आत्महत्या झालेल्या शेतकरी कुटुंबातील इयत्ता पाचवी, सहावी व सातवीमध्ये आता प्रवेश घेत असलेल्या मुला-म ुलींना या प्रकल्पात प्रवेश देण्यात येणार असून, त्यांचे बारावीपर्यंतचे संपूर्ण शिक्षण भारतीय जैन संघटनेमार्फत विनामूल्य करण्यात येणार आहे. यासाठी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांकडून आत्म हत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील पात्र विद्यार्थ्यांची माहिती प्राप्त करण्यात आली आहे. भारतीय जैन संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सेवक संबंधित कुटुंबांच्या घरी गावातील सरपंच किंवा प्रतिष्टीत व्यक्ती सोबत घेऊन जाऊन प्रत्यक्ष भेट घेणार असून विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना या योजनेची सविस्तर माहिती व्हिडिओ व छायाचित्रांच्या माध्यमातून समजावून सांगण्यात येणार आहे.

> **घरातील कर्ता गेल्यावर मुलांचे शिक्षण थांबू नये**
>
> घरातील कर्ता शेतकरी आत्महत्या केल्यानंतर संपूर्ण कुटुंब मानसिक, सामाजिक व आर्थिक संकटात सापडलेले असते, अशा कठीण परिस्थितीतही मुला–मुलींचे शिक्षण थांबता कामा नये, त्यांनी शिक्षण घेऊन भविष्यात स्वतःच्या कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे उचलली पाहिजे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे भारतीय जैन संघटनेचे राज्य अध्यक्ष केतन शहा यांनी सांगितले.

> **गरजू मुलांनी संपर्क साधावा**
>
> इच्छुक व गरजू आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांनी या शैक्षणिक पुनर्वसन उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले आहे. दरम्यान, आपल्या गावात असे कोणी कुटुंब असेल तर त्यांनी सोलापूर जिल्ह्यासाठी रविभाई गांधी, जेऊर मोबाईल नंबर ९६८९५५७५४४ यांच्याशी संपर्क साधावा.

## श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानतर्फे आज पालक पुरस्कारांचे वितरण

**सोलापूर, दि. २३ मे-**

श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानचा १० वा वर्धापनदिन रविवार, दि. २४ मे रोजी साजरा होत आहे. सोहळ्याचे औचित्य साधून आदर्श पालक पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. मान्यवरांच्या उपस्थितीत या पुरस्कारांचे वितरण होणार आहे. संस्थेच्या कार्यवृत्तांचे प्रदर्शनही आयोजित केले आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश कासट यांनी दिली.

रंगभवन चौकातील समाजकल्याण केंद्र येथे रविवारी संध्याकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत हा सोहळा होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा गटसचिव सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष विश्वनाथ भोसले असणार असून, त्यांच्याच हस्ते पुरस्कार प्रदान केले जातील. मान्यवरांची प्रमुख उपस्थिती या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे संशोधक व अधिकारी डॉ. अभिजीत जगताप, प्रसिद्ध उद्योजक जुगलकिशोर करवा, साई समर्थ फायनान्सचे चेअरमन अनिल बुरांडे आणि उद्योजक केदार बिराजदार हे उपस्थित राहणार आहेत.

> **यांना मिळणार आदर्श पालक पुरस्कार**
>
> विशाखा–अनिल बाबरे, अलका– संभाजी खंदारे, अनिता– हनुमंतसिंग राजपूत, रिहाना– मदार मकानदार, लता– उद्धव इरशेट्टी, सुलक्षणा–दत्तात्रय मळगे, संध्या– तुळशीदास नारायणकर, फजलुन–अल्लावल्ली इनामदार यांचा सन्मान होणार आहे.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## प्रा.रामचंद्र यादव यांच्या ‘सर्वसाक्षी’ कविता संग्रहाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२३ मे -**

आलेगाव, ता.सांगोला येथील प्रा.रामचंद्र यादव यांच्या सर्वसाक्षी कविता संग्रहाचे प्रकाशन करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर येथे के. एस.आय.प्रकाशन संस्थेने आयोजित केलेल्या २९ व्या मराठी ग्रामीण साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर संमेलनाचे अध्यक्ष आचार्य शंकर अंदानी, उद्‌घाटक डॉ.मधुकर हुजरे, प्रमुख पाहुणे डॉ.श्रीकांत पाटील, स्वागताध्यक्ष कवी सरकार, विलास पाटील, पत्रकार डॉ.सुरेश राठोड, काव्यसंमेलनाचे अध्यक्ष सुधाकर शिंदे




यांच्या हस्ते झाले.

तसेच याप्रसंगी प्रा.डॉ.रामचंद्र यादव यांना लोकनेते यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य निर्मिती पुरस्कार देऊन सन्मानित केले. सूत्रसंचालन प्रांजल शिंदे, पुजा रणदिवे, तेजस्विनी रजपूत यांनी केले.



# शिवाई बसच्या दरात कपात करा

## प्रवासी वर्गातून होतेय मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. २२ मे-**

सर्वात अधिक तिकीट दरामुळे ई शिवाई ही इलेक्ट्रिक बस प्रवाशांना परवडणारी नाही. महामंडळाने या बसच्या तिकीट दरात कपात करावी अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

शासनाने प्रदूषण कमी व्हावे यासाठी डिझेल चालणाऱ्या एस टी बस ला पर्याय म्हणून ई शिवाई बस सुरु केल्या आहेत. ही बाब कौतुकास्पद आहे.परंतु या बसच्या तिकीट दरात साध्या एस टी बसच्या दरापेक्षा मोठी तफावत आहे. हिचे दर प्रवाशांच्या खिशाला न परवडणारे आहेत. वास्तविक पाहता साध्या गाड्यांना डिझेल भरावे लागते. त्याचा खर्च असतो परंतु शिवाई गाड्यांना डिझेल लागत नाही. त्या केवळ चार्जिंग कराव्या लागतात.

खर्चात बचत असूनही या गाड्यांना एवढी भाडे वाढ कशासाठी हा प्रश्न सर्वांना पडला आहे. प्रवाशांच्या सेवेसाठी हे ब्रीद असणाऱ्या परिवहन महामंडळ याकडे लक्ष देईल का भाडे तत्वावर गाड्या घेऊन प्रवाशांना वेठीस धरणार असा प्रश्न प्रवासी विचारत आहेत.

### शिवाई बसच्या नंबर प्लेट न दिसणाऱ्या

शासनाने या गाड्यांना विशिष्ट नमुन्यात नंबर प्लेट तयार करून बसविल्या आहेत. परंतु या गाड्यांचा नंबर जवळून पहिला तरच दिसतो. काही अंतरावरून तो समजून येत नाही. वास्तविक पाहता गाडीचा नंबर ओळखू यावा असा बसविणे आवशक आहे. यामध्येही बदल करावा अशी प्रवाशांची मागणी आहे.

## महत्त्वाचे...




### मतदार यादीत घोळ करणाऱ्यांना जेलमध्ये जावे लागेल : हर्षवर्धन सपकाळ

**सोलापूर, दि. २३ मे-**

मुंबई येथे काँग्रेसच्या राज्यस्तरीय बैठकीत प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मतदार यादीतील गैरप्रकार करणाऱ्यांना आगामी काळात जेलमध्ये जावे लागेल, असा इशारा दिला. टिळक भवन येथे झालेल्या बैठकीत प्रमुख नेते, खासदार, आमदार आणि पदाधिकारी उपस्थित होते. सपकाळ यांनी मतदार यादी पुनरिक्षण मोहिमेसंदर्भात बूथस्तरावर कार्यकर्त्यांना विशेष प्रशिक्षण दिल्याचे सांगितले. यासाठी विशेष समिती स्थापन केली असून तिच्या प्रमुखपदी सतेज पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पत्रकार परिषदेत सपकाळ यांनी पेट्रोल-डिझेल टंचाई, आरक्षण आणि शेतकरी प्रश्नावरून राज्य सरकारवर टीका केली. काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनीही सरकारवर भ्रष्टाचार आणि शेतकरीविरोधी धोरणांचे आरोप केले.

### लॉजिक इन्स्टिटयूटचे अकरावी, जेईई, नीट, एमएचटी-सीईटीचे बॅचेस सुरु

**सोलापूर, दि. २३ मे-**

लॉजिक इन्स्टिटयूटचे ११वी जेईई, नीट, एमएचटी-सीईटीचे बॅचेस सुरू झाले आहेत. लॉजिक इन्स्टिट्यूट ही मूळची सोलापूरची संस्था असून येथील तिन्ही शिक्षक नामांकित आयआयटी व आयआयएमम धून उच्चशिक्षित आहेत. लॉजिक इंस्टीट्यूटने जेईई मेन २०२५ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. दोन विद्यार्थ्यांनी ९९.५ पर्सेंटाईलपेक्षा अधिक गुण मिळवले आहेत. संस्थेचा सर्वोच्च निकाल गौरव काळे याने ९९.६० पर्सेंटाईल मिळवून तर आदित्य कामतकर याने ९९.५१ पर्सेंटाईल मिळवले आहे. १४ विद्यार्थी ९५% ile पेक्षा अधिक गुण मिळवत ४२ विद्यार्थी जेईई ॲडव्हान्ससाठी पात्र ठरले आहेत. तसेच मागील वर्षी सीओईपी पुणेमध्ये ६ विद्यार्थी, व्हीजेटीआय मुंबईत ६ विद्यार्थी, डब्ल्यूसीई सांगलीत ४, पीआयसीटी पुणेत ३, कमिन्स कॉलेज पुणे मध्ये ४, पीसीसीओईत ५ विद्यार्थी अशा नामांकित कॉलेजमध्ये सोलापूरमधून सर्वाधिक विद्यार्थी लॉजिकचे आहेत. १०वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी ११वी चे नवीन बॅचेस दोन्ही ब्रांच - एम्प्लॉयमेंट चौक आणि जुळे सोलापूर भागात सुरू झाले आहेत.

### कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाचे आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत २२ विद्यार्थी पात्र

**पिलीव, दि. २३ मे-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या आठवीमधील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत दैदीप्यमान यश मिळवले. परीक्षेस ७८ विद्यार्थी बसले होते त्यापैकी २२ विद्यार्थी पात्र झाले. यामध्ये समृद्धी जगदाळे (२४६),श्रावणी तावरे (२२०),रुद्र यादव (२१०),राजवर्धन पाटील( २०४), सार्थक वाघ (१८८),तुषार बरकडे (१८८),ज्ञानदा मगर (१७८), सुप्रिया पिसे (१७२), सिद्धी मदने (१७०), ज्ञानेश्वरी पाटील (१६६), सार्थक देशमुख (१६४), पूर्वा लोंढे (१६२) , संकेत रणवरे (१६२), गौरी करमाळकर(१६०), सिद्धी भैस (१६०), संतोष पाटील (१५८),तृप्ती मेटकरी (१५८), श्रुती बनगर (१४४), यज्ञेश काळे (१४४),यश पाटील (१४०),मिराज आतार (१३४), सादीया आतार (१३०) असे यश मिळवले. यशस्वी विद्यार्थी तसेच शिक्षकांचे रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन, व्हा.चेअरमन, विभागीय अधिकारी, गुणवत्ता कक्ष प्रमुख, स्थानिक स्कूल कमिटी, शाळा व्यवस्थापन समिती, माता पालक तसेच शिक्षक पालक संघ, माजी विद्यार्थी संघ आदींकडून अभिनंदन होत आहे.

# हॉस्पिटलचे चेकबुक चोरून नऊ लाखांवर डल्ला

## अकलूजमधील घटना; डॉक्टरांची फसवणूक करणारी टोळी सक्रीय

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २३ मे-**

राणे हॉस्पिटलमधील ओ.पी.डी. केबिनमधून चोरलेले चेकबुक वापरून तब्बल ९ लाख ४१ हजार ५०० रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी अकलूज पालिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

डॉ. रेवती राणे (वय ४२, रा. बायपास रोड, अकलूज) यांचे अकलूज येथे राणे हॉस्पिटल आहे. ऑक्टोबर २०२५ च्या सुमारास त्यांच्या हॉस्पिटलमधील ओ. पी.डी. केबिनमधील टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेले 'ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनाकॉलॉजी सोसायटी'च्या बँक ऑफ बडोदा शाखेचे चेकबुक चोरीला गेले होते. काही दिवसांनी या चोरीच्या चेकबुकचा गैरवापर करून बँकेच्या संबंधित कर्मचाऱ्यांनी संगनमत करून मोठी आर्थिक फसवणूक केली. एवढेच नव्हे तर, आरोपींनी हॉस्पिटलमधील पेशंटच्या नातेवाईकांचे आधार कार्ड हॉस्पिटलमधील फाईलमधून चोरून त्याचा वापर बँकेत फसवणुकीसाठी केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

आरोपींनी ही फसवणूक अत्यंत पद्धतशीरपणे १० महिन्यांच्या कालावधीत केली. १ ऑक्टोबर २०२५ ते १० एप्रिल २०२६ या कालावधीत आरोपींनी विविध तारखांना चेकद्वारे पैसे काढले. १२ ऑक्टोबर २०२५ रोजी चेक क्र. ३१९ द्वारे १,८८,००० रुपये, ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी चेक क्र. ३२१ द्वारे १,१६,८०० रुपये, १ नोव्हेंबर २०२५ रोजी चेक क्र. ३२० द्वारे १,८४,८०० रुपये, १० एप्रिल २०२६ रोजी चेक क्र. ३३६ द्वारे १,९४,६०० रुपये आणि त्याच दिवशी चेक क्र. ३३९ द्वारे १,९४,६०० रुपये असे एकूण ९ लाख ४१ हजार ५०० रुपये परस्पर खात्यातून काढून घेतले. या घटनेमुळे हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या रुग्णांच्या आणि त्यांच्या नातेवाईकांच्या वैयक्तिक माहितीची सुरक्षा किती धोक्यात आहे, हे स्पष्ट झाले आहे. डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील विश्वासाच्या नात्याला या प्रकाराने धक्का बसला आहे.

### चक्रावून टाकणारा तपास

ही घटना उघडकीस आल्यानंतर डॉ. राणे यांनी अकलूज पोलिसांत धाव घेतली. या प्रकरणी सिद्धांत वाघमारे आणि बँकेतील संबंधित कर्मचाऱ्यांसह काहींवर गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस हेडकॉन्स्टेबल गायकवाड तपास करत आहेत. गुन्ह्यात वापरलेली बनावट कागदपत्रे आणि बँकेचे सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू आहे. लवकरच यातील इतर बड्या माशांना अटक केली जाईल, अशी माहिती पोलिसांकडील सुत्रांनी दिली आहे.

### बँकेच्या भूमिकेवर संशय

डॉ. राणे यांनी आपल्या तक्रारीत थेट बँकेच्या कर्मचाऱ्यांचा उल्लेख केल्याने या प्रकरणाची व्याप्ती वाढली आहे. चेकवर असलेली सही, खात्यातील शिल्लक रक्कम आणि इतक्या मोठ्या रक्कमेचे व्यवहार होत असताना बँकेने नियमांचे पालन केले का? हा मोठा प्रश्न उपस्थित होत आहे. बँक कर्मचाऱ्यांच्या सहभागाशिवाय इतक्या सहजपणे चेक वटवणे शक्य नसल्याचे स्पष्ट होत आहे.

## भाजपच्या प्रशिक्षण अभियानला कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २३ मे-**

पंढरपूर तालुक्यातील स्वेरी इंजिनिअरिंग कॉलेज, गोपाळपूर येथे भाजप सोलापूर ग्रामीण आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियान २०२६ या प्रशिक्षण वर्गाचा निरोप समारंभ झाला. यावेळी प्रशिक्षणातून कार्यकर्त्यांना संघटन बळकटीची नवी दिशा मिळेल असा विश्वास माजी खा.रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी व्यक्त केला.

प्रदेश सचिव राम सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रशिक्षण वर्ग पार पडला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने वर्गाची सुरुवात झाली. जि.प.अध्यक्ष दिपक वैद्य, भाजप पदाधिकारी, जिल्ह्यातील




मंडळांचे कार्यकर्ते, बूथ प्रमुख, बीएलए-प्रतिनिधी, युवा कार्यकर्ते उपस्थित होते. सोलापूर ग्रामीण (माढा) जिल्हा प्रभारी संजय जगताप यांनी प्रशिक्षण वर्गास भेट देऊन कौतुक केले. आभार जि.प.शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी मानले. कार्यक्रमाचे उत्तम नियोजनाबद्दल संयोजक सचिन शिंदे, सहसंयोजक दत्तात्रय जाधव तसेच सर्व आयोजक समितीचे अभिनंदन करण्यात आले.

अभियानात पुनीत जोशी यांनी विकास संगोपन आणि जबाबदारी जाणीव, महेरदीप पाटणे यांनी एसआयआर, योगेश बाचल यांनी बूथ व्यवस्थापन, आ.योगेश टिळेकर यांनी कार्यविस्तार, जिल्हा सरचिटणीस सचिन शिंदे यांनी विचार परिवार, भारत आमदापुरे यांनी देशासमोरील आव्हाने, अनिकेत निकम यांनी सोशल मीडिया आणि नमो ॲप तसेच सुरेश हळवणकर यांनी भाजप इतिहास या विषयावर मार्गदर्शन केले.

## सोशल मीडिया पोस्टवरून हाणामारी, पाचजण जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ मे -**

खासदार धनंजय महाडिक यांच्या विरोधात सोशल मीडियावर कमेंट्स केल्याबद्दल सुस्ते (ता. पंढरपूर) येथे शुक्रवारी (दि. २२) दोन गटांत तुंबळ हाणामारी झाली. या घटनेत दोन्ही गटांतील पाच जण गंभीर जखमी झाले. दोघांवर सोलापूर येथे तर तिघांवर पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अलीकडेच सुस्ते गावात यात्रेदरम्यान नृत्यांगना राधा पाटीलच्या कार्यक्रमात राडा झाला होता. आता पुन्हा संघर्ष उफाळून आला. एका गटातील कार्यकर्त्याने खा. महाडिकांविरोधात कमेंट केली होती. त्याबाबत महाडिक गटाच्या कार्यकर्त्यांनी जाब विचारल्यानंतर शुक्रवारी दोन्ही गटांमध्ये हाणामारी झाली. महाडिकांचे आकाश नागटिळक व धनंजय नागटिळक हे गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर सोलापूर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. लोकरे गटाचे रामदास चव्हाण, बंडू लोकरे, दत्तात्रेय लोकरे यांच्यावर पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेनंतर गावात तणाव निर्माण झाला असून, पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे.

## अकलुजमध्ये झाड कोसळून एकजण जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २३ मे-**

अकलूज येथील तलाठी कार्यालयाजवळ जुने, महाकाय लिंबाचे झाड अचानक मुळासकट उन्मळून रस्त्यावर कोसळले. रस्त्याने जाणारे मारुती भोसले यांच्या अंगावर झाड पडल्याने ते जखमी झाले आहेत.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, सदर लिंबाचे झाड अनेक वर्षे जुने व आतून पोखरलेले होते. आधी झाडाला आग लागल्याचे निदर्शनास येताच नगरसेवक राहुल लोंढे व महेश शिंदे यांना समजताच तात्काळ नगर परिषदेशी संपर्क साधून झाडाला लागलेली आग शांत केली. मात्र त्यानंतर कोणताही वारा-पाऊस नसताना अचानक ते कोसळले. दुर्दैवाने त्याचवेळी तेथून जाणारे



मारुती भोसले हे झाडाखाली सापडले. झाडाचा मोठा भाग त्यांच्या डोक्यावर व पाठीवर आदळल्याने त्यांना मार लागला आहे. त्यांना डॉक्टरांनी काही दिवस बेड रेस्ट घेण्याचा सल्ला दिला आहे. यावेळी भाजप नेते डॉ. अक्षय वाईकर, नगरसेवक महेश शिंदे, राहुल लोंढे आदी उपस्थित होते.

### तत्काळ सर्वेक्षण करुन धोकादायक झाडे हटवा

शहरातील सर्व जुन्या, धोकादायक व जीर्ण झाडांचे तातडीने सर्वेक्षण करावे. नागरिकांच्या जीवाला धोका असलेली झाडे तात्काळ हटवण्याची मोहीम हाती घ्यावी. या घटनेची मुख्याधिकारी सचिन पाटील यांनी गंभीर दखल घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.



## अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांचा पत्रकारांकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२३ मे-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त अक्कलकोट शहरातील पत्रकारांकडून सत्कार करण्यात आला. पत्रकारांनी यावेळी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे सचिव शाम मोरे यांच्या हस्ते सत्कार करून जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने अन्नदानासह गरीब निराधारांना घरपोच जेवणाचा डबा, वृक्षारोपण-संवर्धन रुग्णवाहिका, अग्निशमन वाहन, चौक - क्रीडांगण सुशोभीकरण, कुस्तीगीरांना खुराक, क्रीडापटूंना प्रोत्साहन, दहावी गुणवंताना पारितोषिक आदी विधायक उपक्रम राबवले. सर्व उपक्रम जनमेजयराजे भोसले यांच्या संकल्पनेतून राबविले जातात असे गौरवोद्गार शाम मोरे यांनी काढले.

याप्रसंगी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष नंदकुमार जगदाळे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य कार्यकारणी सदस्य स्वामीराव गायकवाड, डिजिटल मीडियाचे जिल्हाध्यक्ष राजेश जगताप, पत्रकार संघाचे सदस्य रमेश भंडारी योगेश कबाडे, दयानंद दणूरे, चेतन जाधव, मुन्ना कोल्हे, महिंद्रकर आदी उपस्थित होते.

# स्वामी शेतकरी प्रकल्पाचा यशस्वी वैज्ञानिक प्रवास

## नमो नैसर्गिक कृषी प्रबोधिनी व गुरुकुलच्या माध्यमातून क्रांती

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २३ मे -**

बार्शी येथील कदम कुटुंबाने सुरू केलेल्या कार्याचे आता एका भव्य कृषी वैज्ञानिक वटवृक्षात रूपांतर झाले आहे. बळेवाडी ता.(बार्शी) येथील स्वामी शेतकरी आत्मिक व आर्थिक विकास प्रकल्पाने यशस्वी १४ वर्षे पूर्ण केली आहे. अध्यात्म आणि आधुनिक कृषी विज्ञानाची सांगड घालत हजारो शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य आणले आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाचे औचित्य साधत, पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतील विषमुक्त शेती संकल्पनेच्या प्रचारासाठी येथे नमो नैसर्गिक व आत्मनिर्भर कृषी व ग्रामविकास प्रबोधिनीची स्थापनाही केली आहे. कदम कुटुंबाने समाज घडविण्याच्या ध्येयाने २००४ साली बळेवाडी येथे श्री स्वामी समर्थ मंदिराची स्थापना केली.

### नमो नैसर्गिक कृषी प्रबोधिनीद्वारे विषमुक्त शेतीचा प्रसार

पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांच्या स्वप्नातील 'नैसर्गिक व विषमुक्त शेती' घराघरांपर्यंत पोहोचवण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी निमित्त 'नमो नैसर्गिक व आत्मनिर्भर कृषी व ग्रामविकास प्रबोधिनी'ची स्थापना करण्यात आली आहे. या प्रबोधिनीच्या माध्यमातून येणाऱ्या काळात रासायनिक खतांना फाटा देऊन नैसर्गिक शेतीचे तंत्रज्ञान तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवले जाणार आहे.



लोकसहभागातून विविध सामाजिक उपक्रमांसाठी पोलिस अधिकारी नानासाहेब कदम यांनी बार्शीतील सद्भावक व्यक्तींना एकत्र आणून श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्टची स्थापना केली. चार वर्षांत या ट्रस्टच्या माध्यमातून मोफत दवाखाना, ध्यान-योग, नामस्मरण प्रशिक्षण आणि अन्नछत्रालय सुरू झाले. अन्नछत्र मंडळाचे काम सुरू असतानाच, नानासाहेब कदम यांना शेतकऱ्यांच्या गंभीर समस्या आणि आर्थिक विवंचना जवळून जाणवल्या. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी त्यांनी स्वामी शेतकरी आत्मिक व आर्थिक विकास प्रकल्पाचा शुभारंभ केला.

शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी आध्यात्मिक ध्यान, योग आणि नामस्मरण व कृषी तज्ज्ञांच्या माध्यमातून आत्मनिर्भर, शाश्वत आणि वैज्ञानिक कृषी तंत्रज्ञान प्रशिक्षण या द्विसुत्रीवर त्यांनी काम सुरु केले. या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी निवास, भोजन आणि संपूर्ण प्रशिक्षण विनामूल्य असते.

### ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन

प्रकल्पाला परम संगणकाचे जनक डॉ. विजय भटकर आणि सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांसारख्या मान्यवरांचे मार्गदर्शन लाभत आहे. प्रशिक्षणानंतर शेतकऱ्यांनी पिकवलेला विषमुक्त शेतमाल थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी शेतकरी ते ग्राहक थेट विक्री व्यवस्था आणि निर्यातीसाठी विशेष सुविधाही निर्माण केल्या आहेत.मराठवाडा आणि विदर्भातील समस्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या भविष्याला आकार देण्यासाठी या प्रकल्पांतर्गत स्वामी गुरुकुल सुरू केले. सद्यस्थितीत ४५ पाल्यांना या गुरुकुलमध्ये मोफत शालेय शिक्षण, आध्यात्मिक संस्कार आणि शाश्वत शेतीचे व्यावसायिक प्रशिक्षण दिले जात आहे.